‘इतिहाससंग्रहां’त प्रसिद्ध झालेली

होळकरदरबारांतली हिंगण्यांची वकिली.

हें प्रकरण

दत्तात्रय बळवंत पारसनीस

संपादक, ‘इतिहाससंग्रह’

सातारा,

यांनीं संशोधून तयार केलें

तें,

मुंबई येथें,

‘निर्णयसागर’ छापखान्यांत तुकाराम जावजी

ह्यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

नं. २३ कोलभाट लेन.

इ. स. १९११.

किंमत ४ आणे.

Published by Tukaram Javaji, Proprietor N. S. Press,
23, Kolbat Lane, Bombay.

BOMBAY:
Printed by B. R. Ghanekar at the Nirnaya-Sagar Press,
23, Kolbhat Lane.

होळकरदरबारांतली हिंगण्यांची वकिली.

लेखांक १.

श्रीराम. ता. २ नोव्हेंबर १७९४.

"चिरंजीव राजश्री राजारामपंत भाऊ यांसीः—

प्रती देवराव महादेव आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागाईत चंद्र २७ रबिलावल मुक्काम इंदूर, लष्कर राजश्री तुकोजी होळकर सुभेदार, जाणून स्वक्षेम लेखन करित गेलें पाहिजे. यानंतर बहुत दिवस जाले, तुम्हांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर असें नसावें. यानंतर आमची रवानगी इकडे सरकारांतून राजश्री पाटिलबावांचे विचारें जाली. त्यांत होळकरांनीं कलह न करावा, पटाल्यापलीकडे मसलत करावी, किंवा गुजराथची मसलत कच्छ भूजपर्यंत करावी, अगर देशीं हुजूर यावें, आज्ञा होईल त्या अन्वयें वर्तणूक करावी. म्हणून सरकार आज्ञा. व याच भावें बावाकडे गेलों. ते दिवशीं बावाचींहि बोलणीं, मागील पुढील अर्थ मजला माहित केले. तुह्मी ते दिवशीं नव्हतां. राजश्री आबा होते. त्यांत मुख्यत्व मसलत करावी. घराऊ रीतीचा स्नेह असावा. तर दहा वेळ बोलणीं पडलीं. शफ्था जाल्या. परंतु निर्वाहांत एकहि गोष्ट आली नाहीं. बहुवशता सरदारांची व कारभारी यांची. तेव्हां पुन्हाहि वारंवार तीच गोष्ट. यास्तव दुरून संमंध असून नाहींसें असावें हेच गोष्ट करावयाची, दुसरें नाहीं. येविषयीं बहुत बोलणें जालें. त्यानंतर मास पक्ष आमचें राहाणें पुण्यास होऊन निरोप घेतला. ते दिवशींहि आज्ञा पूर्ववत् होऊन येथें आलों. प्रथम महेश्वरीं आलों. गंगाजळनिर्मळ बाईची भेट जाल्यास मासपक्ष तेथें राहून, साकल्य आज्ञेप्रमाणें बोलिलों. सरकारचीं पत्रें दिधलीं. बोलणीं बहुतच जालीं. त्यांत दुराग्रह वाढता. "उभयपक्षीं नुकसानी जाली व होत जाते. येणेंकरून सरकारची नुकसानी. रात्रं दिवस खलष हा ठीक नाहीं. मोठालीं कामें बाहेरचीं होऊन उभयपक्षीं व सरकारांत नफे व्हावे, ह्या चाली चालाव्या, त्या काळमहात्म्यानें ऐशा घडतात ! व लोक तमाशा पाहतात ! शत्रु दिवस मोजितात. तहबाऱ्या मनस्वी होतात. ह्या गोष्टी विवेकास व पूर्व चालींस उचित कीं काय ? तुह्मी वडील व विवेकी. तेथें या अपेक्षास अधिकारी होऊन समेट न व्हावी, ही दुर्नाम कोणाची ? याचा विचार पुरतेपणें करावा." तेव्हां उत्तर केलें कीं, "मजला प्रयोजन काय, कीं उभयपक्षीं दोष निर्दोष निवडावे. विवेक उभयतांस सांगावे व उभयतांनीं विवेक करावा. व धन्यांनीं आज्ञा करावी. त्याअन्वयें वर्तावें. आह्मीं वडिलांवडिलीं चाली पाडिल्या. त्यांत उभयपक्षीं सांप्रत चाली पडतात, त्या हिंदुस्थान प्रांतीं पातशाई

आपसांत होऊन, दक्षिणच्या फौजा जाऊन, एकमेकानें आपलीं घरें दाखवून, एकमेकास जख द्यावी. पैका, प्रांत आह्मांस मिळावा, व कांहीं दिवसांत राहिला त्याचा हलकेपणा पाहून आमचे फौजांनीं त्याचा निर्वाह करावा. असें होत होत, आह्मांस मोठेपणें मिळालीं. पराक्रम जाले. पादशाई घरांत येऊन श्रीमंताचे राज्याची व आमचे सरदारियांची वृद्धिच आजपर्यंत जाली. आणि मराठे ज्याचा पक्ष करितील तोच सबळ पडेल, असेंहि कांहीं दिवस होऊन, दक्षिणी फौजांस आब चढला, हेंहि पाहिलें. सरकारांत कोट्यावधीचा प्रांत व द्रव्य व सरकार वांटणीचे कमाविसदार गोविंद बल्लाळ आदिकरून बसून, क्रोडों रुपये रसदा सरकारांत बैलावर गोण्या भरून रुपये जात होते. सांप्रत तोच काळ ऐसाहि जाला, कीं जसें पादशाईंत लोकांनीं आमच्या फौजांचें सामान बाळगूनहि हिंदुस्थान हलकें व पराक्रमरहित आपसांत केलें, तसें इंग्रजी सामान बराबर बाळगून, आपल्या फौजा निरवीर्यवजें आहेत. ते इंग्रज ऐसे मनांत येऊन त्यांचें विलायतीस बळ पाहून, त्यांचा आब वाढवून, आपसांतील पारिपत्यास त्यांजला भागीदार करून, किल्ले, कोट त्यांचे स्वाधीन केले. बंगाल्यापासून अयोध्या भागिरथी पारवार दिल्लीपर्यंत भागिरथी परतीरीं होते. ते अंतरवेद उर्वरित राहिली होती. तेहि त्यांच्या कबज्यांत गेली. व तह खर्चाची फाजल सरकारांत व आपल्या आपल्यांत उच्छेद उभयपक्षींच्या फौजा नाकारल्या, ह्मणून इंग्रजी सामान पुस्तपन्ह्यास–ऐसाहि काळ व तोच पराक्रम. वृद्धि होते; व उभयपक्षीं अहंभाव हेच होऊन बाहु स्फुरण होतें. त्याचा पल्ला काय ? व बदनक्षी व अविचार काय ? वडिलावडलीं चाली ह्या होत्या कीं काय ? तेव्हां चाली टाकून अर्थ उभयपक्षीं घडतात, याचे विचार श्रीमंतांनीं करावे. वडिलांवडिलीं चालीनें कल्याण, उर्जित व नांवलौकिक मिळाले, किंवा ह्या चाली उर्जित भाग्याच्या व चांगल्या ? यद्यपि उर्जितसे दोन दिवस वाटले तरी श्रमदायक उभयतांस, हे विवेक ज्यांनीं सरदाऱ्या कराव्या त्यांस असावे. व खांवदांनीं करून वागवावें. व आह्मांस काय म्हणतां !" तेव्हां बोलिलों कीं, "इतके आदेश आपले ध्यानांत, तेव्हां आपले स्वाधीन नसले तरी आपण तुकोजीबावांस वडील, धनी आहांत. इतःपर सरकार आज्ञेची अवज्ञा नसावी. पुढें पाटिलबावाहि या प्रांतीं येतील. भेटी आपल्या त्यांच्या होतील. त्यांनीं समेट विवेकेंकरूनच केली, व फौजा माघाऱ्या नेल्या. आपणहि तुकोजीबावांस सांगून विवेक करून, सरकार आज्ञेप्रमाणें मोहिमेस जावें." याप्रमाणें बोलणीं विस्तारें होऊन, इंदुरास आलों. यांच्या भेटी जाल्या. त्याचभावें कमकसर हेहि बोलले. बाईचें यांचे विचारें सरकार आज्ञेप्रमाणें मोहिमेस गुजराथ प्रांतीं फौजांचा शह टाकून जावें. सरकारांतून उपराळा हिंदुस्थान अन्वयें करावा, अथवा आह्मांस मारवावें हेंच असल्यास न करावा. तेव्हां थोडा बहुत होईलसें होऊन, मसलत मान्य करून, राजश्री काशीराव होळकर यांसी डेरेदाखल केले. खांसा बाईचे दर्शनास महेश्वरास जाऊन सत्वर फौजांत जाणार, सदरहुअन्वयें

सरकारांत लिहिलें. साकल्य तुह्मांस कळतच असेल. पाटिलबावांनीं मनःपूर्वक निर्मळ व्हावें. पूर्व चालीप्रमाणें निर्वाहांत यावें, हेहि भाव आहेत. बाईचे हातें जें होईल, तें पक्केंच घडेल. महेश्वरीं जाऊन उभयतां एक जाल्यावर होईल तें लिहूं. चांगला योग असल्यास आह्मीच येऊं. उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति."

लेखांक २.

श्रीराम. ता. १ दिसेंबर इ. स. १७९३.

"पुरवणी स्वामींचे सेवेसी विनंति ऐसी जे, महीश्वरीं येऊन गंगाजळनिर्मळ अहल्याबाई यांची भेट घेऊन राजश्री तुकोजीबावा सुभेदार यांचें करण्याचे भाव ध्यानास आणितां बोलणें करणें, तो पक्कविचार व शाश्वत बुद्धि व दुरआंदेशा बाईपाशींच. बावापाशीं शेरपीठपर्यंत येथून जाईल तो कालक्षेप! कायम मिजाज किंवा मसलतीस पक्कता यासी ठिकाण नाहीं! सर्व काळानुरूप जालें आहे! पुढेंहि सिद्धीस जाणें तें बाईखेरीज कांहींएक जाणें नाहीं. असें ध्यानास येऊन, त्यांसीच बोलणीं खचित करून, राजश्री तुकोजीबावांचा दस्तऐवज आणविला, कीं जें बोलणें तें मातुश्री साहेबाशीं बोलावें. कारभारी राजश्री शिवाजी गोपाळ व पाराशर दादाजी तेथेंच आहेत. निश्चयांत आणावेसें करून बाईशींच आधीं अवसानार्थ, बोलून पक्काई विचाराची खचित. कारभारीयासहित बाईचे ध्यानांत येऊन, सरकार आज्ञा व आपला विचार त्याखेरीज दुसरा अर्थ किंवा लगमसलती खेरीज धरूं नये, ऐसी पक्कता दृढ होऊन, बाईनीं राजश्री बाबाजी निंबाजी विद्यमानें पाराशर दादाजी, यांस इंदुरास पाठवून, तुकोजीबावाशीं बोलणें होऊन, मसलत सरकार आज्ञा होईल उभयतांचे विचारें तें मान्य म्हणून, बाईचीं पत्रें तीन, एक सरकार व दोन उभयतांचें नांवें व त्याचप्रमाणें बाईचीं पत्रें एक सरकार व दोन उभयतांचे नांवें एकूण सहा पत्रें, व चार पुरवण्या दोन मसलत संबंधीं उपराळ्यास फौजा देऊन, पुस्तपुन्हा मसलतीचा करावा. ज्याप्रमाणें तिकडे आहे तदन्वयें इतिहासयुक्त व मसलती सरकारच्या कराव्या. त्या पूर्वीपासून मोठालीं कामें, सरकारचाकरी या उभयतां सरदाराकडील वडिलावडिलीं होत आल्या, सरलेरांत पैका देतच आलों; सरकारांत फाजिलें काढून सरकार आपले देणेदार पूर्वी केलें नाहीं. पुढेंहि कोणें करूं नये. येविषयीं दस्ताऐवज गोऊन घेऊन, पुरवणी पत्रें दोन, एकूण चार पुरवण्या बाईचें नांवें स्वामीस एकूण दहा होळकराकडील; व दोन पत्रें माझे नांवें, एक तुकोजी होळकर यांचें माझें नांवें, व एक बाईचें मजला आलें होतें. तें एकूण दोन पत्रें सदरहू बारा पत्रें व कच्चें वर्तमान वर्तलें त्याच्या पुरवण्या चंद्र २२ रविलावलीं डांकेंत वि॥ राजश्री केसो भिकाजी रवाना जलद साता दिवसांत पावून, साता दिवसांत उत्तरें यावीं कीं, त्या अन्वयें येथें घडे व पुन्हां जलद उत्तरें येत जात, त्या पत्रास एक महिना चार दिवस जाले, अद्याप उत्तर न आलें. बाईकडील पृच्छा

व सुभेदाराकडील पृच्छा वारंवार प्रतिउत्तराविषयीं होतच आहे. सेवकाची मार्गप्रतीक्षा पत्राकडे ! उत्तरें न येतां सेवकाची मातबरी, विश्वास वाढणें सर्व स्वामींचे कृपेचे उपराळ्यावर आहे. तेथील कामें काजें अनेक, त्याजमुळें किंवा श्रीमंत राजश्री तात्याची प्रकृति कांहींशी ठीक नव्हती ह्मणून कळलें. याजमुळें, किंवा पत्रेंच पावलीं नाहींत, मध्यें घायाळ जालीं त्याजमुळें, असे अनेक तर्क चित्तास होऊन चिंताग्रस्तता जाली. उत्तरीं कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. त्यानंतर राजश्री तुकोजीबावा यांसी राजश्री नारो कृष्ण शेणवाई निसबत शिंदे यांनीं बोलणें लाविलें कीं, तुमचे स्नेहाची मजबुती पाटिलबावांशीं करून देतों. तुम्ही एक पाटिलबावास पत्र लिहून द्यावें. येविषयीं तुकोजीबावांस विचार असावा कीं, नारो कृष्ण पात्र केव्हढ्याचें, याचे स्वाधीन पाटिलबावा तरी किती, व एवढा कलह वाढलेला, दरबारीं वाद पडलेला, सरदारांचीं पत्रें परस्परें येणें जाणें बंद. पुण्यांत राजश्री दादाजी गंगाधर यांची भानगड, अंतस्त सहा महिने कमकसर चाललीच आहे, त्याचा थांक लागून काय जालें ? सरकार संमंधीं बोलणें होतच आहे. असें असतां नारो कृष्णाचें बोलणें परिणाम काय लावील, हा आंदेशा न करितां, महेश्वरीं बाईस न विचारितां, आपलें पत्र राजश्री पाटिलबावांचे नांवें मशारनिल्हे यांसी लिहून दिधलें कीं, त्याजकडून तपशिलें लिहिलीं कीं, समेट करावी. आज्ञा कराल तर तुकोजीबावाकडील मातबर घेऊन येतों. याप्रमाणें येथें खंडो महादेव फडणीस दि॥ पारनेरकर यांजकडील कारकून आहेत, त्यांचे विद्यमानें राजकारण करून, पत्रें रवाना करून, बाईस पत्रें तेथील जाब येऊन भाव पुरता न समजून घेतां पाठविलीं कीं नारो कृष्ण वकील निसबत शिंदे यांजसमागमें राजश्री पांडुरंग शंकर यांजला द्यावयास्तव येथें पाठवावें. याप्रमाणें पत्रें पाठविलीं. तेव्हां बाईस विचार पडला कीं, पत्रें रवाना पुण्यास जालींच आहेत. सरकार दाखल्याखेरीज कारभारी यांच्या विचाराखेरीज कांहींच आम्हांस करणें नाहीं. तथापि, तुकबाचें पत्र आलें आहे. ज्ञान तेथील समजलें आहे. तुम्ही तेथपर्यंत जावें. त्याची भेट घेऊन राजकारण भानगडी ध्यानास आणून, मुख्य श्रीमंतांची आज्ञा मसलतीची त्यांचीं पत्रें रवाना केलींच आहेत. इतःपर स्वारीस निघावें. या तगाद्याचीं बोलणीं रगडून बोलून बाहेर काढण्याची तजवीज सत्वर करावी. तों राजश्री पाराशर दादाजी याशीं येथून महालचे रसदाचा भरणा पुरवून, सावकार एक दोन बराबर देऊन, फौजेची समजावीस करून, तोफखान्यासुद्धां सिद्धतेस रवाना करितें. म्हणून बोलून महेश्वरींहून रवाना बहुत ममतेनें खातरजमा करून केलें. येथें आलों. सुभेदारांनीं राजश्री रामराव आपाजी पळशीकर लष्कराबाहेर अर्ध कोस सामोरा पाठविले, त्यांची भेट होऊन त्याजसहित डेऱ्याशीं आलों. तेथें डेऱ्याचे बाडापाशीं ज्येष्ठ चिरंजीव राजश्री काशीराव होळकर यांजला पुढें पाठविलें. त्यांच्या भेटी होऊन मुख्याची भेट जाहली. पूर्वीपासून चाल सरदारांस वस्त्रें द्यावयाची आमची आहे, त्याअन्वयें चार

वस्त्रें दिधलीं. दोन घटका बसून राहुटीस मुक्काम त्यांनीं करविला. तेथें आलों. राजश्री नारो कृष्ण निसबत पाटिलबावा व राजश्री बाळाजीपंत कात्रे भेटीस आले. त्यांच्या भेटी जाल्या. बोलणेंहि कार्याकारण जालें. राजश्री बाळाजीपंत कात्रे यांजकडील मजकूर बोलण्याचा समजून घेतला, व स्वामींनीं पत्र त्याजवळ मजला दिधलें होतें, तेंहि मशारनिल्हेनीं दिधलें. आज्ञेप्रमाणें वर्तणूक होईल म्हणून मशारनिल्हेस सांगितलें. उपरांत दुसरे दिवशीं तुकोजीबावांनीं बोलावूं पाठविलें. गेलों. बोलणें जालें. त्यांत प्रथम आज्ञा काय पुसली ! उत्तर केलें कीं, तीन आज्ञा आहेत. त्याचें बोलणें बोललों. तेव्हां उत्तर करूं लागले. त्यांत परम श्रमी ! मजला देशीं मसलतीस ठेऊन कारभारी यांनीं खराब केले. शिंद्याशीं झुंजूं नका, ऐसी थांबाथांब करून, चार चार बंद पत्रें व दादाजी गंगाधर यांजकडून लिहविलें. त्याजवरून झुंज केलें नाहीं. यास्तव तहबारी खर्चाची होऊन ही दशा जाली ! हीं भाषणें बहुतच श्रमयुक्त जालीं. ते दिवशीं शांतवन समाधान करून विशेष न लांबवितां घरास आलों. दुसरे दिवशीं बोलावूं पाठविलें. बोलणें समजुतीचे अर्थ मसलत संमंधीं वगैरे जितकें बोलावयाचें होतें तें बोललों. तथापि बहुवशता फार, व करण्याचा प्रकार एक सुद्धां नाहीं ! कैलासवासी मल्हारजी होळकर सुभेदार यांची तऱ्हा बोलण्याची आणून बोलूं लागले. उपरांत एकांतीं खंडोपंत व आपण रात्रौ बसून बोलूं लागले. ममतेंत घेऊन पुढें कर्तव्यता कल्याणाची कोणती विचारीत आहेत, ती घरोब्याचे रीतीनें व खंडोपंतास ममतेंत घेऊन विचारिलें. तेव्हां मुख्यत्व नारो कृष्णाचे विद्यमानें भानगड आहे ह्मणून बोलले. ती तऱ्ही पक्के आहे कीं काय ? तर 'आहे' म्हणून सांगितलें. तेव्हां नारो कृष्ण सेणवाई यांचे हातें बोलणें लावितां, तेथें दादाजी गंगाधर यांजपेक्षां, तुह्मी कारकून पाठवाल त्याची मातबरी व नारो कृष्णाची वाढेल कीं काय ? असें ह्मणून त्या दिवशीं बोलून आलों. दुसरे दिवशीं नारो कृष्णाची भेट जाली. त्याचा माझा पूर्वींचा दंडक आहे. त्यास पुसलें. त्यानें सांगितलें कीं, मजला बोलावून खंडोपंतांनीं सुभेदारापाशीं नेऊन भानगड लाविली. म्यां सांगितलें कीं, आपलें पत्र लिहून द्यावें. पाटिलबावांकडे पाठवून तपशिलें लिहितों. त्याचें उत्तर येईल तदन्वयें धन्यांनीं बोलाविल्यास तुम्हांकडील जो कोणी द्याल, त्यास घेऊन जाईन. त्याचीं उत्तरें मजला आलीं व यांचेंहि पत्र आलें. तेंच बजिन्नस दाखविलें. त्यांत नारो कृष्णाचे पत्रीं स्पष्ट लिहिलें कीं, दादाजी गंगाधर अंतस्तचें बोलणें बोलतात; त्यांत जीव काय पडेल व सिद्धीस काय गेलें, तें पुरतें पाहून तुम्हांस लिहूं. तूर्त तुम्हीं कांहींएक न बोलणें. बाईचें बोलणें आल्याखेरीज सार्थक नाहीं. याच अन्वयें राजश्री आबा चिटणीस यांनीं व लष्करांतून गोपाळराव रघुनाथ यांनीं लिहिलें, व सुभेदाराचे नांवें पत्रोत्तरें पाटिलबावांचें. त्यांत आपलेकडील दुसरा अर्थ नाहीं; तर आह्मांकडीलहि नाहीं. राजश्री दादाजी गंगाधर येथें आपलेकडून बोलणीं बोलतच आहेत म्हणून उत्तरें आलीं, तीं सर्व पाहिलीं.

नारो कृष्णास पुसलें कीं, तुह्मी जातां कीं काय? त्यांनीं सांगितलें, मजला धन्याची आज्ञा नाहीं. सुभेदार व खंडोपंतास स्पष्ट सांगितलें कीं, अगोधर बाईचें संमत पक्केपणें माझे प्रत्ययास आल्यावर, उपरांत धन्यास व आबास लिहीन. तेथून आज्ञा ज़ी येईल तदन्वयें बोलणें ह्मणून स्पष्ट सांगितलें. तेव्हां फजीत जाले. बाईशीं बोलण्यास ठिकाण नाहीं. आह्मांस सांगितलें, त्यास ठिकाण नाहीं! बाईनीं पूर्वी भविष्य केलेंच होतें व बाईचा निश्चय, जें करणें तें सरकारांत दाखला देऊन, तेथील विचारें करणें. कालानुरूप तें तुम्हांस घराऊ विचार पुसून होईल. तूर्त फौज तयार करून, बाह्य विरुद्ध मोडून, मसलत गुजराथची करणें व फौज ताजी करणें, व सरकार आज्ञेप्रमाणें कलह न करणें. हाच विचार सर्वोपरी उत्तम तोच सिद्ध करावा. आह्मांस सरकार आज्ञा आहेच व बाईचेंहि संमत जाहलेंच आहे, तेव्हां सुभेदारास सक्ती स्वारीस निघण्याविषयीं सांगितली. तेव्हां उत्तर प्रत्युत्तर पूर्व बोलिल्याप्रमाणें करूं लागले. थोडे सक्त व त्यांचीं कर्तुत्वें त्यांचे आंगीं लाविल्याखेरीज सोईस येत नाहींत, असें पाहून, तसेंहि बोलून सरकारानें अगर कारभारी यांनीं आपलें कल्याणच केलें आहे. आपण इस्तकबिल सरदारी चाली चुकत गेलां व सरकारांतून संरक्षण व चालढकलच होत गेली. तीं कलमें आंगीं एक एक पुसपुसून लाविलीं. त्याचा तपशील आलादा कलमवार विनंती लिहिली आहे, त्याजवरून ध्यानास येईल. त्यांनीं पाटिलबावांकडे शब्द आणावयाचा मजकूर थोडा थोडा बोलिले. तेहि संदर्प शुद्ध कलम लिहिलें आहे. सर्व उपयोगानुरूप तेथें करणें, तें स्वामी करितील. हीं बोलणीं होत गेलीं. त्यांत बाईकडील उपराळा पत्रें सरकार लक्षानुरूप आज्ञा करितील तें करावें, हींच येत गेलीं. तेव्हां मसलत मान्य करून, आह्मांकडील बोलणीं जालीं तीं विस्तारें बाईस श्रुत करून जसें सांगतील तसें करावेंसें होऊन, राजश्री आनंदराव माधव कारकून महेश्वरास तुकोजीबावांनीं पाठविले. ते बाईशीं बोलून बाईचें संमत पुरतेपणें होतेंच. राजश्री पाराशर दादाजीस ऐवजाची तरतूज करून रवाना केलें. व खासा तुकबांनीं निघावें शरीरास स्वस्त, वायूचे उपद्रव नाहीं, तथापि तसेंच निघावेंसा सिद्धांत करून पत्रें लिहिलीं व पाराजीपंतास सांगितलें. त्या अन्वयें सिद्धतेस लागले. मसलत कबूल केली ह्मणून दोन तीन वेळां आम्ही व बाळाजी काशी कात्रे व आनंदराव वकील व त्यांचे घरची मंडळी व चिरंजीवासहित बसून सांगितलेंच होतें, व पुन्हां सांगून मुहूर्त पहावयासी जोशी यांस कार्तिक वद्य १३ रविवारीं सांगितलें. सरकारांत पत्रें द्यावीं कीं डेरे दाखल जालों म्हणून. त्यास बाईनीं मजला पत्र लिहिलें आहे. त्यांत पूर्वी पत्रें लिहिलीं आहेत, त्याचीं उत्तरें यावयाची मार्गप्रतीक्षा आहे. तोंपर्यंत कांहीं मसलतीचे सिद्धतेची पैरवी व डेरेदाखल होणें वगैरे निदर्शनास कांहीं आणून पत्रें लिहिल्यास गोडीस पडेल. तेंच पत्र बजिन्नस स्वामीकडे रवाना केलें आहे. मुख्यत्वें बाईस अभिमान पूर्ण पडला आहे कीं, मल्हारजी होळकराचे निशाणाचा

आब गेला, तो सरकारचाकरी मसलतीनें आणावा. आपण आहों तों, आब आहे त्याप्रमाणें संरक्षण करावा. सरकारचाकरीस बेउजूर असून कारभारी याचे विचारें सांगतील तसें चालावें. सुभेदाराचें शरीर अर्धें वायूनें गेलें आहे. तशीच तजवीज व कायममिजाजी व मसलतीचा अर्थ जाला आहे! व जेष्ठ चिरंजीव काशीराव त्यांचा एक हात पाय वायूनें कमी जन्मतांच आहे, व तद्वतच बुध्य, मसलत, कायम-मिजाजी आहे!! कनिष्ठ चिरंजीव मल्हारराव त्यांची अवस्था सर्व स्वामीस विदित. जघन्यच आहे, तेंच आहे. बापूजी होळकर पुतण्या आहे, तो मात्र स्वारीशिकारी चाकरीच्या उपयोगी. त्याचे ठिकाणीं यांसी द्रोहबुद्धि विशेष याजला जाली आहे कीं, माझे पुत्र मागें पडतील. यास्तव पुत्रांस रुढीस घालावें. पुत्र जेष्ठ रुढीस घालावे, तर कनिष्ठ मल्हारराव ह्मणतात कीं त्यास जिवें मारीन. जेष्ठ पुत्र म्हणतात कीं, मी जेष्ठ, टिक्याचा धनी. मजला रुढीस न घातल्यास गोसावी होऊन छत्रीपाशीं बसेन. हें जेष्ठाचें भाषण! मुख्यास पुत्रमोह विशेष जाला! व्यसनासक्ति सर्वांस. मादक वस्तूचा संग्रह! तेव्हां सर्वांस जमा करून आह्मीं सांगितलें कीं, यानें बहुतांचे नाश जाले. आपण संग्रह करितां, हें ठीक नव्हे. समय काय गुजरला आहे, व अभिमानरहित होऊन तोच उद्योग चालणें उचित नाहीं. आपलें रुबरू कोणी बोलत नाहीं, परंतु जग विरुद्ध जालें आहे. सुभेदार कैलासवासीचे पुण्याचे पुंज बहुत होते, त्याचा खर्च होत होत आपणहि तेंच पुण्य खर्चितां! पापोत्कर्ष विशेष जाहला. पुण्यसंग्रह सरत आला. तुह्मी सरदार थोर, केवढे तुमचे मान, थोरपणा, त्यास हा बट्टा आहे. ह्मणून पुत्रसहित जमा करून बोलणें झालें. त्याजवरून पुत्रांकडून आपण श्रीमंतांचे पांयांची व बाईचे पांयांची व श्रीमार्तंडजीचे पायांची शपथ करून, दरोबस्त लष्करचीं दुकानें उठवून, प्रांतांत दरोबस्त मनाई राज्यांतील शिरस्तेप्रमाणें चिट्ठीवेगळी विक्री होऊं नये याप्रमाणें ताकीद निक्षून जाली. याप्रमाणें पंधरा दिवस चालतें. जमा प्रांताची दहा हजारांची कमी झाली. बाईसहि संतोष जाला. मुख्य या दौलतीस अहल्याबाईचें पुण्य, धर्म व बुद्धि, कायममिजाज, एकवचन व श्रीमंताचे चरणीं निष्ठा व लौकिकावर दृष्टि कर्तृत्व व पुरुषार्थ आहे; व स्वामीचा पुस्तपुन्हा ममतायुक्त असल्यासच निर्वाह आहे. दौलत खराबींत फार आली व ज्यांनीं मसलत कराव्या त्यांचा अर्थ असा. बाईनीं आब भरला आहे. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. सेवेसी श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३.

श्रीराम. ता. २५ दिसेंबर इ. स. १७९२.

"पुरवणी श्रीमंतराजश्री नानास्वामीचे सेवेसीं विनंति कीं, स्वामींहीं कृपा करून पत्रें पाठविलीं. ते छ १८ जमादिलावलीं पावलीं. त्यांत मजकूर कीं, "सरदारी मोठी, उगेच रिकामें बसणें, यांत लौकिक नाहीं; व खराबी होते. विना मसलतीशिवाय

उस्तवारी होत नाहीं. व परस्परें सरदारांत वैमनस्य जालें. त्याचेंही निराकरण होत नाहीं. हें जाणोन तुह्मांस रवाना केलें. तीन प्रकार सांगितले, त्याप्रमाणें तुम्हीं बोललां. त्यांचे विचारास बरें वाटलें, असें तुमचे लिहिण्यांत आलें. त्यास, पटाल्याकडील मसलत चांगली. पूर्व चाल सुटत नाहीं. भाऊपणास चांगले. परंतु ती मसलत निर्वेध शेवटास जाणार नाहीं. उगाच खलश वाढतो. याजकरितां गुजराथची मसलत करावयास गुण बहुत येतात. सरदाराची उठवण मोडेल, लौकिक मोठाच होईल, सरकारकामही होईल. स्वतंत्र, कोणाचा वेध नाहीं. इतके गुण आहेत. याविशयींचें तुम्हांसीं बोलणें जालेंच आहे. सरकारांतून पुस्तपुन्हा व्हावा असें ह्मणणें, त्यास पुस्तपुन्हा होईल. सरकारचा सरंजाम थोडाबहुत घ्यावयास येईल. याविषयींचें पूर्वीं बोलण्यांत तुम्हांसी आलें आहे. व राजश्री बाळाजी काशी यांस लिहिलें आहे. वांटणीचा मजकूर, तर गुजराथेंत वांटणी पूर्वींपासून सरदारास नाहीं. जें सुटलें तें सरकारचें. त्यांत हिस्सा नाहीं. तेव्हां वांटणी मागूं नये. सरकारकाम करावें. याप्रमाणें व्हावें. यांत बहुत गोष्टी आहेत. सरदारीची उस्तवारी व्हावी, लौकिक व्हावा, यास्तव हा मनसबा मनन करून ठरविला. चांगला आहे. करावा हें उचित आहे. तुह्मीं लिहिल्याअन्वयें खोदून बोलावें आणि गुजराथचे मसलतीचें ठरवावें. होईल तें लिहून पाठवावें. मसलतीचे विचारें चांगलें वाटलें तें लिहिलें असे. याशिवाय भाग सुटत नाहीं. वरकड पूर्वचाली बाईनीं लिहिल्या व पराक्रम केले, सरकार नफे जाले, ह्या गोष्टी खऱ्या आहेत. लोपल्या नाहींत. परंतु तेव्हां दुई नव्हती. त्यानें नीट दिसत होतें. आतां तसें असतें, तर कोणेही गोष्टीचें संकट न पडतें. परंतु तसा प्रकार राहिला. नाहीं तेव्हां कसें करावें ? महेश्वरींच राहिलें असतां, लौकिक राहील कीं काय ? याचा विचार मनांत यावा. जसी सरदारी, तसें काम करावें. यांतच सरदारीचें स्वरूप व बोज असें जाणून, हा पक्ष योजनेंत आला आहे. याप्रमाणें घडल्यास चांगलें. तुम्हीं बोलावयाचे रीतीनें उलगडून बोलून याप्रमाणें घडवावें. यांत सर्व गोष्टी आहेत. होईल तें वरचेवर लिहित जावें. राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व गंगाजळनिर्मळ अहिल्याबाई यांच्या पत्रांचीं उत्तरें पाठविलीं आहेत. प्रविष्ट करावीं ह्मणून आज्ञा." त्यास आज्ञेप्रमाणें यांचे डेरे मार्गशीर्ष शुद्ध एकादशीस बाहेर गुजराथच्या रोखें देविले, व वद्य ६ सोमवारीं राजश्री सुभेदाराचे चिरंजीव ज्येष्ठ काशीराव होळकर डेरेदाखल केले. एक कोसावर मुक्काम जाला. फौजा दरोबस्त सामानानिशीं होऊन तेथें जातात. तेथून पुढें कूच. फौजा व राजश्री काशीराव, बापुजी होळकर यांचें कूच होईल. सांप्रत लग्न राजश्री मल्हारराव होळकर यांचें व बापुजी होळकराचे बंधूचे कन्येचें, तेही काल छ २० व छ २१ मीनहूस जालीं. इतःपर सत्वर कूच सुभेदारांचें होऊन महेश्वरास गंगाजळनिर्मळ अहिल्याबाईचे दर्शनास चालतील. राजश्री सुभेदार यांणीं मसलतीस जाण्याचा निश्चय बाईचे विचारें करून, श्रीमंतस्वामीचे नांवें व स्वामींचे नांवें

व राजश्री तात्यांचे नांवें पत्रें लिहून पाठविलीं आहेत. पावतील. त्याजवरून कळेल. पुस्तपुन्हा व...कुमकी फौजा व तोफखाना वगैरे उपराळ्याची तजवीज सत्वर व्हावी. दिवस मसलतीस राहिले थोडे. बाईच्या यांच्या भेटी होऊन सकलार्थ सेवेसीं लिहूं, व पत्राची उत्तरें तपशीलें पाठवितों. हल्लीं मसलतीचे मान्यतेचीं पत्रें पाठविलीं आहेत. इतःपर गुंता राहिला नाहीं. राजश्री पाटीलबावांकडील चाल पूर्व चालीनरूप घडून, खलश न राहे, आलीकडील वेध पडले ते निर्वेध होण्याचे अर्थ स्वामी करतील, व तिकडूनही सरकार आज्ञेस उजूर होणार नाहींत. विशेष होईल ते आज्ञेप्रमाणें लिहित जाऊं. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४.

श्रीराम. ता. २४ जानेवारी इ. स. १७९४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:--विनंति येथील अर्थ साकल्य पय दरपय लिहिल्यावरून ध्यानास आलेच असतील. तात्पर्य, कारभारी कोणी वजनदार व विचाराचा माणूस, नारो गणेश गेल्यापासून नाहीं. मुख्य सरदारांनीं यावत् जन्म परस्वाधीन होतसाता, नारो गणेश यांचा निर्वाह केला. तेव्हां त्या रकमेचा कोणी उभा करावा, तें न करितां मनुष्य गेला, याचे बुद्धीचा करण्याचा श्रम राखून ऐषपोषी जाली होती. त्या अलीकडे पाराजीपंतास गळबंधन नांव मात्र. ते द्विपाद दावे तोडितात. सांप्रतचे प्रसंगीस असून उपयोग नाहीं. यास्तव सरदाराची (अनभव बाईस) बाईनीं फौजेचा बंदोबस्त करितील ह्मणून......ऊन हक्कवार करून महेश्वरीहून संतोष करून पाठविले. त्यांनीं येथें येऊन फौजेंत उलटी मलई करून शिलेदार वगैरे बहकाविले. यास्तव बाईचीहि त्यांचे ठिकाणीं अनास्था जाली. मुख्य सरदाराचे बुद्धीचा स्तव ! शाश्वत बुद्धि आजची उद्यां नाहीं ! महद गुणांतील गोष्ट एक ! दुसरें, स्वतः बुद्धि नसतां मनसब्याचे कल्प बोलतात. तें कर्णेंकडून श्रवण करितां आश्चर्यरूपी. परंतु खासा बहुत आपल्यावर आपण संतोष मानून रिझतात. व मसलती चुकल्या त्या कपाळावर घालून, विवेक करून, इर्षा सर्व टाकली, हा दुसरा गुण. तिसरें द्रव्यलोभ अतिशय. येवढें श्रमांत येऊन सर्वस्व गतश्री व्हावेंसें जालें असतां, जवळ दहा बाराचें वित्त आहे तें प्राणापलीकडे व अब्रूहून पलीकडे ठेविलें. तें न काढतां, बाईकडील मार्गप्रतीक्षा सहस्र फजित्या सोसून, दौलत बुडते हें ध्यानास न आणून, जात जात जाऊन राहील तितकें पहिलें अव्वलास फार मानून, विवेक करितात ! चवथे, पुत्रमोह अतिशय होऊन चांगलें माणूस नाहींच. आहेत त्यांचा द्रोह अत्यंत! उत्पन्न व हलकें मनुष्य इ॥ राधीरक्षा मुख्य सल्लागार, ता॥ खिजमतगार यांचीं सांगणीं सर्वोत्कर्ष!! असे चार गुण. दवलत तारावयाचे व वाचवायाचे गुण क्रिया एक बाईचे पांयाशीं ! कार्याकारण वरकड स्मरणच नाहीं. शरीर केवळ गेलें. दोघां मनुष्यांनीं उठवावें, बसवावें, ही दशा आहे. येथें आश्रय पुढें चांगले चालीचा व धर्माचा व पतीचा व कायममिजाजीचा सर्वांचें लक्ष रक्षावयाचा गुण जो कांहीं आहे, तो बाईत.

बुद्धि व कल्याण अकल्याण समजणें व मल्हारजीबावांचे लौकिकास जपणें तेथें आहे. सरदारांची त्यांची गांठ पडल्यावर बाईचे दाबानें हे मार्गावर येतील. व माणसाची नेमणूक नवी करणें अथवा जुन्यांतच योजना होणें, तें तेथें होऊन कारवाईचें ठरेल, तें विनंति लिहूं. मुख्यत्व सरकारचा उपराळा पेशजी विनंतीपत्रीं लिहिला, तदन्वयें होऊन......मनःपूर्वक असावें. श्रीमंत स्वामींचा प्रताप व बाईची निष्ठा श्रीमंतांचे चरणीं, व धर्म व मनसवा व बाई पुस्तपन्ह्यावर. तेव्हां क्रोडो खर्चून मसलत सिद्धीस नेईल, हा भ्रम व दहशत......येत जाईल. तेणेंकडूनहि बहुत कार्यें घडतील. येथें ऐवजाची भरती समजाविशीस पाहिजे. कित्येक पोंहचले नाहींत तों बाईशीं बोलून त्याचे धरबंद जाले पाहिजेत. यास्तव यांनीं बहुत आग्रह जाण्याविषयीं केला. त्याजवरून बाईस पत्रें लिहिलीं, त्याचीं उत्तरें आलीं. तींच बजिन्नस सेवेसीं पाठविलीं आहेत. त्याजवरून सर्व अर्थ श्रुत होईल. मुख्यत्वें बाईचें लक्ष सरकारमसलतीवर चांगलें आहे. परंतु सरदार, सरदारीचे निभावणी व कारभारी यांची दशा सेवेसीं साकल्य लिहिली आहे. महेश्वरीं याजला सक्ती करून बाईपाशीं नेतों. तेथें गेल्यावर तऱ्हा ठरेल तें साकल्य सेवेसीं लिहूं. चंद्र ११ जमादिलाखरीं राजश्री तुकोजीबावा सुभेदार यांचें कूच महेश्वरचे रोखें, इंदुराहून तीन कोस बिजलपुराहून पुढें, एक कोसावर मुक्काम जाला; व राजश्री काशीराव यांचा मुक्काम दोन कोसांवर गुजराथचे रोखें होता. तेथून निघून कोस पुढें इंदुराहून पुढें गुजराथचे रोखें चार कोसांवर, उदयीक आमची रवानगी गंगाजळनिर्मळ बाईकडे. घराऊ कित्येक बोलणें यास्तव करितात. तेथें पावल्यावर हेहि सत्वरच येतील. सेवेसीं श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५.

श्रीराम.　ता. २१ फेब्रुवारी इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः— पे॥ देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत चंद्र २० रजब पावेतों मुक्काम महेश्वर स्वामी कृपेंकरून यथास्थित असों विशेष. स्वामींनीं कृपा करून पत्र चंद्र १२ रजबचें पाठविलें, तें येथें चंद्र १९ मिनहूस प्रातःकाळींच पावलें. पत्रीं आज्ञा कीं, पाटीलबावांस नऊ दहा दिवस फार ज्वर आला. माघ शुद्ध १३ त्रयोदशी बुधवारीं प्रातःकाळीं वायूची भावना जाहली. सरकारांतून वैद्य पाठविले, उपाय बहुत जाले, परंतु होणारास इलाज नाहीं. त्याच दिवशीं आवसीचे प्रहर रात्रीस काल जाला! मोठी वाईट गोष्ट जाली!.! इश्वरी इच्छेस इलाज नाहीं!! हीं वर्तमानें हिंदुस्थानांत गेल्यावर तिकडे गलबल होईल, याजकरितां राजश्री तुकोजीबावा सुभेदार यांस पत्रें सरकारचीं व आमचीं व राजश्री हरीपंत तात्याचीं याप्रमाणें लिहून पाठविलीं आहेत. तुह्मी पाहून सुभेदारास देऊन, गंगाजलनिर्मळ अहल्याबाई यांस व सुभेदाराशीं बोलून फौजेची तयारी करावी, आणि तिकडे पाटीलबावांकडील सरदार आहेत त्यांस

पत्रें पाठवावयाचे सुभेदाराचे पत्रीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें पत्रें जावीं. सुभेदाराच्या पत्रांचीं उत्तरें घेऊन पाठवावीं ह्मणोन पत्रीं आज्ञा.'' ऐसीयासी, हें वर्तमान राजश्री दादाजी गंगाधर यांनीं खेतसी सावकार याचे दुकानीं पत्रें रवाना केलीं, तीं चंद्र १८ मिनहूस सायंकाळीं पावलीं. ते समयीं वर्तमान श्रवण जालें. सरकारचीं पत्रें जांबचे घाटापर्यंत जाऊन परतून येथें आलीं, तीं चंद्र मजकुरीं प्रातःकाळीं पावलीं. आकस्मात ईश्वरें परम अनुचित केलें. या प्रसंगीं हा प्रकार घडणें सहसा ठीक नव्हतें. मारवाडी, जयनगरवाले वगैरे जमीदार आपलाले जागां बहबाहा होऊन लवाज्या कराव्या ऐसें इच्छितात. स्वारी त्या प्रांतीं राहिली, यामुळें त्यांत हा प्रकार फारच वाईट जाहला. सर्व एक पेटी, दुसरीकडील अर्थ करण्याचा सर्वत्र सिद्धांत, अशीं मनुष्यें परम दुर्लभ! श्रीइच्छा प्रमाण. आज्ञेप्रमाणें पत्रें प्रविष्ट केलीं. त्यांनींही वर्तमान ऐकतांच, नौबतखाना बंद करून स्नान केलें; श्रम मानिले. आज्ञेप्रमाणें पत्रें रवाना जागा जागा, जोड्या मुजरद रवाना, पाटीलबावाकडील चवघे सरदार जिवाजी बल्लाळ, गोपाळराव रघुनाथ, खंडेराव हरी, अंबोजी इंगळे यांस पत्रें खातरजमेचीं व फौजा येऊन पोहोंचतील, तुह्मी खातरजमा राखावी व राजेरजवाडे यांशीं दावाचीं व पादशहास आर्जी व शहाजीस पत्रें व दुभाई साहेब इंग्रेज यास पत्र येणेंप्रमाणें पत्रें लिहविलीं, तयार जालीं. राजश्री पाटीलबावांकडील नारो कृष्ण यांचीं पत्रें व आमचीं पत्रें चौघां सरदारांस व सरकारचे पत्रांच्या नकला देऊन रवानगी केली. आज पत्रें रवाना होतील. दो चौ घटकांत उपरांत सरकारचीं पत्रें यांचे जाबसाल आमचे हवालीं करणार व एक पत्रें राजश्री दादाजी गंगाधर याजकडे रवाना केलीं. त्यांत विशेष सरकारचे पूर्वीचे भाऊपणाचे श्रमानें पत्रें रवाना केलीं म्हणून लिहिण्यांत कारकुनाची कारेगिरी जाणविली आहे. पत्रें सदरहू लिहविलीं. फौजेची रवानगी गुजराथचे मसलतील तेच त्या प्रांतीं होईल. सरकारचीं उत्तरें खचित दस्तऐवजीं घेऊन, आज रवाना दोनप्रहर सायंकाळ पर्यंत करतों. दुंडी त्या प्रांतीं होईल परंतु श्रीमंतांचा प्रताप व पाटीलबावांकडील बंदोबस्त, सरदार चांगले आहेत, व यांचाही दुसरा अर्थ होणार नाहीं. प्रसंगीं फौजा रवाना व्हाव्या हे नेट बहुत लाविलें आहे. गंगाजलनिर्मळ बाईची ताकीद भारी आहे. प्रसंगीं कमी होणार नाहीं. तेथें राजश्री दवलतराव शिंदे व फौजा सरंजामी आदीकरून जलद कुचाची आवई पडून, चार मजली अलीकडे यावें. साकल्य विनंति आलाहिदा लिहून पाठवितों. श्रुत होय हे विनंति.''

लेखांक ६.

श्रीराम. ता. २३ फेब्रुवारी इ. स. १७९४.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-प्रति देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत चंद्र २२ माहे रजब पावेतों मुक्काम महेश्वर येथें स्वामीकृपेकरून यथास्थित असो विशेष. महादजी शिंदे यांचा काल

जाहला, याकरितां बंदोबस्ताचीं पत्रें श्रीमंतांचीं व आपलीं व राजश्री तात्यांचीं राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांचे नांवें पाठविलीं, तीं सुभेदारास व गंगाजलनिर्मळ अहल्याबाईस दिलीं, आणि त्यांजकडील उत्तरें घेऊन सेवेसीं पाठविलीं आहेत, पावतील. सरकारआज्ञेप्रमाणें यांजकडील फौजेची सिद्धता आहे व होते. शिंद्यांकडील सरदारांस पत्रें यांजकडील घेऊन पाठविलीं आहेत. तिकडील इशारा आला म्हणजे यांजकडील गुंता नाहीं, फौज तयार कांहीं आहे व कांहीं होते. बहुतेक इतकी दुंडी त्या त्या प्रांतीं होणार नाहीं. राजश्री नारो कृष्ण वकील, राजश्री पाटीलबावांकडील, यांची रवानगी करणार होते, ती सांप्रत राहिली. सरकारचीं उत्तरें या पत्रांचीं आल्यावर करणें तैसें करावें. त्यास स्मरणपूर्वक उत्तरीं आज्ञा करावी. येथील राहण्याचा सेवकाचा अर्थ तूर्त काय ? एकवेळ सेवेसीं येऊन आज्ञा जाहल्यास साकल्य इकडील व हिंदुस्थान प्रांतीचे निवेदन करीन. पुन्हां आज्ञा जाहल्यास येऊं. साकल्य वर्तमान होईल तें सत्वरच लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय, कृपा केली पाहिजे हे विनंति. पूर्वीं पत्रें दोन स्वामींचे नांवें व तात्यांचें नांवें चंद्र ११ जमादिलाखरीं पाठविलीं, त्यांचीं उत्तरें सत्वर यावीं, किंवा खुलासा कर्तव्य न कर्तव्य यावा. सेवकास उत्तरें येऊन सत्वर पोहोंचल्यानें आज्ञेचे भाव ध्यानास येतात व येथेंही आब राहतो. पुढें आज्ञा सत्वर व्हावी. श्रुत होय हे विनंति. ”

लेखांक ७.

श्रीराम.

“ पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:– चंद्र १२ रजबचीं पत्रें आलीं तीं चंद्र १९ मिनहूस प्रविष्ट जाहलीं. महादजी शिंदे यांस नऊ दहा दिवस ज्वर आला. अकरावे दिवशीं माघ शु॥ १३ बुधवारीं वायूची भावना होऊन अवसीचे प्रहर रात्रीस काल जाहला, ही गोष्ट ठीक न जाली ! हीं वर्तमानें तिकडे जातील. त्यांचे मुलखांत वगैरे गलबल होईल. त्यास पूर्वद्वेष मनांत न आणितां, त्यांचे महालांस अगर खेड्यांस तुह्मांकडून उपद्रव न लागे, असा बंदोबस्त करणें. दुसरे, त्यांजकडील सरदार हिंदुस्थानांत आहेत त्यांस पत्रें पाठवावीं कीं, शिंदे यांचा काल जाहला, ईश्वरी इच्छेस इलाज नाहीं; तुह्मीं फौजेचा बंदोबस्त राखून दिल्लीचा बंदोबस्त चांगला करणें. आह्मी फौज सुद्धां तयार आहों. तुमचा इशारा येतांच येऊन पोहोंचतों, अशीं पत्रें राजश्री सुभेदार यांसी श्रीमंतांचे नांवें व आपले नांवें व राजश्री तात्यांचे नांवें आलीं, तीं गंगाजळनिर्मल अहल्याबाईस दाखऊन सुभेदारास प्रविष्ट केलीं. हिंदुस्थानांत पत्रें रवाना करण्याचें व सरकारचे जाब जलद रवाना करण्याचे उभयतांसी बोलण्यांत आणिलें. पाटिलबावांचा काल जाला, त्यांचे श्रम या उभयतांस होऊन, नौबद बंद केली. बाई व सुभेदार श्रमी बहुत जाले. पत्रेंही लिहिण्याविषयीं जलद सरकारांत वर्तमान कळावें, यास्तव चंद्र २० मिनहूस डांकेंत पत्रें सेवेसीं रवाना केलीं. वरकड मागा-

हून पत्रें रवाना जाल्यावर सरकारचे व स्वामींचे व तात्यांचे पत्रांचे जाब घेऊन सेवेसीं रवाना करितों ह्मणोन विनंति लिहून पत्रें पाठविलीं, तीं पावलींच असतील. त्या अलीकडे पत्रें सरकारांत व हिंदुस्थानांत सरदारास रवाना होण्याची भवती न भवती होऊं लागली. त्यास एक दिवस अधिक लागला, त्याचें कारण आमचे दस्तऐवज गांव खेड्यापर्यंत लिहिण्यांत आणावेसें घडते. त्यांचा मृत्यु जाला, समय रक्षावा; प्रांताचा बंदोबस्त राखावा; दुंडी होऊं न द्यावी; हा मुख्यार्थ खराच: व दस्ताऐवजींही गुंतों नये. याचें कारण कीं, तुमची त्याची वैमनस्कता वांटणीमुळें दिल्ली आगरें, पादशाहा सुद्धां हिंदुस्थानचा वांटा घेणें हा मुख्य पक्ष. अलीकडे महादजी शिंदे यांनीं खुरजे वगैरे महाल अंतरवेदींत आपले होते, त्यांनीं प्रांत दिधला त्यांत अंमल आमचे कमाविसदार बसले. तेव्हां फाजला सुद्धा चर्चाही नाहीं. तूर्त हे महाल घ्यावे, पुढें मसलतीहून आल्यानंतर यथाविभागें वांटणीचा फडशा होईल, याप्रमाणें ठरलें. अलीकडे दुराग्रह वाढून कलहाची वृद्धी जाली व सरकारांत सात आठ क्रोड फाजील काढले, त्याचीही कमजास्त मखलासी सरकारांतून करून घेतली म्हणून ऐकतों. आमची समजूत यथाविभागें व्हावी, तोही अर्थ न होतां, तूर्त खुरजें वगैरे महाल दिधले, तेही जप्त करून आमचे कमाविसदार उठवून दिधले व महाल डुभाई इंग्रज यांसी लावून दिले. तेथें लखनौकर इंग्रजाच्या कोठ्या दुभाईनें करविल्या. तेव्हां सुटणें दुरापास्त! सरकारचे वांटणीचा प्रांत फाजलांत लावून घेतला म्हणून ऐकतों. त्यांचे दुराग्रहामुळें तूर्त कलह तुटावा व दाखला असावा यास्तव पटाले, गुजराथची मोहीम करावी हे आज्ञा. तेव्हां सरकारांत व उभयतां कारभारी यांस पत्रें तुमचे विद्यमानें पाठविलीं कीं, हिंदुस्थानचा वारसा पूर्व चालीप्रमाणें राखून, आज्ञा होईल त्या मसलतीस सिद्ध आहों. त्याचीं उत्तरें समर्पक उभयतांचीं आलीं कीं, हिंदुस्थानचा दाखला आहे. तूर्त समजुतीमुळें गुजराथची मसलत कबूल करावी. यांत नफे बहुत आहेत. त्याजवरून स्वच्छ दस्ताऐवज मसलत गुजराथची कबूल करण्याची पत्रें श्रीमंतांचे नांवें पाठविलीं. ते दस्तऐवज गेले. असा प्रसंग येऊन गुदरला. तेव्हां त्यांचे कारभारी वगैरे यांस पत्रें लिहून सरकार आज्ञेप्रमाणें पाठवावीं कीं दिल्ली, आगरें, वगैरे बंदोबस्त राखावा. आंह्माकडील दुसरा अर्थ नाहीं. व जमीदारांस, राजेरजवाडे सर्वांस पत्रें कीं, त्यांजकडील सरदारासीं रुजू राहणें, दुसरा अर्थ केल्यास ठीक नाहीं. तेव्हां आमचे दस्तऐवजांनीं त्यांचे स्वाधीन हिंदुस्थान केलें. सरकारांत पत्रें लिहावीं त्यांतही ह्याच अन्वयें लिहून, फौज मात्र तयार करून, त्याजकडील सरदाराचे उपराळ्यास फौज मात्र तयार राखावी. हा भाव होऊन, पुढें बीज राहोन सरकारांत त्यांहीं फाजील काढून त्यांनीं आपला दस्त केला, तर सरकार धणी आहेत. व त्यांची दवलत बारगिरीची, तेव्हां जें आहे तें सरकारचें. त्याचे अर्थ सरकारांनीं बोलून, तोडी राखणें त्या राखल्याच असतील. या वहिवाटींत आमचा दस्तऐवज गुंतून लिहिण्यांत आणावेसें घडतें.

त्यांचा मृत्यु जाला, समय रक्षावा, प्रांताचा बंदोबस्त राखावा व दुंडी होऊं न द्यावी हा मुख्यार्थ खराच, हेही दोष या कर्मास पडतात. धन्यानीं कारभारी यांनीं लिहिले, प्रसंग नाहीं ह्मणतां बाह्य विरुद्ध व दस्तैवज देतां. महादजी शिंदे खासा असतां दुराग्रह पडले, त्यांत सरकार गुंतलें म्हणोन ऐकतों. त्याची तोड सरकारांनीं राखलीच असेल. सांप्रत आह्मीं गुंतावें हें होतें. त्यांत महादजी बावा असते तर विवेक अविवेक जाले, त्याचें निराकारण होऊन पूर्व चालीप्रमाणें घाटास यावें हें सरकार व उभयताचे अन्वयें होतें. सांप्रत त्यांचे सेवक सरदार वगैरे व सरदारी त्यांचे वंशींचे सरदारीची वहिवाट करतील. त्यांस वाटेल कीं वडिलाचे व्रत ग्रहण आपण कसें मोडावें ? त्यांचे सेवकांस वाटेल कीं, खावंदाचें केलें आपण कसें मोडावें ? सांप्रत बळकटी जाहलीच आहे, त्या अन्वयें वर्तावें. असे प्रकार पुढें पेंचाचें दिसतात. आजपर्यंत सरकारांतून त्यांचे मर्जीप्रमाणें लिहिणें करणें, मसलती घालणें, प्रसंगानुरूप करणें प्राप्त जालें व केलें. सांप्रत त्यांचा काल जाला हें परम अनुचित जालें ! ते असते तर विचाराचे माणूस व दूर अंदेश. एक वेळ दुराग्रहानें गोष्टी जाल्या, त्या अविवेकानें जाल्या, हें ध्यानास येऊन सरकारासीं व भाऊपण्यासीं पूर्व चालीनें चालून मार्गावर येते. तो प्रकार घडावयाचा होता. सांप्रत ऐसा प्रकार घडला. श्री इच्छा ! पुढें कारभारी व धणी दवलतीस होतील, त्यांचे कुलधर्मांत हे गोष्ट न यावी. जाला तो अविवेक, पुढें उभयतां सरदाऱ्या, दौलती, सरकारच्या भाऊपण्याप्रमाणें निभावणी व मोठेपणीं दिधली, वारंवार राज्यांत दुई पडावी व धन्याची अवज्ञा दिसून बाह्य विरुद्ध पडावें हें राज्यास ठीक नाहीं. हिंदुस्थानची दुंडी व्हावी तर इंग्रजाचा व सरकारचा तह बनला आहे. राजेरजवाडे ह्मणतां, जयनगर, मारवाडवाले, उदेपुरवाले मातबर. ते चोळणीखालीं राज्यें खराब जालीं. त्यांत हाल राहिले नाहींत. कदाचित गंवार गर्दीस उभे राहावे, तर फौजा शिंद्यांकडील, व आह्मी फौजेसुद्धां ऐशा समयीं कमी न करितां सिद्ध. व इंग्रजाचा आश्रय तहामुळें राजेरजवाडे यांस सांपडत नाहीं, तोंवर कोणाची जुरत बखेड्यास वाढते असें नाहीं. बंदोबस्त कायम आहे. जाल्या अविवेकाचें निराकरण करून, उभयतां सरदाऱ्यांची वहिवाट पूर्व चालीप्रमाणें राखून, उभयतांनीं सरकारचाकरी व मर्यादा वडिलोपार्जित कुलधर्मानुरूप चालवून, उभयतांनीं सरकार उपयोगी, आज्ञा होईल तेव्हां हजर असावें. उभयतां सरदारांचा आब व सरकारच्या उपर उभयतावर. व सरकार वांटणीवर सरकारचे कमाविसदार, व आमचे वांटणीवर आमचे, व त्यांचे वांटणीवर त्यांचे, व पादशहासुद्धां बंदोबस्तांत सरकारचा आणि श्रीमंत रावसाहेब कैलासवासी यांचे समयीं मर्यादेंत राहून केले चाकरीचा मद मारून, सेवाधर्मास सादर व सरकार किफायती होत होत्या त्या अन्वयें वर्तणूक व कलह निःशेष तोडण्याचा समय हाच. यांत सरकारचे नफे व आमच्या उभयतांच्या समर्याद भाऊपण्यास व सरकारांत चालण्याच्या बंदोबस्ताचा समय हाच आहे. पुढें चाकराचाकरी कारभार. त्यांची रवा-

नगी तेथून होईल तेथें निश्चयांत येऊन आमची खातरजमा व्हावी, आणि त्यांची रवानगी व्हावी, हा पक्ष सरकारांस व उभयतांस आतांच घडेल. येविषयीं सरकार व उभयतांनीं आमची खातरजमा करून आह्मांस पेंच न पडे हें करावें. हेंही सरकार उपयोगी, व दौलत सरकारची. आजपर्यंत सरकारचे व उभयतांचे आज्ञेवर मसलतीवर सादर आहों. राज्यांत अनेक प्रकारचे बहदे जाले, त्यांचीं निराकरणें होऊन श्रीमंतांचे प्रतापें उभयतांस यशें आलीं. आमच्या उभयता सरदारांनीं चाकऱ्या केल्या, तहबारी जाली, तर पूर्वापर चाकरी करीतच आलों; व तहवाऱ्याही श्रीमंताचे प्रतापें सांभाळून सरकारचाकऱ्या केल्या. फाजले काढली नाहींत. सरकारांत यावत् शक्ति देतच आलों, तेंच चालवतों. भाऊपणा व तेच निष्ठा श्रीमंताचे पायापासीं असावी, चाकऱ्या घडाव्या, अशी मर्यादा करून दिल्यानें उभयतांस अघटित यश! राज्याचें सर्व रक्षण. त्यांत निमे राज्य उभयतां सरदार हे संरक्षण व मर्यादेनें चालेल त्याचा गौरव, व चाल टाकील त्यावर दाब असोन पुढें सरकार व भाऊपण्याच्या वाटण्या नीट चालून महत् यश संपादावें व राज्यांतील दुही निःशेष नाहींसी करावी. पुढें बळ विशेष पडेलसें न व्हावें. ये विषयीं आम्हांस खातरजमा उभयतांचे व सरकारचे पत्रांत असावी. चाकरीस हजर आहों. या प्रसंगीं चालीवर सहसा न टाकावें, ह्मणजे कोणासही नड पडणार नाहीं. महत् यश आहे. या प्रसंगीं प्रसंगही संरक्षण करावा. बाह्य विरुद्ध मोडावें, व दस्ताऐवजीं गुंतू नये, असें भाव बोलण्यांत येऊन संशय मानिला. यास्तव आम्ही सांगितलें कीं, संशयात्मक ठीक नाहीं. तुमचा अभिमान सर्वस्व उभयतांस. दौलत श्रीमंताची व रोपें लावलेलीं त्यांचींच. त्यापक्षीं यास बाद कसा पडेल? दोहो बाजू सारख्या. दोहोंची संरक्षणें सरकारांतून. व उभयतांस एकरूप करणें हें सर्व अंदेशे त्यांचे ध्यानांत असतील. गुजराथचे दस्तैवज गेले, तेही त्याजपासीं. चौघा सरदारांस मात्र शिंद्याकडील पत्रें तुमचीं, व रजवाड्यास रुजू राहण्याविषयीं पत्रें द्यावीं. त्यांस जसे धनी शिंदे त्यांजला, तसेंच त्यांचे सरदारांस तुह्मी धनी. तेव्हां चिंता नाहीं. याची तोड सरकार व उभयतां राखतील. तुम्ही या प्रसंगी दिकत घेतल्यास व लौकिकविरुद्ध भाऊपण्यास व सरकारचे आज्ञेचा भंग व उभयतांस काय वाटलें हें नकळे. यास्तव सर्व अर्थ मर्जीवर व विश्वासावर ठेऊन सरकार आज्ञेची जलदी करावी. त्याप्रमाणें पत्रें रवाना. दिल्ली, आगरें, वगैरे बंदोबस्त शिंद्याकडील सरदार तेथें आहेत त्यांनीं करावा. आह्मी उपराळ्यास आहों, फौज तयार आहे, अशी पादशहास अर्जी व शहाजी कारभारी यास पत्र. व राजेरजवाडे यांस पत्रें कीं त्यांचे अमलासी कोणी बोलल्यास आम्हांस पारपत्यास यावें लागेल. यास्तव शिंद्यांचे सरदार यांसी रुजू व्हावें. याप्रमाणें पत्रें लिहून चौघे सरदार राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवाजी बल्लाळ व खंडेराव हरी व अंबोजी इंगळे यांस पत्रें खातरजमेचीं कीं, महादजी शिंदे यांचा काल जाला, त्यावरून तुह्मी उदास व्हाल, तर ऐसें नसावें. तुह्मीं

खातर जमेनें दिल्ली, आगरे, अजमेर वगैरे पादशहासुद्धां बंदोबस्त राखावा. आमची फौज तयार आहे. अविलंबें रवाना करितों. सर्वांस पत्रें पाठविलीं आहेत, तीं पावतील. त्यांस देऊन बंदोबस्त राखावा. याप्रमाणें पत्रें रवाना केलीं. व आह्मीं आपलीं पत्रें चौघा सरदारांस लिहून त्यांचे वकील नारो कृष्ण येथें आहेत, त्यांचे स्वाधीन व सरकारच्या पत्रांच्या नकला होळकरांचे नांवें पत्रें होतीं, त्यांचा वकील मजकूर याच्या स्वाधीन केल्या. सरकार आज्ञेप्रमाणें होळकर यांजकडील वर्तणूक आहे. पत्रें रवाना सरकार आज्ञेप्रमाणें केलीं. होळकरांकडील फौज तयार आहे. तुह्मी लिहाल त्या अन्वयें यांची रवानगी फौजेची त्या रोखें होईल. याप्रमाणें पत्रें कासद छडे पदमसी सावकार मातबर होळकरांकडील त्याचे छडे कासदाबराबर पांच जोड्या, एक शिंद्यांचें वकीलाचें पत्र व एक आमचें पत्र, व होळकरांचीं पत्रें चवघा सरदारांस रवाना केलीं. व होळकराचीं पत्रें संस्थानिक रजवाडे व पादशहास कासदासमागमें वकीलाजवळ चंद्र २० मिनहूस रवाना केलीं. तैशीच या पूर्वी शिंद्यांस समाधानाचीं व राजश्री दादाजी गंगाधर यांचे विद्यमानें सरकारांत रवाना केलीं आहेत. पत्रोत्तरें या पत्रांचीं फार जलद पाठवावीं. आजपर्यंत या वर्तमानासगट दोन उत्तरें मात्र सेवेसीं पाठविलीं. याचे उत्तर आल्यास गंगाजल निर्मळ अहल्याबाईस तोष होईल. येथील अर्थ साकल्य समक्षतेनेंच निवेदन होतील. सेवेसीं श्रुत होय, विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.

लेखांक ८.

श्रीराम. ता. २१ मार्च इ. स. १७९४.

"सेवेसीं विनंति ऐसी जेः– येथें आल्यातागाईत जालें वर्तमान कच्चें आलाहिदा व यांजकडील पडदा राखून लिहिणें तें लिहिलें, व मसलतीस सिद्ध करण्याचे प्रकार ऐशा रवानग्या सेवेसीं सुचल्या अर्थाच्या व यांचीं बोलणीं अस्ताव्यस्त पडलीं त्याचा संदर्भ लावून साकल्य लिहिलें. त्या अलीकडे इंदुराहून राजश्रीं तुकोजीबावा सुभेदार यांचें कूच, गंगाजळनिर्मळ अहल्याबाई यांचें नेट व सरकार आज्ञेप्रमाणें मसलतीस जाण्याचें पक्कें व सरकार तर्फेची सख्ती गरम नरम बोलणें बोलून, बाईचा आसरा धरून, सरकार रीतीचे पल्यावर आणिलें. सात आठ लक्ष रुपये बाईनीं इंदुरास रवानगी केली कीं, समजावीस लोकांची करून स्वारीस निघावें. कारभारी पाराशर दादाजी व पारनेरकर फडणीस व सरदार तुकोजी बावा. सर्वांचें कारण, जो पैक्का आला तो बाईपासून ध्यावा, व पुढें मागतच जावा. मुक्कामा खालें व पोटा खालें व आपलीं आपलीं रद्दकर्जें सरदारासुद्धां घेत जावीं, असें करून पागासुद्धां ठीक बंदोबस्त नाहीं. इंदुराहून गवगवा न आणितां, पाठविला पैका त्यांत समजूत करून, जलदीनें फौज तयार करून, गुजराथेंत उतरावेंसें बोलणें होऊन, राजश्री पाराशर दादाजी यांची रवानगी महेश्वरीहून बाईनीं केली. मशारनिल्हे तेथें गेले. सरदारांचें मत एक, कारभारी यांचें मत एक!

व आवघ्यांची वर्तणूक चोरासारखी! धनी कोणीही नाहीं, बाई बायको माणूस. दाब तिळप्राय कोणी मानीत नाहीं. तथापि, सरकारलक्ष्यास जपावें येविषयीं वारंवार ताकीद, व सरकारलक्ष्याखेरीज व आपले उभयतांचे मर्जीखेरीज कांहींएक करूं नये, हें लक्ष बाईचें पक्कें, व गुदस्तापासून पैका माहालचा वगैरे जमा करून व फौजेची रवानगी करणें तितकी केली. एक आपण मसलतींत जावें तर स्त्रियांचा व्यवहार नाहीं! पुढें सरदार खांसा, त्यांची दशा! आपण खांसा व पुत्र व रक्षा, पुतण्यासुद्धां उदकाप्रमाणें अनाचाराची पराकाष्ठा!! नारो गणेश यांनीं कारभार केला, तोहि लौकिक मिळवावा, अघटित कामें होऊन चांगलें दिसावेंसें कांहीं केलें नाहीं. परंतु सरदारीचा भ्रम रक्षून ज्ञान बाहेर पडूं दिधलें नाहीं. सांप्रत तसेंहि माणूस कोणी नाहीं, व असल्यास सरदार कर्तृत्वेंकरून यश मिळवून कृतार्थ जन्मादारभ्य कांहींएक केलें नसतां, एवढी खिदत खादली, फौज बुडाली, उठवण्यास आलें, तें अद्याप उठवत नाहीं! पागा उपासाखालीं बुडाल्या! फौजा उठून गेल्या! हजार पंधराशें पागा, त्यास बारगीर पोरग्याची भ्रांति! शिलेदार आठ दहा हजार फौज होती, ती खांसा व कारकून मात्र मागील बाकी मागावयासी येथें; वरकड शिलेदार उठून गेले! सरंजामी पथकें हजार बाराशें, तीं रामपुऱ्यास बंदोबस्तास पाठविलीं आहेत. गारद, फरासीस हजार बाराशें व पांचशें माणूस कमकसर, त्यांजला मागील समजाविसीस चार चार रोजमुरे दिधले. ते खाऊन पुन्हां त्यांजला दरमहाचा दरमहा पाहिजे. न दिल्यास इतक्यासहि तेवढे भारी आहेत. सर्वां लोकांचे गवगव्याचे बचावास डेऱ्याभोंवते दोन चारशें माणूस गारद मात्र व पांच तोफा इतकी रखवाली असतां, तेथेंहि गारद लोकांचा गवगवा होऊन, त्या गवगव्यांत तुकोजीबावांनीं मारलें जावेंसें जालें होतें, परंतु तो दिवस टळला. या अवस्था गुजरतात! जवळ वीस पंचवीस लक्षांचें वित्त, नगदी वगैरे, रखमाबाई मेली तिच्या वित्तासुद्धां पोरेंबाळें दहा लक्षपर्यंत, इतकें जवळ व याखेरीज महालची दायेती सरदारीची त्याच्यासुद्धां जमा करितात; परंतु सरदारी बुडते! सरंजामाचा आजमास काय व फौज काय? आपले सरदारीचे खर्च मनस्वी, ते खर्च असावे; पैका आपण खाणें तो खावा; लोकांनीं व चवघा चोरापोरांनीं खाणें तो खावा; व दिवाण व्हावा त्यास महालचा पैका वगैरे भरणाखर्च उणा पडून महालकऱ्याचीं फाजलें निघालीं त्यांपैकीं रद्दकर्जी पडून, राहिला पैका तो दिवाणांनीं घेऊन, फौज तोफखाना व यांचे सरदारीचे व मनस्वी कर्मांचे खर्च बाळगून, मल्हारजी होळकर व याखेरीज रक्षा राधी बटीक, तिजकडे पांच हत्ती, आठशें घोडे पागेचे, व चिरंजीव मंडळीकडे पागा, त्यांस पैका द्यावा; चाकरी सांगूं नये; सरदारांनीं आज्ञा करावी त्या अन्वयें पैका द्यावा, व दिवाणगिरी करावी. तोहि परका नसावा, पुण्याचा हुजूरहून असल्यास आपली विलक्षणता चालूं देणार नाहीं, हें सरदाराचें मत! व कारकून यांचें मत, जो दिवाण व्हावा त्यानें आमच्या लक्षांत चालावें.

पैका पडेल तो सरदारीस लावणें, तो त्यानें लावावा. आपले दरखास व प्राप्तीस अनकूळ असून कारभार आपले विचारें व्हावा, म्हणजे चार रुपये मिळतील. नवा असल्यास ठीक नाहीं. तेव्हां लक्ष वाटें दादाजी गंगाधर यांजला भरउभर देऊन आणून होमावें. दादाजी न येत, तर नारो गणेश यांचे पुत्र गणपतराव नारायण व भाचे बाळाजी लक्ष्मण यांजला पुढें करून, पैका असेल तो खाली करावयाची विवंचना नित्यशः चालली आहे. उमरेपट्टी वगैरे करण्यास प्रारंभ होणार. अशी अवक्रियेची पराकाष्ठा!! सरदार व कारभारी सदरहू आहेत त्यांचीं करणीं चाललीं आहेत. इतकें करून मसलत पुढें कोणती करणार? तर गुजराथची मसलत नाहींशी जाली! हे सरकारचाकरीपासून कृतार्थ व पाटिलबावांकडील हा अर्थ गुजरल्यानें भय मनांतील जाऊन, हिंदुस्थानचे अधिकारी जालों याजवर कृतार्थता मानून, मद्यादिक महापानाचा योग! शपथा केल्या ते दिवशीं श्रीमंतांचे पाय व कैलासवासी सुभेदार यांचे पाय व बाईचे पायाच्या शपथा वाहिल्या काय? प्रांतांतील व लष्करांतील दुकानें मोडविलीं, सरकारचे जासूद हुजरे व त्यांनीं आपले जासूद समागमें देऊन मोडविलीं, व ताकीद आजपर्यंत चालली असतां, पुन्हां प्रसिद्ध वर्तणूक व दुकानें यांसी परवानगी राजरोष चालली! आम्ही, स्वामींचें पत्र माझें नांवें आलें, त्यांत अनाचाराचा बंदोबस्त केला हें फार चांगलें जालें म्हणून लिहिलें होतें, त्याजवरून सांगितलें कीं, "आपण बंदोबस्त केला, तेणेंकडून श्रीमंतांस व श्रीमंत राजश्री नाना, तात्यांस संतोष जाला; व पुढें या पापापासून निवृत्त जाल्यानें कल्याणाची उमेद जाली कीं सरदारांची क्रिया चांगली जाली, कल्याण होईल, व दिल्लीआगरे जेथपर्यंत तुमचा लौकिक आहे, तेथपर्यंत तुमचा सद्लौकिक जाला. तेथपर्यंत बातम्या आपल्या अखबारींत गेल्या. असें असून पुन्हां लष्करांत दुकानें प्रसिद्ध बसलीं, तेव्हां ताकीद असावी." याचें उत्तर केलें कीं, "महापानावेगळें माणूस वांचणार नाहीं. यास्तव नर्मदा उत्तरतीरीं सुटत नाहीं." तेव्हां उत्तर केलें कीं, "सुभेदार, तुम्ही शफथा पुत्रांसहित कोणकोणाच्या वाहिल्या, आणि त्याचें उत्तर हें खासें! सरदार व हे निघाले तेव्हां न कूच (?) गोष्टीवर क्रिया तुमची ठीक न राहिली! तेव्हां तुमची शफथ किंवा क्रिया मोठे कामांत राजकारणांत कशी पथ्य पडेल? व खातरजमेवर कसें राहतील? बाह्य इतका लौकिक तरी कशास्तव केला? तर फजीती करून घेऊं नका. राज्यांत मनाई त्या चालीनें तुम्ही चाला. नाहीं तर दाखल्यास तुम्हांसीं लोक बोलतील, हें करणें उचित नाहीं." परंतु मदांधता अविवेकामुळें शपथा केल्या, त्यावर लक्ष राहिलें नाहीं! कारकून कारभारी बाईसुद्धां फजीत करीतच आहेत. चालीस अंतर तिळप्राय नाहीं! सरदारीची अब्रू नाहीं! जवळचा पैसा खर्चिणें नाहीं! दाभाड्याचे घरचा कारभार ऐकत होतों, ती दशा सांप्रत सर्व प्रकारें येथें प्राप्त जाली आहे. त्यांत दाभा-

ज्याचे घरीं मद्य नव्हतें; वरकड विषय होते. येथें मद्य व अविचार, रयत लुटणें, मल्हारजी वगैरे केवळ लुच्य तऱ्हा! जेथें मुक्काम जाला, तेथें अविचार लिहितां विस्तार!! इंदुरास होते तों बाईचा दाब व सरकारचें भय मनांत होतें. सांप्रत हें वर्तमान श्रवण जाल्यापासून गुजराथची मसलत नाहीं, व हिंदुस्थान आपले कबजेंत आलें, सरकारचें भय तिळप्राय नाहीं; पुढें तरतूद तरी कोणे गोष्टीची हें कांहींएक नाहीं. दादाजी गंगाधर यांसी पत्रें पयदरपय व लक्ष्मणपंत पारनेरकर शिंद्याचे लष्करांत रवाना केले. त्यांनीं दुखावस्थाचा शेला देऊन, त्यांजकडे भानगड लावून, त्यांचे लष्करांत राहून, ते आपण एक व्हावें, त्याचे आश्रयानें सरकारास दाबून आपली निभावणी करावी, ही चाल आरंभिली आहे. व गुजराथचे मसलतीचे दस्ताऐवज करण्याचे गेले आहेत, त्याजला उत्तर श्रीमंतांचे नांवें व आपले नांवें पत्रें आणून घ्यावीं कीं, गुजराथची मसलत न करावीसें जालें, पुढें हिंदुस्थानांत जावें, याप्रमाणें आणवावें. यास्तव पत्रावर पत्रें रवाना केलीं आहेत. व येथें दादाजी गंगाधर यांचें पत्र आलें. त्यांतील लिहिणें कीं, श्रीमंत राजश्री नाना, तात्यांनीं सांगितलें कीं, गुजराथची मसलत न करावी, हिंदुस्थानांत जावें, म्हणून दादाजींनीं लिहिलें. याप्रमाणें बाहेर लोकांस कळावयासी बोलतात. त्यास स्वामींचीं पत्रें आलीं, त्यांत फौज तयार राखणें, पुढें लिहूं तसें करणें, असें आहे. आम्हीं सांगितलें कीं, "तुम्ही फौज तयार करा. मग तुम्हांस सरकारांतून आज्ञा येईल तसें सांगूं. फौजेस व माणसास ठिकाण नाहीं. मनसबे कसचे करितां? व गुजराथ तुम्हांस सुटली हें कशावरून? व शिंद्यांकडील सरकारचे विद्यमानें तहास आल्याखेरीज चमेलकडे तुम्हांस येऊं कोण देतो? जें करणें तें सरकारलक्षानें, तेथें ठराव होऊन येईल तदन्वयें, वर्तावें लागेल. शिंद्याचे सरदार तुम्हांस तिकडे पाहूं देणार नाहींत. त्यांजकडे सूत्र लावून करा. किंवा, पुढें जाऊन पहावें तर फौज सामान किती व सरकारची आज्ञा कोणती याचें अनुसंधान पाहून चाल चालावी. वारंवार पेंचांत यावें व चुकतच जावें, हे चाल चांगली नाहीं. सरदारी नौकरपणानें व हलक्या माणसांच्या चालीनें व दैवप्रतिकूळतेनें बसून चुकली! पुढें उस्तवारी, चांगला माणूस घालून, तुमची क्षणिकता व दुर्व्यसनें व पुत्रमोहामुळें रयतीसुद्धां बुडविणें, अन्याय वर्तणूक कारणें आहेत. सावकार, रयत, त्यांस लुटावयाची क्रिया यानें सर्व भयभीत जाली. त्यांचें समाधान व ह्या मर्जा तुमच्या अनिष्ठाच्या, त्या मोडणें. व ज्यानें धर्म, न्याय, नीति राखणें व रयत सावकार आबाद करणें, त्या गोष्टी घडाव्या. तेव्हां सरदारीस आळा बसेल. हें सरकारांतून व्हावें, किंवा तुम्हीं शुद्धीवर येऊन करावें. तो अर्थ न जाल्यास दौलत व सरदारी सरकारची खराब होतेसें जालें. तेव्हां आटोपून बंदोबस्त करणें प्राप्त. करितील. तुमचा आब सर्व प्रकारें गेला! राहिला हाहि जातो. कितीहि बोलले तरी यांची चाल आहे ती आहे. सर्व अनकूल

असून बुडते. यास्तव सरकारांतून यांजला दाबून, तूर्त गुजराथची मसलत सुटली हें नसतां, ताकीदीवर ताकीदी येत जाव्या, व माळवा प्रांत व देश वगैरे सरदेशमुखी वगैरे हिशेब करून, दहा पांच लक्ष बाकी काढून, वरात, एक कारकून, दोनशें राऊत, तगाद्यास व फौज तयार करून, गुजराथेस जाण्याविषयीं दाब असावाच. ज्येष्ठ मास जवळच आला. कार्तिकपर्यंत हे येथेंच पागासुद्धां व शिलेदार राहिले ते गारत होतात, ते होणार नाहींत. सरकारचा तगादा मसलतीचा व पैक्याचा लावून यांजला धाडवून कामास लावावें. किंवा कारभारी करून त्यांचे आज्ञेंत चालवावें. याजशिवाय सरदारी बुडते! स्वामींनीं दोन वर्षें यांचा आब रक्षिण्याची कमी केली नाहीं. परंतु येथील चिन्ह तुकोजी होळकर यांचे दैवाची दौलत उतरली! पुढें सरकारांतून कैलासवासी मल्हारजी होळकर यांचें नांव चालविणें, तर दुसरा सरदार सरदारीजोगा व कारभारी कारभाराजोगा करून निशाण चालवावें, किंवा सरदार दुसरा करावा, ही दशा येथील आहे. ती साकल्य श्रुत व्हावी यास्तव विनंति केली. या प्रसंगीं दोन्ही सरदाऱ्यांचा बंदोबस्त करून हिंदुस्थानचा कबजा, सरकार व अलीबहादर व सरंजामी पथकें पाटिलबावांसमागमें होतीं तीं, व आठ दहा हजार फौज आणखी ठेऊन, त्यांस नालबंद्या व हिंदुस्थानांत पोंहचण्याजोगे रोजमुरे देऊन, उभयतां सरदारांनीं, सरकारांनीं मुखत्यार करून द्यावा; त्याचे अनुसंधानें वर्तावें; व फौजेचा खर्च तिकडे निघून सरकारांत चाळीस पन्नास लक्षाचा प्रांत सुटावा. व श्रीमंत रावसाहेब कैलासवासीचे वेळेस यश होऊन हिंदुस्थानांत सरकारचा कबजा व सरदार आज्ञांकित हे प्रकार घडले, तोच समय. परंतु त्या प्रांतीं त्या वेळेस पाळेगार मातबर होते. सांप्रत कोणी नाहीं. इंग्रजांचा तह बनलाच आहे. त्याचीच मजबुती करून, इंग्रजांपाशीं वकील कोणा सरदाराचा असूं नये, एक सरकारचा मात्र असावा. व इंग्रजांनीं कोणास आसरा देऊं नये. व पादशाहा दिल्लीचा बंदोबस्त सरकारचा व सरकारची फौज व उभयतां सरदारांची फौज असावी. व सरकारतर्फेनें जातील त्यांचे आज्ञेंत उभयतांनीं चालावें. व इंग्रजांचा वकील पुण्यासी आहेच. व हिंदुस्थानांत असणें तर सरकारफौजेंत असावा. समय हाच आहे. पाटिलबावा विचाराचें माणूस असतां कालगतीनें मनांत कल्प काय काय उठले व करणी जड पाडावी हेंहि जालें. थोर सरदार, भावी पदार्थ होणार तें जालें! पुढें चाकराचुकरीं कारभार तितकीही क्रिया राखावी, बाह्य विरुद्ध न दिसावें, सरकारनक्ष व उपयोग होत जावे, हें होणें दुरापास्त! शिंदे या प्रांतांत आल्यावर बहुवशता होईल. यास्तव उभयतां सरदारांचे चालीचा बंदोबस्त, त्यांत सरकारचा बंदोबस्त करून, पुढें सरकारांत एखत्यार व फौजा उभयतां सरदार भय मानून पन्नास हजार फौज, सरदार व सरकारची मिळून तयार राहून, बोलाविलें तेव्हां हजर व्हावें. सरकारची फौज आहेच. आणखी जथ बसून राखली ह्मणजे अल्प आयासें कार्य, व उभयतां

सरदारांस चढ न होतां सरकारमर्यादेंत चालतील. उपयोग फौजेचा व पैक्याचा, पूर्व चालीनुरूप बंदोबस्त होईल. स्वामीस सर्व यशें आलीं, कर्नाटकाचें अघटित कार्य जालें, हिंदुस्थानचा बंदोबस्त होऊन, पूर्वस्थितीनुरूप बंदोबस्त होऊन फौज तयार राहणें व रसदा प्रांताच्या पुण्यास येणें, याचा समय हाच आहे. श्रीमंतांचा प्रताप व स्वामींस यश अघटित. व पादशाहाची आबळ, फांके गुजरतात. शहाजी कारभारी यानें केवळ तंग केलें आहे! इंग्रजांचे हातीं फिरून पादशाहा प्रयागेहून आलेला जातो. पुढें चमेलपर्यंत व अलीकडे बखेडा पादशाहा गेल्यानें पडेल. सुचली विनंति लिहावी व येथील अर्थाचा प्रकार ऐसा! सेवकास येथें ज्या कार्यास पाठविलें त्याचा अर्थ तूर्त मागें पडला! पुढें कर्तव्यता असेल त्यास विना जोर जरब यांसी समजल्याखेरीज येथील प्रकार मदांध व बुद्धिमंद! नुसत्या गोष्टीनें काय करणें व काय होणें ? मजसमागमें खर्च पथकसुद्धां किती? इतका खर्च बाळगून येथें रहावें, तर सरकारउपयोगी कामें होत जावीं, व यांचा आब वाढत जावा, तीं चिन्हें येथें कांहीं नाहींत! सुचतें बहुत, परंतु येथें कांहीं होत नाहीं. जाला खर्च खाणें व सरकारनुकसानी मात्र! यास्तव समक्ष येथें कोणी कारकून ठेऊन यावें. साकल्य अर्थ इकडील तिकडील हिंदुस्थानसंबंधीं माहितगिरीचा व उभयता सरदारीसंमंधें माहितगिरीचें निवेदन करावें. करणें करावें. नसल्यास न करावें. येथें राहण्यांत उपयोग विना बंदोबस्त कांहीं नाहीं. कालहरण खर्चाखालीं येथें, व उपयोग बातनीचा मात्र! त्यास सरकारचे कारकून आहेतच. सांप्रत मीहि आपला कारकून ठेवितों. यांचेंहि म्हणणें एक दोन दिवसांपासून जावें, वांटणीचा ठराव असावा, होणें तें तेथें व्हावें, हें म्हणणें. त्यास येण्याचे आज्ञेविषयीं पूर्वी चंद्र २२ रजबीं विनंति लिहिली. सांप्रत यांनींहि बोलणें लावलें आहे. निकड जाल्यास सडा येतों. सर्वार्थ विनंति करीन. पुढें आज्ञा होईल तदन्वयें येथें यावेंसें जाल्यास येईन. सेवेसीं हजर रहावेंसें जाल्या, तेथें राहीन. त्यांत परम संतोष! शरीर अशक्त, ताकद नाहीं. यास्तव स्नानसंध्येस आज्ञा जाल्यास स्वामिचरणप्रतापें इहलोक नीट, व परलोक नीट, दोन्ही घडतील. मजला श्रीरामचंद्रस्थानीं स्वामी. तेव्हां स्वामिचरणसेवा व आज्ञा तेंच शरीराचें सार्थक! आज्ञा होईल. उत्तरीं सत्वर आज्ञा यावी. पत्रास बहुत दिवस लागतात. यास्तव विनंति कीं उत्तर सत्वर यावें. येथील अर्थ वर्तत आहे, तो साकल्य श्रुत व्हावा, यास्तव विनंति लिहिली. येथें मनुष्य कोणी नाहीं व आहेत ते कालग्रस्त! विना मातबर माणूस सरकारलक्षानें असून, यांजला दाखवून कारभार करून, यांचा भ्रम राखी व सरदारीचा आब जाऊं न देत, तरच परिणाम! पातकाची वृद्धी, व बुद्धीस क्रिया, सरदारांचे व आहेत माणसें त्यांच्या नाहींत. तेथून बंदोबस्त केल्यास अगाध नाहीं. सांप्रत येथील कोणेका गोष्टीचें संकट चित्तांत न यावें. तथापि ऐशा प्रसंगीं यांजला हुजूर आणावें. तेथें पावल्यावर सर्व अर्थ यांचे ध्यानास

येतील. सरदारसुद्धां बुद्धीचे प्रसीर व आचरणाचे व शरीराचे व पुरुषार्थाचे व मनसब्याचे चालीचे व मनुष्यें संग्रहीं त्यांचे व फौजेचे ध्यानास येतील. पुत्रसहीत पुढल्या पिढीस चालवयाचे अर्थ, व पुरुषोत्कर्ष, पापोत्कर्ष पुढें चिरायु चालण्याचे अर्थ ध्यानास येतील. पुढें भ्रम राखून कांहीं दिवस चालणें तर, उपयोग गैरउपयोग मनुष्याची छांट होऊन, कित्येक नसावेत, व कित्येक आसावे त्यांनीं सरकारलक्ष धरून चालावें; व सरकारच्या फौजा त्यांनीं व मुखरार करून द्यावा. त्यांनीं, कारभारी लक्षांत ठेऊन, उपराळा त्यांचा राखावा. बदमामलीची चाल किंवा अविवेकपूर्वक कोणासहि करूं न द्यावी. फौज तयार सरकारलक्षांत राखावी. याप्रमाणें घडण्यास समय हाच. व असेंहि घडून यथास्थित दोन वर्षें चालल्यास सरदारीस आब येत येत येईल. गेलें कांहीं नाहीं! प्रांत चांगला. सर्व अर्थ आहेत. उभयतां सरदारांचा बंदोबस्त व मदांधता कोणासहि न होतां, चाल टाकून गोष्टी न घडेत. श्रीमंत नारायणरावसाहेबांस कैलासवास जाला, घरचे बाहेरचे बखेडे अनेक प्रकारचे उभे राहिले, त्यामुळें कित्येक गोष्टी चालीवर टाकणें प्राप्त जाल्यामुळें सरकारनुकसानी व बाह्य विरुद्ध पडलें. तितकी श्रीमंत राजश्री रावसाहेबांचें दैव व स्वामीचे कारणीं, दम खाऊन मसलतीनें, तेणेंकडून कर्नाटकाचा बंदोबस्त अघटित होऊन यश आलें. तद्वत् हिंदुस्थानचा बंदोबस्त श्रीमंत नानासाहेब कैलासवासीचे समयाप्रमाणें होऊन पूर्ववत् चालवयाचा समय हाच. तेंहि यश स्वामींस येऊन श्री त्रिस्थळीयात्रेचा योग कांहीं दिवसांत घडावा. ह्या गोष्टी घडल्या, तर स्वामींचा पुण्योत्कर्ष व सत्यप्रतिज्ञ, न्यायनिष्ठुर व श्रीमंताचे चरणीं दृढ भाव व तात्यासारखे साधक, श्रीसर्वोत्तम मनेप्सित करील. हिंदुस्थानचा बंदोबस्त इंग्रजांचे तहावर वकील पृथकाकारें व सूत्रें अन्य सरदारांनीं राखूं नयेत, हें करणें जरूर आहे. येथील वृत्त ध्यानास यावें. सुचली विनंति लिहावी. पुढें मजला आज्ञा यावी. तदन्वयें वर्तावें. यास्तव विनंति. यांचीं करणीं बारा मार्गांचीं बारांचीं! तेथें जो बोलेल त्यासी स्वामी बोलतील, तर येथें अविचार आहेच त्यास बळ पडेल. यास्तव दाब व एकहाती जाबसाल व सरकारतर्फेनें राहील त्याचा आब राहील. व मुख्य पक्ष यांसी देशीं आणवावें. दोन्ही बंदोबस्त तेथें करावे. मजला आज्ञा यावी. समक्षतेनें विनंति करीन. उभयतां सरदारीचा बंदोबस्ताचा समय, दोन पिढ्या सरदारांच्या व दोन पिढ्या आमच्या सरकारतर्फेनें याजवर नक्ष सरकार उपराळ्यानें राखून, सरकारनफे श्रीमंतांचे प्रतापें जाले. मध्यें सखारामपंताचे द्वेषामुळें आमचा उच्छेद व्हावा त्या संकटांत बत्तीस तेहतीस वर्षें स्वामिप्रतापें जीवन होऊन जन्म पार जाला. याचें उत्तीर्ण शरीर स्वामिकार्यावर खर्चलें तरी होणार नाहीं. पुढें मुलांलेंकरांचें चालणें हिंदुस्थानांत व उभयता सरदारांवर उपर राखून त्यांत महत्व वाढविणें याचा समय हाच. येविषयीं कित्येक वेळ अभयोत्तरीं आज्ञा जाली आहे. सूचनार्थ विनंति लिहिली. पत्र वाचून फाडून टाकावें. मर्जीस

येईल तसें करावें. पूर्ववताचा समय जाणून विनंति लिहिली. येथें कारकून व एक चिरंजिवास आज्ञा जाल्यास ठेऊन येईन. पुन्हां जलद यावेंसें जाल्यास येईन. उत्तरीं आज्ञा होणें तैशी सत्वर व्हावी. पूर्वीं यांजकडील बोलण्याचे अर्थ लिहिले, त्यांत सूचना लिहित गेलों. त्याचें उत्तर तसेंच सत्वर यावें. विशेष काय लिहिणें. स्वामिचरणीं प्रतरणा नाहीं, यास्तव लडिवाळपणें लिहिलें. न्यूनाधिक्यतेची क्षमा आजपर्यंत पुत्रवत् जालीच आहे व पुढेंहि निर्वाह करणार स्वामी समर्थ. श्रुत होय, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक ९.

श्री. ता. २८ मार्च इ. स. १७९४.

"सेवेसी विनंति ऐसीजेः—येथील अर्थ राजश्री तुकोजी होळकर व येथील कारकूनमंडळ यांचें मानस कीं, तुकोजी होळकर यांचें शरीर अशक्त, व शरीर व बुद्धीस ठिकाण नाहीं, तेव्हां भरंवसा कोणेका गोष्टीचा नाहीं. यास्तव राजश्री काशीराव होळकर, ज्येष्ठ पुत्र, यांजला गंगाजळनिर्मळ अहल्याबाई यांजकडून वस्त्रें देऊन, सरदारीचे कामकाजाची वहिवाट यांजकडून करवावी. त्याजवरून बाईचे मनास येऊन, राजश्री काशीराव होळकर इंदुरास होते त्यांस बोलावून आणलें आहे. ते चंद्र २२ साबानीं येथें दाखल जाले. चैत्र शुद्धांत वस्त्रें होणार. आम्हांस गंगाजळनिर्मळ बाईनीं पुसलें कीं, हा विचार तुकोजीबावांचे मनांत फार. यास्तव त्यांचा हेत पूर्ण करावयासी केलें आहे. विचार कैसा? तेव्हां आम्हीं सांगितलें कीं, "ते खासा असतां यांजला वस्त्रें देतां, ते मुतालकीची किंवा शिक्केच मोडून यांचे नांवें करितां, ही चाल कोठें स्वराज्यांत आढळली नाहीं. तुकोजीबावांमागें सरदारी, सरकारआज्ञेनें, त्यांचे चिरंजीव असतील तेच करतील. मुतालकी म्हणतां, कोणते मसलतीस रवाना करणें कीं, त्या निमित्यानें तऱ्ही करावें. त्यास सरकारचें अनुमत पाहिजे. येविषयीं काय आणिलें?" त्याचें उत्तर बाईनीं केलें कीं, "कैलासवासी महादजी शिंदे पाटिलबावा होते, ते समयीं राजश्री नाना व तात्या यांचें अनुमतपत्र व त्याच अन्वयें पाटिलबावांचें पत्र आणून ठेविलें...............
...................कारभार सांप्रत करितों. शिक्के तूर्त..."...............
......याप्रमाणें बोलणें जालें. पत्रें कांहीं आह्मीं पाहिलीं नाहींत. दाखवूं ह्मणाले. व राजश्री नारो गणेश यांचे पुत्र गणपतराव नारायण व भाचे राजश्री बाळाजी लक्ष्मण, यांसी दिवाणगिरीचीं वस्त्रें द्यावीं. त्यांनीं पैका लावून सरदारी उभी करावी, यास्तव वस्त्रें द्यावीं न द्यावीं? तेव्हां आह्मीं सांगितलें कीं, येविषयीं सरकारचें अनुमत घेणें जरूर. त्याजवरून बाईनीं उत्तर केलें कीं, "येविषयीं सरकारांत उभयतां कारभारी यांसी लिहिलें आहे. त्यांचीं उत्तरें आल्यावर करूं. तुह्मी लिहून पाठवून उत्तरें आणावीं." तेव्हां आम्हीं उत्तर केलें कीं, "पूर्वीं उभयतांस पत्रें राजश्री गणपतराव नारायण व बाळाजी लक्ष्मण यांचे नांवें गेलीं. त्यांचीं उत्तरें

कांहींएक आलीं नाहींत, असें गणपतराव व बाळाजी लक्ष्मण यांचें म्हणणें. तेव्हां पत्रोत्तरें देखील दिधलीं नाहींत. याजवरून सरकारमर्जी कशी हें ध्यानास आणावें." तेव्हां उत्तर केलें कीं, "सांप्रत पत्रें आम्हीं लिहिलीं आहेत. विना कारभारी परिणाम लागत नाहीं. यास्तव करणें प्राप्त. सरकारांत आम्हीं लिहिलें आहे. तुम्हीं लिहून अनुमत आणावें." म्हणून सांगितलें. मुख्यत्व, सर्वांस एक अनुवादक दिवाण नांव ठेवून असावा. त्याचें दारीं धरणें शिलेदारांसी बसावयासी व तूर्त सावकार वगैरे त्याचे आधारावर उभा करून बुडवावा. यासी तूर्त आश्विन कार्तिकपर्यंत कालहरण मात्र दिसतें. त्या कारभाऱ्याचा कारभार महालसुद्धां वहिवाट सर्वांनुमतें व्हावी. सावकार या चालीनें उभा राहत नाहीं. महालचा पैका दुसाला घेऊन चुकले. पुढें बाईनीं पैका कोठून द्यावा? मनस्वी खर्च! मोठी शिकस्त खाऊन इंदुरास येऊन भुईस भार व अन्नास काळ कमकसर एक वर्ष बसल्या मुक्कामींच जाले. मनस्वी खर्च! त्यांत दुसाला सरंजामाचा पैका सालमजकुरीं व पेस्तर सालाचा खादला! इकडे सावकार कोणी उभा राहत नाहीं. तिकडील सावकार............... ....धान करून मागतात............................सावकारास द्यावा. महालकऱ्याचे मागील फाजिलाचे हप्ते बांधून फडशा करावा. फौजपागा दिवाणाचे अकत्यारीची असावी, व सरकारचें अभय असून, पेंच पडूं देऊं नये असें असावें तेव्हां हे कारभारी केल्यानें बंदोबस्त बसतो. परंतु येथें शागिर्दा व पारनेरकर व पाराशर दादाजी व सरदारसुद्धां सर्वांनुमतें कारभार व्हावा. सर्वांनुमतें मनस्वी खर्च व मनस्वी दरबारखर्च खाणें ह्या चाली न टाकतां कारभाराची वहिवाट व्हावी. यास्तव कुळें दोन यांनीं आपले सरदारींत नेमलीं. एक दादाजी गंगाधर, व दुसरे नारो गणेश यांचे पुत्र गणपतराव नारायण. त्यांत पारनेरकर शिवाजी गोपाळ वगैरेंचें मानस, अनुवादक दिवाणगिरीस दादाजीस करावें. त्यांत दोन मतलब त्यांचे होतात. नारो गणेश त्यांचे येथें कैदेंत पडून शेवटास लागले, यास्तव त्यांचे पुत्र व भाचे आपले विचारांत राहणार नाहींत; अथवा द्वेषास प्रवर्तक होतील. यास्तव भगीरथ प्रयत्नें दादाजीस आणावें. पैक्याविषयीं व श्रम भोगण्याविषयीं त्यास पुढें करावें. दरबारांत आपला कोणी नाहीं. दादाजी दिवाणगिरीचे कामांत आल्यावर उलगडूं पावतच नाहींत. कारण कीं, या चालींत जो उभा राहील, तो उलगडणेंच नाहीं. तेव्हां दरबारसुद्धां बंदोबस्त आपला होईल. व आंच कवडीची नसतां सर्व आपले स्वाधीन राहील. बाईचे विचारें, यांनीं आपल्यास पैका द्या, असें म्हटल्यास कोठून द्यावा? तेव्हां ज्यांस चवघे मिळून सरदार संमत होईल, त्यास रुकार आपणहि देऊन, आपलें महत्व रक्षावें. ही तऱ्हा होऊन शत्रुमित्रास फळें व परिणाम एकरूप व शिकस्तफत्तेचा संतोष एकरूप! पुढें कर्तव्यता मसलतीची अखेरसाल येथेंच जाली व होईल. पुढें छावणीच आहे. कार्तिक मासानंतर पाहतील तसें करतील. छावणीस

शिंदे निरोप घेऊन..येथें येतील त्याच्याच या...............................ठरेल. त्यास ममतेंत घेऊन काशीराव फौज थोडी बहुत त्यांचे पेंच्यांत लावावी, हेहि विचार करितात. तात्पर्य, सरदारी मोंके खाते. दाभाड्याच्या चाली सर्व. त्यांत महापान त्यांजहून विशेष! त्यांत तेथें बाई होती, ते आचरणें धर्म ठीक नव्हता. येथें बाई आहेत यांचा धर्म व करणें व अभिमान व शहाणपण त्यांजहून अधिक. वरकड सर्व दाखला एकरूप व परिणाम एकसारखा व्हावयाचा आहे! धन्यांनीं खाविंदी करून, दाबानें बंदोबस्त केल्यास, कारभारी सरकारलक्षाचा करून, लबाड्या करील त्यास शासनें व्हावीं. सुवृत्तीनें ऐकिल्यास उत्तम. न ऐकिल्यास दोन्ही तोडी राखून, दाबून, बंदोबस्तांत आणून, अल्लीबहादराची सरदारी, सरकारपागा, आज्ञा होईल तदन्वयें वर्तणूक करितात, त्याच अन्वयें यांची वहिवाट करून, बिघडले बंदोबस्त नीट करून, कारभारी व कारभार सरकारलक्षाचे वहिवाटींत आणावयाचा समय हाच आहे. पुढें शिंयाचे पेंच्यांत पडल्यावर काबू कैसा पडेल न कळे. या सरदारीचा बंदोबस्त सरकारलक्षानें राहिल्यास अल्लीबहादर व हे सरदारीचा जोड घालून ठेवावा. त्यांत हिंदुस्थान व फौज कबज्यांत राहते. पन्नास साठ लक्षांचा सरंजाम त्याची तऱ्ही फौज राहील. स्वामी ह्मणतील सरदारी मोठी, यांस धक्का पोंहचून हलकी होते. तर सरकारचे केल्यानें होत नाहीं. यांचे कर्मानें व चालीनें [होते.] सरकारांतून न सांभाळेल तऱ्ही बुडत बुडत आलें आहे. सरकारांतून दाबून बंदोबस्त केल्यास वांचेल व सरकारउपयोगी. दुसऱ्याचे लगामीं न लागतां राहील. यांसी कांहीं बळ पाहून साभिमान गोष्ट कांहीं बोलल्यास बाई बोलेल, तर याचा प्रकार बंदोबस्तांत ठेऊन, सरकार नेट असल्यास महल रक्षून त्रिस्थळी..........................

....

..................येऊन करणें तें स्वामी करितील. सरकारांतून आज्ञा राजश्री बाळाजी गंगाधर यांसी जाली कीं, राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांनीं देशास यावें. त्याजवरून त्यांनीं पत्रें पाठविलीं कीं, देशास येण्याचें ठरलें. शिंद्याचे कडील वांटणीचा जाबसाल पुण्यासीं शिंदे असतां ठरेल, हा विचार. यास्तव राजश्री बिनायक बाजी, दादाजी गंगाधर यांनीं रवाना सरकारपत्रासहित केलें. त्याजवरून जावें न जावें, ही भवती न भवती. त्यांत मुख्यत्व खर्चास नाहीं व शरीर खर्चिल्यांत. व पुण्यास पहिले देणीं सावकाराचीं, नवा पैसा मिळणार नाहीं; व सरकारच्या बाक्या साक्या काय निघतील व दरबारखर्चासुद्धां काय मागतील; येथें फजिती फौज कारभारी, सरदारसुद्धां आहेत, तेथें दिसून भ्रम जाईल; हाहि आंदेशा करितात. हेहि विचार जावें. महाल देशीं आहेत. महालकऱ्याशीं बदमामली बाईमुळें करितां येत नाहीं. नर्मदा उतरले म्हणजे भक्षायासी गुजरान महालावर चिठ्या करून भक्षावें. महाल खराबींत आलेच आहेत. मल्हारजी होळकर यांची

अवस्था काशीरायांसी वस्त्रें दिधल्यास आपण बखेडा उत्पन्न करावा, असा प्रकार व असे विचार येथें घडत आहेत. देशास सरकारआज्ञा येण्याची जाली, तऱ्ही येणें घडतां दिसत नाहीं. सर्वांच्या बुद्धी कालग्रस्त जाल्या आहेत. कमकसर अडीच महिने इंदुराहून येथें येऊन जाले. पुढें मास पक्ष येथेंच आहेत. राजश्री विनायक बाजी तेथून रवाना जाले, ते आठा चौ रोजांनीं आल्यावर साकल्यार्थ यांजला समजून विशेष घडेल तें लिहूं. महादजी शिंदे पाटिलबावांचा काळ जाल्यावर, स्वामींची आज्ञा होळकरास आली. त्याअन्वयें त्यांचीं पत्रेंहि हिंदुस्थानांत व आम्ही आपलीं पत्रें व सरकारचीं पत्रें होळकरास होतीं, त्यांच्या नकला त्या पत्रासमागमें रवाना केलीं. राजश्री गोपाळराव रघुनाथ, जिवाजी बल्लाळ व खंडेराव..........................उत्तरें होळकराकडील.............
..............पत्रोत्तराच्या नकला सेवेसीं रवाना केल्या आहेत. पावून साकल्यार्थ ध्यानास येईल. त्याजकडील कारभारी यांनीं तिकडील बंदोबस्त राखल्याचें साकल्य लिहिलें आहे. शिंद्याचे पदरीं माणसें सरंजाम चांगला, परंतु सर्वांची एक चित्तें राहून निभावणी वर्ष दोन वर्षें होणें दुरापास्त. त्यांत डिभाई इंग्रज सर्वां सरदारांपेक्षां शिंद्याचे सरदारींत जबरदस्त, जयनगरवाले, रजवाडे वगैरे व इस्मायीलबेग सुद्धां बखेड्याचे करणार, तितके त्याचे सूत्रांत; व त्यांचे वियमानें सलुख्यांत आहेत. सांप्रत पातशाहाचें सूत्र देखील इंग्रजांकडे लागलें आहे. दिल्लीचीं पत्रें कारकून राजश्री गंगाधर शिवराम सेवकाकडून आहे. त्याचीं पत्रें मजला चंद्र ४ साबानचीं आलीं, तींच बजिन्नस सेवेसीं पाठविलीं आहेत. अक्षरशहा मनन करावीं. पत्रोत्तराची आज्ञा व्हावी. त्या प्रांतीं बखेडा उठल्यास व पादशाहा रजावंद नाहीं येणेंकडून इंग्रजाकडे गेल्यास, मग सर्व गोष्टी हातीं येणें यास दीर्घ प्रयत्न पडेल. दिल्लीचीं पत्रें सेवकाकडील आलीं. ते शिंद्यांकडील कारकून यांचे दृष्टीस पडल्यास, तेथें आमचा टिकाव होणें संकट. यास्तव त्यांजकडे पत्रें न समजावीं. सूचनार्थ विनंति लिहिली आहे. पूर्वीं एका दो पत्रीं, सेवकाचा उपयोग येथें विशेष नाहीं यास्तव येथें येण्याविषयीं लिहिलें आहे. उत्तर आज्ञा यावी. गंगाजळनिर्मळ बाईचें मानस....................................
....
.............................चैत्र शुद्धांत वस्त्रें देणार. येथील अर्थ आढळला तो लिहिला. पत्रोत्तराची आज्ञा सत्वर व्हावी. सेवेसीं श्रुत होय. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०.

श्रीराम. ता. २९ मार्च इ. स. १७९३.

"सेवेसीं विनंति राजश्री तुकोजीबाबा सुभेदार यांजला सरकारचीं व स्वामींचीं तात्यांचीं पत्रें तीन व तशींच गंगाजळनिर्मळ अहल्याबाई यांस तीन पत्रें राजश्री विनायक

बाजीराव घेऊन आले. याखेरीज तात्यांचे हातची खास दस्तूर पुरवणी तुकोजीबावा यांचे नांवें मशारनिल्हेंनीं आणली. त्यांत विशेष इतकेंच कीं, आपण सत्वर यावें; सर्व अर्थ आपले मनोदयानुरूप घडतील. वरकड राजश्री आपा सांगतील, त्याजवरून ध्यानास येईल म्हणोन पत्रें. त्यांचीं उत्तरें तेथें पावलींच असतील. मुख्यार्थ, देशी येण्यास संशयही बहुत चित्तांत आणितात. व बाईची ताकीद वारंवार सरकार-लक्षानें व आपले लक्षानें चालावें हें बहुत, यास्तव जावेंसें म्हटलें असतां जातों मात्र म्हणतात. त्यांत पुत्रमोह कीं, काशीरायासी दवलतीचीं वस्त्रें व मल्हा-रराव यास लिहिणें पढणें गुण मात्र आहेत, हे मोहदृष्टीनें दिसतात. यास्तव त्यांनीं कारभार करावा व जो कारभारी होईल त्यानें रुपये पुरवावे, व कारभारी यानें सरदारपुत्रांचे संधानांत चालावें. या विचारावर ज्येष्ठ काशीराव याजला वस्त्रें बाईकडून देववावींसें सिद्धांतांत आणून, इंदुराहून येथें आणून मुहूर्तविचारणा देखील जाली. तेव्हां कनिष्ठ पुत्र मल्हारराव यांचे व सरदारांचे विचारें त्यांनीं बाईस सांगून पाठविलें कीं, सरदार तुकोजीबावा आहेत तों वस्त्रें कोणास देऊं नयेत; तुकोजीबावामागें होणें तें होईल. कदाचित् तुम्हांस करणेंच तर अर्धी दवलत वांटून द्यावी. ऐसें न केल्यास बखेडा होईल. काशीराव नाहीं किंवा मी नाहीं, सुचेल तें करीन, अशीं उत्तरें आलीं. तेव्हां बाईनीं तुकोजीबावांस सांगितलें कीं, उभयतां चिरंजिवांची ही दशा! पुढें काय करितां? तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, वांटणी करून उभयतांस समजाऊन करणें तें करावें. तेव्हां बाईनीं सांगितलें कीं, "तुम्हांस पुत्रमोह सुटत नाहीं, व आपला गुणदोष ध्यानास येत नाहीं. पुत्रांसीं बेमुर्वत होऊन दवलतीस ज्या गोष्टी राखण्याच्या त्या करवत नाहींत. तेव्हां घरीं दारीं, सरकारांत, कारभारीयासुद्धां मजला बदनाम करावें व आपण कुचाली व क्रिया सोडून, वर्तणुकी करून, पापाची विशेषता पुत्रासहित करितां! आपलें हित अहित पाहून करीत नाहींत. मागें जालें तें जालें, पुढें इतका नाश होऊन समेट नाहीं! असो, होणार तें हो. तुह्मी धन्यापासीं जातच आहां. तेथें तुह्मी व तुमचे कारभारी करणें तें करा. उपरांत मी वस्त्रें तेथील अन्वयें देईन. सांप्रत देशीं जावें. त्यांत कनिष्ठ चिरंजिवाविषयीं येथील मुत्सद्दी व तेथें दादाजी गंगाधर यांची अनुकू-लता नाहीं. कनिष्ठास अरगळेंत ठेऊन काशीरायासी वस्त्रें द्यावीं तर सर्वांस खातरजमा. त्यास दादाजी गंगाधर यांजकडून राजश्री विनायक बाजीराव आले. याजला म्हणतात, देशीं फौज वगैरे खर्च नेणें लागेल, तो तुह्मीं चालवावा. येविषयीं आंगेजणीं पक्कीं असावीं. तिकडे सावकाराचें देणें त्याचे तगादे होतील. महालाचा गैरहंगाम, सरकारचाकरी मसलत पडल्यास करावी लागेल, अशीं संकटें मध्यें आणून साशं-कित चित्त करितात. बाईचे व सर्व मंडळाचे तगादेही होतात. तेव्हां जावें हें म्हणणें. सर्व मंडळानें सरकारांत येतो म्हणून, दस्ताऐवजही जलदी करून पत्रें लिहून रवाना केलींच आहेत. गैरहंगाम पैक्यास महालाचा दुसाला पैका व याखेरीज

सावकारी गांवोंगांव त्यांचा पैसा कांहीं न पुरतां खाऊन चुकले. इथःपर बाईच्यानें पैका देववत नाहीं व मिळत नाहीं. तेव्हां सर्व भार तुम्हां कारभारीयांवर." हें बोलणें नित्यशहा चाललेंच आहे. कारभारी पारनेरकर सर्व मंडळ यांचे मतें बोलणीयाची खातरजमा दादाजी गंगाधर यांजकडील विनायक बाजीरायाकडून करवावी व येथून बनेल तसें काढून पुण्यास न्यावें. तेथें दादाजी गंगाधर यांचे विचारें शिंद्याकडील कारभारी राजश्री आबा चिटणीस व राजाराम विठ्ठल ममतेंत आहेत, त्यांसीं पक्काई शपथपूर्वक जालीच आहे. व आबा चिटणीस यांचे व शिंद्याकडील बाळोबा पागनीस, जिवाजी बल्लाळ वगैरे शेणवाई मंडळाचे मनांतून नीट नाहीं, यास्तव पुढें तोड राखावयास दादाजीचे हातें कारभार घेऊन, होळकराची सरदारी आपले पेट्यांत लाऊन घेऊन, परस्परें कारभारी यांचें एक सूत जालें ह्मणजे दोन्ही सरदाऱ्यांची वहिवाट एकविचारें व्हावी, हें त्यांचें संमत. यांत सरदारीचा बंदोबस्त सरदार पुत्रासुद्धां होऊन, बाईचा बंदोबस्त कारभार करून महत्व बाळगितात, हें सर्व घेऊन सरदार व बाई दादाजीचे आज्ञेंत. व दादाजी गंगाधरांनीं पैका पुरवावा व कारभार पारनेरकर मंडळींनीं करून दादाजीस समजावून सरदार व बाई जैसी आपले सूत्रांत आणावी, तैसेंच दादाजींनीं फसून पैका व बुडावयाचा कारभार तो त्यांनीं करावा; यांनीं कवडीस न गुंततां कारभार आपण करावा; दोन्ही सरदाऱ्या सरकारलक्षांत एकीकडे चालवाव्या; यास्तव सरकारपत्रासहित ठेऊन चालावेंसें पत्रांत आणून सरकारपत्रांचीं उत्तरें लिहिलीं आहेत. व सरकार व आपलें अनुमत तेव्हां आपणही अनुकूल असावें. जावें, निधावें, राहूं नये, सरकारची बादनामी घेऊं देऊं नये, हें बाईचें म्हणणें नित्यशहा चाललेंच आहे. शिबंदीचे बखेडे, हंगामे, व पलटणी सरंजामाचे लागलेच आहेत. जुने सावकार येथें एक दोन त्यांचे फसाव पैक्याचे जाले, याकरितां दर्शन घेत नाहींत. नवे दिवाण होतील त्यांनीं सर्व पुरवणी करावी. सरदार आपले पदरास प्राणांत जालें तरी ढका लागूं देणार नाहीं. बाईनीं आजपर्यंत पुरवणी केली, पुढें त्यांसही उमेद नाहीं; कर्ज पैका मिळत नाहीं. शेणवाई मंडळ शिंद्यांकडील त्यांचीं बोलणीं, आपले लगामीं सरदारी असावी, आबा चिटणीस यांचे लगामीं नसावी, हें त्यांचें लक्ष आपलेकडे लाऊन घ्यावें ह्मणोन सूत्रें करितात. नारो गणेश यांचे पुत्र व भाचे यांनीं कारभार करावा, सरकारांतून व बाईकडून खातरजमा पक्की करून घेऊन कारभारांत यावें, पैका तजविजीनें लावून दगा न खातां कारभार करावा. बाईची शुद्धता करण्याची, त्यांजकडे सरकार अनुमत आणून तुकोजीबावांकडून बोलऊन दादाजी गंगाधर पारनेरकर मंडळीसुद्धां पैका मिळत नाहींसे फजीत करून, नारो गणेशाचे पुत्राची स्थापना व्हावी; अशा तऱ्हा येथील चालल्या आहेत. आपली आपली लोभाविष्टता व पापोत्कर्षता आहे. स्वामींनीं दोन्ही सरदाऱ्या एकमेकांची दर्जा राखून, आपल्या आपल्यांत मिळूं न

देतां, दोन्ही सरकार लक्षांत व अलीबहादराची फौज व सरंजामी सरकारचे शिंद्याचे तैनातीस आहेत ते, व याजशिवाय फौजेचें देणें तें थोडेंबहुत देऊन, त्याचें नियंतृत्व योग्य असेल त्यास सांगून, येथील मंडळांत अहल्याबाईस पक्के सूत्रांत राखून आपलेकडून भडकून दुसरे सूत्रांत शिंद्याचे कारभारी वगैरे यांचे लगामीं लागू न यावें. सांप्रत येण्याचे मसलतींत येथील कारभारी दादाजी यांस पुढें करून बदनामी देतात. यांत बाईस संशय सर्वां ठिकाणीं होऊन, आपले ऐश्वर्यास बट्टा लागूं देणार नाहीं, यांत साभिमान व तजवीज योजणारसें वाटतें. त्यास येथें अवघा ऐवज व गेल्या गोष्टींतही जे कांहीं समेट अथवा अभिमान धरणें, ते बाई. वरकड माल नाहींत. त्यांनीं आजपर्यंत गुजराथसुद्धां जें कांहीं केलें, तें स्वामींचे लक्षावर व पुढेंही आपलें लक्ष पक्कें असल्यास त्यांचा खंबीर पक्काच आहे व राहील. यास्तव, खासदस्तुरें पत्र चिटी पुरवणी खातरजमेची कीं, आपले महत्वाविषयीं जपणूक पूर्वीपासून, व लक्ष आपलेकडे आहे, आपले मनोदयानुरूप सर्व गोष्टी घडतील. लक्ष एकरूप इकडून आहे तैसें आपलेंही आहेच व असावें. साकल्य मशारनिल्हे बोलतील. दुसरा अर्थ चित्तांत न आणावा. म्हणून जरूर पाठवावें. सेवकास अलीकडील प्रकरणीं आज्ञा कांहींएक आली नाहीं. तेव्हां हा मजकूर लिहिण्यास प्रयोजन नाहीं. तथापि, येथें असतां आढळला मजकूर सेवेसीं विनंति लिहावी. पुढें मर्जी. आजपर्यंत दरज उभयतां सरदारांची मिळूं न देतां, लक्ष सरकारचें राखलें आहे. पुढें करणें तैसें करावें. सेवकास आज्ञा कोणती ती अतिसत्वर यावी. हें पत्र पुरतें मनन करून कोणाचे दृष्टीस न पडतां फाडून टाकून, उत्तरीं आज्ञा स्वामींनींच करावी. बाईस पत्र पाठविणें तें फार जलद या प्रसंगीं पाठवावें. नच पाठवावयाची मर्जी असल्यास मजला तरी सूचना जलद पाठवावी. सेवेसीं श्रुत होय, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११.

श्रीराम. ता. २ एप्रिल इ० स० १७९४.

"सेवेसीं विनंति ऐसीजेः—येथील वर्तमान साकल्य चंद्र २० व चंद्र २२ रजब व चंद्र ८ व चंद्र २५ साबानीं डांकेंत पत्रें सेवेसीं रवाना केलीं, त्यांत साकल्यार्थ सेवेसीं श्रुत जालाच असेल. त्यानंतर चंद्र २६ साबानीं राजश्री विनायकराव बाजीराव येथें आले, ते अकरा घटकांनंतर गंगाजलनिर्मळ अहल्याबाई यांस भेटले. भेटून रा. तुकोजीबावा सुभेदार यांस भेटले. बोलणें होऊन सरकारपत्रें श्रीमंतांचीं व स्वामींचीं व तात्यांचीं वाचून दाखविलीं. उभयतांस पत्रें एकरूप "गुजराथचे मसलतीस जाण्याविषयीं देवराव महादेव यांस तुम्हांकडे रवाना करून निश्चयांत आणिलें होते, अलीकडे महादजी शिंदे यांस देवाज्ञा जाली यास्तव तो विचार राहिला. देशीं यावें याविषयीं राजश्री विनायक बाजीराव यांस सांगितलें आहे. बोलतील." म्हणोन पत्राचे भाव उभयतांस निर-

निराळे वाचून दाखवून, उभयतां एकस्थळीं होऊन, विनायक बाजीराव व शिवाजी गोपाळ व खंडो महादेव नवे कारभारी निसबत पारनेरकर व नागोपंत नवे मुसाइब तुकोजीबावांपाशीं जाले आहेत. बाईपाशीं बाळाजी कृष्ण व भगवंतराव बल्लाळ सर्वांसहित खलबत जालें. त्याची भवती न भवती, देशीं जाण्यांत सुखें किती, दुःखें किती, यांचे विचार व आपलेपाशीं साहित्य किती, शिंदे तेथें आहेत त्यांचे देखतां वांटणी वगैरे जाबसाल करून घेणें, तेव्हां त्याजवर बोज पडून कार्य व्हावयाजोगें कांहीं तरी समागमें साहित्य असावें. त्यास पैका पाहिजे. महाल वगैरे फडशा दुसाला गुजराथचे मसलतीस जाणें म्हणोन व पोट व समजाविस केली, पुढें राहिली समजाविस व पोट व मार्गांत व पुण्यांत देशीं राहणें पडेल तोंपावेतों व दरबारखर्च व सरकारचो बाकीसाकी निघेल, व देशीं गेल्यावर दैवांत मसलत सरकारांत येऊन पडल्यास चाकरीस रहाणें, त्यास फौजेचा सरंजाम नवा ठेवणें त्यास पैका पाहिजे, याचा व कारभारी पाहिजे याचा बंदोबस्त जाला पाहिजे. अशीं बोलणीं नित्यशहा होत आहेत. पत्रोत्तरें रवाना. त्यांत हाशील कलम सावकाराचा उपद्रव नसावा; सरकारची बाकीसाकी मागूं नये; शिंद्याची आपली मानमहत्वें वांटणी, आह्मी ज्येष्ठ तो ज्येष्ठत्वाचा मान आम्हांकडे आहे, तैसा चालवावा; म्हणजे देशीं येणें घडेल. ह्मणून पत्र चंद्र १ रमजानचें तें तिसरे माहेमजकुरीं रवाना व राजश्री विनायक बाजीराव यांनीं आपलीं पत्रें सेवेसीं व राजश्री दादाजी गंगाधर यांजकडे रवाना केलीं आहेत, त्यांजवरून सर्व अर्थ ध्यानास येतील. तात्पर्य, येथें बहुवशता, एकांत एकाचें संमत नाहीं; एकानें करावें तें दुसऱ्यानें असह्य मानून त्याविषयीं विकल्प घालून आणीकच करावें. ऐशा येथील चाली! सरदार सर्वज्ञ, सर्व अर्थ पैदरपय लिहीत गेलोंच आहें.…सांप्रत…गुजराथचे मसलतीचीं बोलणीं येथें आल्यावर बाईशींच पाडलीं व एक दोन सूत्रें बाईचीं त्यांजकडऊन बोध करविला; आणि हसील कलम बाईस समजाविलें कीं, शिंद्याचे लगामीं लागतां शत्रुत्व पडलें, तेव्हां मित्रत्व होणें दुर्घट. सरदारीस आब येणार नाहीं. त्यांत सरदार तुमचे कर्ते, किंवा साभिमान किती, व पूर्वांपासून क्रिया तुमचे चरणीं कैशी, हेंही आपले ध्यानांत. त्यांत महादजी शिंदे पाटीलबावा यांचा तुमचा—तुकोजीबावाची कुमक पैक्याची व फौजेची रवानगी तुम्हीं केली, त्यांनीं लढाई चाल चुकून केली, यास्तव सिकस्त खादली. परंतु कुमक पुस्तपन्हा तुम्हीं करून मसलत वाढविली, हा पाटीलबावाचे मनांत-तुमचा किंतू पुर्ता पडला आहे. त्यांसींच जोड पाडून, ते आपण समजल्यानें तुमचे सरदारांची गांठ पडल्यानें व त्यांचे मागें फिरल्यानें, राहील दौलत त्यांत संतोष तुकोजीबावांस आहेच. व विशेष मानून पूर्व संकल्प जैसा पाटीलबावांनीं सखुबाईचा वगैरे बंदोबस्त केला, तैसा आमचा करून द्यावा हे सरदार ह्मणतील. पाटीलबावांस ही सरदारी निर्माल्य करून आपले मागें लावून घेणें. त्यांत साभिमान तुह्मी. तुमचा बंदोबस्त जाला

म्हणजे सरदारी आपले पेट्यांत पडून चार पथकें सरंजामीं सरकारचीं आहेत त्यांत गणना घडेल, व तुह्मी साभिमान राहतां यास्तव नर्मदेचा घांट देखील वेगळा करून, तुह्मांस न भेटतां उतरून गेले. तेव्हां सर्व रुसवे तुह्मांवर. याचा परिणाम दवलत राहण्याचा व सरदारी राहण्याचा ध्यानास आणून, सरकारलक्ष व उभयतांचें लक्ष सर्वात्मना राखून रहावें, यांत सत्पक्ष. धन्याची मर्जी व फौज चार दिवस पोंसावयास गुजराथची मसलत, त्यास सरकारांतून कुमक करणार. ज्याप्रमाणें शिंद्याचा उपराळा पथकें अलीबहादर वगैरे यांजहून कमज्यास्त तुमचाही होईल. यांत श्रीमंत नानाचें व तात्याचें लक्ष तुमचे ठायीं पूर्वींपासून खचित आहेच, व अधिकोत्तर होईल. नाहींतर परिणाम शिंद्यापाशीं लागणार नाहीं. ताराबाई, उमाबाई आदिकरून बायकांस कारभाराचें यश नाहीं. तुह्मी धर्म करितां; पुण्य सामग्री पदरीं; महेश्वरीं रेवातीरीं सत्क्षेत्र धरून पक्क्या रीतीनें आहां, त्यास बट्टा लागेल. उत्तम जाणाल तें करावें. असें बोलणें होऊन, एका दोघांकडून खचित करून, बाईशीं बोलणीं आमचीं होऊन, तुकोजीबावांकडे बाबाजी निंबाजी कारकून बाईनीं पाठवून, त्याजकडून गुजराथचे मसलतीस रुकार देववून, सरकारांत पत्रें तुकोजीबावांचीं व आपलीं व शिंयाकडील करणी भारी चालीची, किंवा पूर्वी मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे यांची करणी व सरकारनिष्ठा व भाऊपण्याच्या चाली राखण्याची, व सरकारांत फाजलें कोणींही काढलीं नाहींत व पुढें काढूं नये या अन्वयें लिहून, सेवेसीं रवाना केलीं. आमची रवानगी इंदुरास तुकोजीबावांकडे बाईनें केली. तेथें बोलणीं पडलीं, तीं साकल्य लिहिलीं. त्यांत मुख्यार्थ तुकोजीबावा व त्यांचे मुसाहेब खंडो महादेव वगैरे यांनीं नारो कृष्ण नि॥ शिंदे यांस सूत्र लावून, त्यांस पत्रें दीनतेचीं व नारो कृष्णाशीं बोलणें कीं, आमची शरम पाटीलबावांनीं राखावी, व आह्मी आपलीं मुलें त्यांचे वोटींत घालितों, हें बोलणें लाविलें. पत्रें रवाना केलीं. त्यांत साकल्य नारो कृष्ण लिहितील. याप्रमाणें राजकारण करितात. तों बाईनीं पांडुरंग शंकर बराबर आमचे दिधलेच होते. व कारकुनामागें कारकून व पत्रें पाठवीत गेलीं कीं, "सरकारआज्ञेप्रमाणें गुजराथेस जावें. डेरेदाखल होऊन पत्रें सरकारांत लिहावीं. असें लिहून आमचा उपराळा राखला. तुकोजीबावा आम्हांसीं बोलले, खंडो महादेवसुद्धां कीं, दोघे चिरंजीव महादजीबावाचे स्वाधीन करावें. हे साकल्य पूर्वी विनंति लिहिलीच आहे. इतका मनोगत सरदार व त्यांचे मंडळाचा! परंतु बाई सरकारचे लक्षांत. जें नाना तात्याचें लक्ष व सरकारमर्जी तेंच करावें. त्यांनीं आजपर्यंत नारो गणेश वगैरे व सरदारसुद्धां मशीं चालीं चालले, त्यास यजीत करून माझा कल नाना तात्या यांनीं राखला. मजला त्यांचे अनुमताखेरीज कांहीं कर्तव्यता नाहीं. असें आम्हांसी बोलून तुकोजी बावांस आठ दहा लक्ष रुपये खर्चास पाठवून, फौजेची तयारी करून, गुजराथेस जावयास पाराशर दादाजी याजकडून स्वारीस जाण्याचे

माहीत करून, ऐवज देऊन, इंदुरास रवाना केलें. डेरेदाखल दो कोसांवर कूच राजश्री काशीराव होळकर यांचे करून, तुकोजी होळकर येथें निरोपास आले. पुढें राहिला साहिला बंदोबस्त करून गुजराथेस जावेंसें येथें होत आहे, तों महादजी शिंदे पाटीलबावांचें वर्तमान आलें. तेव्हां पुन्हां तद्वत नजर सरदाराची व कारभारी मंडळ यांची जाली. तों पूर्वीं इंदुराहून अंतस्थ पाटिलबावांशीं सूत्र व राजश्री दादाजी गंगाधर याजकडे पत्रें पाठविलीं कीं, "बाईचे करण्यापुढें आमचा उपाय चालत नाहीं. गुजराथची मसलत न करितां आम्हांस देशीं बोलवावें. तेथें सरदारीचा बंदोबस्त करून बाईची सत्ता आम्हांवर नसावी. एकहाती काम असावें. ऐसा पैगाम लाविला. गुजराथची मसलत माफ होय तें करावें. त्यास पाटीलबावांचे मनांत आलें कीं, गुजराथची मसलत होळकरांनीं कबूल केली. तेव्हां परभारें आपले लगामीं लागतां, सरकारचे लक्षांत राहिल्यानें पोसतील, व पुढें पेंच पडेल. हिंदुस्थानांत जातां मागें पायबंद, यास्तव कैसेंही लगामीं लाऊन घ्यावें. या विचारें बुद्धिभ्रंशास बहुत लागले. व सरदार कारभारी दस्तैवजास बाईनीं गोऊन जें केलें त्याजवर "पांच महिने एक रूप गुजराथेस जावें, उपराळा सर्व प्रकारें राखीन. तुह्मी अनमानांत पडाल तर मी जाईन. द्वारकायात्राही करीन व सरकारचाकरीही करीन," ऐसे अर्थें बोलणें पक्कें होत गेलें. इंदुरास तुकोजीबावांस पत्रें लिहून आलीं. मजला बाईचीं पत्रें आलीं होतीं, तेच बजिन्नस सेवेसीं पूर्वीं पाठविलीं. अलीकडे पाटील-बावांचा काल जाला. सरकारांतून पत्रें आलीं कीं, शिंद्याचे सरदारास पत्रें खातर-जमेचीं पाठवावीं. त्यांत कित्येकांनीं सरदारसुद्धां कल्प काढिले कीं, दस्तऐवजीं गुंतों नये. ऐसेंही असतां उभयतांवर विश्वास. तेव्हां या प्रसंगीं कांहीं बोलणें उचित नाहीं. ते लिहितील तैसें करावें. याप्रमाणें पत्रें रवाना केलीं. बाईचें लक्ष सर्वात्मना सरकारलक्ष व आपले उभयतांचे मर्जीवर जें कराल तें कल्याण, असें पक्कें असतां, देशीं बोलावून घ्यावें, गुजराथची मसलत मान्य केली ते नसावी, व शिंद्याचे लगामीं रहावें. ह्या संकल्प सरदार व येथील सरदारमंडळांचा. शिंद्यांकडे पैगाम त्यांचा होताच. सांप्रत शिंद्यांचा काल जाला, आबा चिटणीस कारभारी जाले आहेत. सरकारांतून आज्ञा कारभारी यांनीं आणिली, उत्तम आहे. त्वरेनें जावें. आपला बंदोबस्त सरदारीसुद्धां घरचा दारचा करून घ्यावा. जलदीनें जावें. म्हणून बाईची वारंवार ताकीद कीं, पहिले नर्मदा उतरून डेरे करावें, जावें. दोन पक्ष कारभाराचे, एक पारनेरकर व दुसरा पक्ष नारो गणेश यांचे पुत्र व भाचे वगैरे हा पक्ष. यांत एका पक्षास संतोष कीं, दरबारीं जावें. तेथें सरदारीचा बंदोबस्त करून, लगामीं ठेऊन कारभार आपण करावा. दुसरे पक्षाचा विचार बोलतात कीं, सरदार कारभारी यांनीं कारभार करण्यामुळें बाईचे बंदोबस्त करून सरदारांसुद्धां ममतेंत ठेवावें. बाईस त्रिस्थळीस मार्गस्थ करावें. महत्व सर्व

घ्यावें. असे संकल्प विकल्प अनेका प्रकारचे घालितात. बाईचे तोंडें उत्तरें निघतात कीं, "मजला यांचे सरदारीसीं दरकार नाहीं. राहिल्या आयुष्यांत माझें महत्त्व आहे त्यास ढका, श्रीमंतांचे पायीं माझें आचरण शुद्ध व मल्हारजी बावाचें पुण्य आहे तर लागणार नाहीं; व जीवितव्य आहे तों लागूं देणार नाहीं. उभयतांचें लक्ष राखून राहिलें त्याचीं फळें वावगीं होणार नाहींत. कालांतरानें त्यांचेही लक्षांत अंतर पडूं लागल्यास ईश्वर माझा कोठें गेला नाहीं. हृदयस्थ आहे. तोच बुद्धीस प्रेरक होऊन यांतही सहस्र तोडी काढील." अशींही बोलणीं बोलून पुन्हां तुकोजीबावांस ताकीद कीं, कूच करावें, जावें, हेच लागली आहे, व सदाशिव मल्हार बक्षी दि॥ शिंदे यांचें बोलणें लागलें आहे कीं, तुह्मी आह्मी एक असून, येथेंच तहाचें बोलणें पाडावें, असेंही व्यंकोजी रामचंद्र शेणवाई होळकराकडील गृहस्थ आहेत, त्यांचे विद्यमानें बोलणें लागलें आहे. सदाशिव मल्हार देशीं शिंद्यांकडे जाणार ह्मणोन ऐकिलें. देशीं गेले असतील अगर जातील. मुख्यत्वें, शेणवाई मंडळ शिंद्याकडील, त्यांचे मनांत परभारा यांस समेट करावी, आपल्या आपल्यांत समजावीश पाडावी, व दरबारांत कारभार पडूं न द्यावा. सरकारांतून यांचा त्यांचा जोड सरकारदाखल्यानें सरकारअन्वयें पडून, यांची त्यांची मिळण पुर्ती न पडतां, अलीबहादर यांची व होळकराची जोड पाडून दोन्ही फौजा सरकारलक्षांत राखाव्या. होळकर ममतेंत राखणें तर बाईकडील लक्ष पक्कें राखून, यांचे हातें तुकोजीबावांकडील लक्ष पक्कें राखावें. तुकोजीबावांचें लक्ष व वचन व क्रिया यांचें प्रमाण व बुद्धि थोडी व सरदारीचे अब्रूवर नजर थोडी आहे. कदाचित् समक्ष येणें घडल्यास, पुत्र व कारभारी व खासा. पहिले पाहिले, तेव्हां नारो गणेश होते. आतां सर्व अर्थ ध्यानास स्वामींचे येतील. बाईचें लक्ष राखावें हें जरूर घडलें पाहिजे. यावर मर्जी स्वामींची. तेथें शिंदे दबून मर्जीनुरूप असल्यास शेणवाई मंडळास निक्षून ताकीद असावी कीं, वेगळीं सूत्रें सरकारइतल्याशिवाय लावूं नयेत; लावल्यास कार्यास पडणार नाहीं. जो बंदोबस्त होणें तो उभयतां सरदारीचा व सरकारवांटणीचा सरकारविचारें करावा. आपले आपल्यांत समजल्यास ठीक पडणार नाहीं. ह्मणून शिंद्याकडील मंडळास दाबून सांगावें. व होळकरास त्यांचे लगामीं लाऊन भडकूं देऊं नये. सरदारी लक्षांत ठेवण्यास अगोदर बाई लक्षांत ठेवावी. येथील अर्थ पाहून विनायक बाजीराव येथें आल्यावर जे अर्थ दृष्टीस पडले, ते सूचना असावी ह्मणोन विनंति लिहिली. मर्जीस येऊन प्रसंगोपात उत्तम तें स्वामी करतील. राजश्री नारो कृष्ण पाटीलबावांकडील कारकून राजश्री बाळाजी काशी समागमें दिले होते. त्यांनीं निरोप घेतला. देशीं शिंद्याकडे जाणार. पाटीलबावांचा काल जाला त्या तागाईत चार पत्रें सेवेसीं रवाना केलीं. त्यांपैकीं एक उत्तर अद्याप आलें नाहीं. सेवेसीं येण्याविषयीं लिहिलें, त्याची आज्ञा कांहीं

येत नाहीं. राजश्री विनायक बाजीराव रवाना जाले, त्याची पूर्व सूचना सेवकांस कांहीं नाहीं, व तेथून स्वार जाले हेही सूचना नाहीं. यास्तव चित्तांत अत्यंत चिंता जाली आहे! हें करण्यांत चालींत सेवकापासून कायावाचामनेंकडून सरकारलक्षाखेरीज व स्वामींचे मर्जीखेरीज चाल चालावीसें घडलें नाहीं. प्रारब्धयोगें स्वामींचे ध्यानास चूकसी आली असल्यास ग्रहदशा जाणावी. नखशीखपर्यंत सेवक अपराधी. क्षमा करणार स्वामी समर्थ. सेवेसीं येण्याविषयीं उत्तराची मार्गप्रतीक्षा करितों. सांप्रत येथें वर्तलें तें लिहिलें. पुढें होईल ते विनंति लिहूं. या पत्राचें उत्तर अतिसत्वर पत्र पावतांच यावें. येथून सरकारचीं पत्रोत्तरें व स्वामींचीं पत्रोत्तरें आलीं आहेत, त्यांजवर न जावें. येण्याविषयीं व मनोधारणाचीं पत्रें वारंवार येतच जावीं. श्रुत होय. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२.

श्रीगणराज.

"यादी कलमें येणेंप्रमाणें करारांत यावीं:—

१ ज्यानें कारभार करावा, त्यानें दहा हजार फौज, पागा, पथकें सरंजामी सुद्धां हजारी गणती, घोडे, माणूस चांगलें बाळगून, सध्यां मसलतीस सांगूं तेथें जावें. सरंजामी येथें हजर नसल्यास त्यांचे ऐवजीं दुसरी फौज ठेऊन, सध्यां काम चालवावें. त्याचा पैका अहल्याबाईचे विचारें सरंजामांपासून मुबदला करावा. सध्यां सरकारची गारद, पलटणें दोन हजार व तोफा, दारूगोळा सरंजाम तयार करून हजरी घेऊन चाकरीस असावें. कलम.

१ दहाहजार फौज, दोन हजार गारद, यांस रोजमुरे वगैरे खर्चाची अडचण पडूं देऊं नये. महालाचा ऐवज घेणें, कारभार करणें, तो अहल्याबाईचे विचारें करावा. मागील फाजलाची निकाल सोयीसोयीनें व तगेरी, बहाली, घालमेल करणें ती बाईचे आज्ञेनें करून, फौजेस ऐवज लागेल तो मुबदला करून घ्यावा. बाईचे महत्त्वास अंतर करूं नये. कलम.

१ सरदार तुकोजी यांचें चालीनें कारभार एखत्यारीनें करावा. दुसरीयानें कारभारांत ढवळा करूं नये. कलम.

१ वरकड दरखदारांनीं, दिवाणगिरी करील त्यास, हिशेबाचा दाखला समजाऊन, त्याचे आज्ञेंत चालावें. बखेडा करूं नये. कलम.

१ जुनें माणूस कैलासवासी मल्हारजी होळकर यांचे वेळचें, त्यांस काढूं नये. कामास केवळ प्रतिकूळ जाल्यास सरकारांत विनंति करावी. आज्ञा विचारून होईल त्या अन्वयें वर्तावें. कलम.

१ सरदारीचा गलहाटा; आजपर्यंत चाल नीट पडली नाहीं; यास्तव सरकारांतून समागमें ज्यास द्यावें, त्याचे दाखल्यानें सदरहू कलमाची वहिवाट करावी. कलम.

१ सरकारचा बाकीऐवज निघेल तो व तसलमाती वगैरे हिशेबीं निघतील त्यांचा निकाल सोयीसोयीनें सरकारांतून काढावा. त्याप्रमाणें सरकारचा झाडा करावा. कलम.

लेखांक १३.

श्रीराम. ता. ८ एप्रील इ. स. १७९४.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ७ रमजान मुक्काम महेश्वर स्वामीकृपेंकरून यथास्थित असों. विशेषः- येथील वर्तमान साकल्य पैं दर पैं लिहित गेलों, त्याजवरून श्रुत जालेंच असेल. अलीकडे राजश्री विनायक बाजीराव छ २६ साबानीं महेश्वरीं दाखल जाले. गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई व राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांची भेट होऊन बोलणीं जालीं. सरकार आज्ञेप्रमाणें देशीं हुजूर येण्याचा विचार होऊन, उत्तरें सरकारपत्राचीं सेवेसीं छ ३ मोह मजकुरीं रवाना जालीं आहेत. उत्तरें आल्यावर डेरेदाखल होऊन दरकूच चालले ह्मणजे सेवेसीं विनंति लिहूं. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १४.

श्रीगणराज. ता. २ आगष्ट इ. स. १७९४.

" सेवेसीं पोष्य देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत चंद्र ५ मोहरम मुक्काम महेश्वर स्वामीकृपेंकरून यथास्थित असों. यानंतर येथील वर्तमान साकल्य पैं दर पैं डाकेंत लिहिलें. अलीकडे जालें, तें चंद्र १७ जिल्हेजचें पत्रीं व चंद्र १ मोहरमचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून साकल्य श्रुत जालें असेल. अलीकडे विशेष नाहीं. नवे दिवाणगिरीवर राजश्री गणपतराव नारायण व राजश्री बाळाजी लक्ष्मण यांची स्थापना गंगाजलनिर्मळ अहल्याबाई व राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांनीं केली आहे. त्यांचे कारभाराचा बंदोबस्त अद्याप पडून कामकाज एक सुतांत चालीस लागलें नाहीं. जुन्याचे चालीनेंच आहे. फौजेच्या समजाविशीचा पैका देऊन आणखी निघत आहे. फौज हजार पंधराशें शिलेदार बखेडा करणार मात्र आहेत. पागेस घोडीं आहेत. बारगीर पैका पावल्यावर जमा होतील. नव्या कारभारीयांचा अभिमान बाईस बहुत पडला आहे. याजमुळें पांचा लक्षांपर्यंत कर्जवाम महालकरी मिळून महत्प्रयासें तजवीज होत आहे. त्यांत पागा फौज, गारद व मागील समजाविश थोडी बहुत होऊन, बनेल त्या रीतीनें येथील बखेडा तुटून, श्रावणी पौर्णिमेनंतर दरमजल कूच होऊन, देशास चलावें, राहूं नये येविषयीं बाईची ताकीद व सुभेदार यांचेही चित्तांत सांप्रत खचित आलें आहे.

तूर्त राजश्री मल्हारराव होळकर कुसलगडांत कैदेंत आहे. त्यांजला सोडून आपलेपाशीं आणावें, येविषयीं बाईपाशीं सुभेदारांची रदबदली बहुत. रात्रंदिवस निरोप येतात कीं, "कृपा करावी, पोर माझें स्वाधीन करावें. मी बंदोबस्त राखीन. निदान मर्जी नसल्यास मजला त्याजला एकत्र ठेवावें." असे कित्येक प्रकारें रदबदली लागली आहे. बाईचें ह्मणणें, शिवाय पुण्याचे आज्ञेखेरीज करितां येत नाहीं. तुह्मीं पुण्यास जावें. कुसळगडाची हवा वाईट असें असल्यास, थालनेरास अटकेंत ठेऊं असें ह्मणतात. फारच निग्रह पडल्यास पहावें, कसें करितात. स्वामींस येविषयीं पत्र लिहिलें, त्याची मार्गप्रतीक्षा करितों कीं उत्तर सत्वर यावें. त्यास बाईचे पत्राचें व सेवकाचे पत्राचें उत्तर अति सत्वर यावें. दिल्लीहून राजश्री गंगाधर शिवराम याजला पादशहांनीं बोलावून भाषणें केलीं. त्याचे अर्थ साकल्य स्वामींस लिहिले आहेत, व शुका स्वामींस पाठविला आहे. त्यास शुक्यावरून व स्वामींस पत्र लिहिलें आहे त्यावरून सर्व ध्यानास येईल. मुख्यार्थ, त्या प्रांतींची हवा फिरत चालली. आपसांत लौकिक ठीक नाहीं, हा लौकिक होत चालला, हें ठीक नाहीं. पाटीलबावा दैववान् होऊन यश मिळविलें. पुढें बखेडा तोडून स्वामींनीं बंदोबस्त राखून, हिंदुस्थान पादशहासुद्धां हातीं ठेऊन, इंग्रजाचा दस्त न होतां, पादशहा स्वाधीन राहेत. प्रस्तुत पादशहास समाधान करून पत्र पाठविणार स्वामी समर्थ. पंत मशारनिल्हेंनीं खुलें पत्र स्वामींचें सेवकापाशीं पाठविलें व जलद उत्तर येण्याविषयीं विनंति लिहिण्यास लिहिलें, यास्तव विनंति लिहिली. तेथें मजकूर प्रगटांत न येतां, पत्रोत्तराची व शुक्या पादशाही याचे उत्तराची आज्ञा सत्वर व्हावी. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, सेवेसीं श्रुत होय हे विनंति."

लेखांक १५.

श्रीराम. ता. ९ डिसेंबर इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ५ जमादिलावल मुकाम मनमाड स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असों. यानंतर राजश्री तुकोजी होळकर सुभेदार दरमजल कूच करून छ २ माहे मजकुरीं झाडीनजीक चांदवड सा कोस येथें मुकाम केला. छ ४ माहे मजकुरीं सेवकानें निरोप आज्ञेप्रमाणें घेतला. छ ५ माहे मजकुरीं मनमाड आठ कोस येथें जातों. तेथून दरमजल सेवेसीं येऊन पोंहचतो. वरकड साकल्यार्थ आलाहिदा पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे. सुभेदार यांणीं सेवकासमागमें पत्रें, स्वामींस व श्रीमंतांस दिल्हीं, तीं सेवेसी पाठविलीं आहेत. साकल्य समक्ष विनंति करीन. श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विनंति."

होळकराची कैफियत.

(अप्रसिद्ध भाग.)

["होळकराची कैफियत" ही महत्त्वाची ऐतिहासिक बखर 'काव्येतिहाससंग्रहा'मध्यें पुष्कळ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली आहे. तिच्या मध्यें श्री. अहल्याबाई होळकर ह्यांच्या कारकीर्दीमधील बराच भाग, मधलीं पृष्ठें हरवल्यामुळें अप्रसिद्ध राहिला होता. सदहू भाग सांप्रत उपलब्ध झाला आहे. तो फार महत्त्वाचा आहे असें वाटल्यावरून येथें सादर केला आहे.]

* * * *

* * * *

" मुकाबल्यास तुकोजी होळकर सुभेदार यांनीं हल्ला केला. मागाहून पेंढारी यांची लांडगेतोड बरीच झाली. दुतर्फा शह पाडून रोहिले कुल बरबाद केले. हें वर्तमान शिंदे, रामचंद्र गणेश यांस समजतांच, कूच करून, गंगा उतरून सुभेदारास सामील झाले. त्रिवर्ग एकत्र होऊन पथरगडास येऊन मोर्चे लाऊन किल्ल्यावर हल्ला केला. बायकापोरें धरून दरोबस्त लुटलीं. मलकाजमानीचे अन्वयें पेंढारी यांनीं बायकांस उपद्रव केले. दौलत बहुत निघाली. पुनः माघारी फिरले. दिल्लीवरून जाटावर यावयाचा हेत. या मसलतीस अग्रेसर तुकोजीराव होळकर. शिंदे व विसाजीपंत यांचे संकोचार्थ सामील खरे; परंतु मनांतील धर्म, कोणेही मसलतींत होळकरास तोंडघशीं पाडून, आपलें वर्चस्व होऊन, श्रीमंत माधवरावसाहेब यांस समजावें हा इरादा. गंगापारीहून पथरगडचे मसलतीचा समारोप करून, दिल्ली डावी सोडून, अरण्यांतून शेखावटींत आले. तेथोन पुढें जाटावर चाल करावी येविषयीं आग्रह. निकड होळकराची. उभयतां बाह्यात्कारें सामेल. झुकवीत झुकवीत हिंडोन बयाणामधें मुक्काम केला. तेथोन भरतपूर बारा कोस, दीग १८ कोस. सुभेदारच्या बोलण्यास रुकार मात्र, परंतु कूच करण्यास अनेक पर्याय दाखवूं लागले. तेव्हां एके दिवशीं रात्रीं सुभेदार रात्रौ भोजन करून गादीवर हुक्का ओढीत होते. चित्तांत बहुत उदासी आली कीं, जाटाचा रुवाब भारी. हे मोकाबल्यास आले जाणून जाट नवलसिंग ८०००० स्वार,

१२०० तोफा चालू, लाख पायदळ, शिवाय समरूचीं पलटणें ४, या सरंजामानिशीं दीग पाठीमागें ३ कोस टाकून, पुढें यांचे फौजेवर रुख दिला. सोबत्याचे मनांतील धर्म उघडाच दिसतो. आपलें जातीचें अंगठाण पाहतां, जमेतीचा अजमास पाहतां, पंधरा हजार इतलाखी शिलेदार, पांच हजार सरंजामी व पांच हजार पागा व पंचवीस हजार पेंढारी एकोण पन्नास हजारांची जुड. ईश्वर मार्तंड प्रांत कसा लावील असी मनांत व्यावृत्ती. तितक्यांत कांहीं डोळाही लागला. इतक्यांत साक्षात् मार्तंड, निळा घोडा, पांढरा पोषाख, खांद्यावर भाला, गळ्यांत गाठाळा, पाठीं भंडार, समोर येऊन बोलला कीं, "धनगरा, ऊठ. आठ अक्षरी मंत्राचा जप कां करतोस? मी पुढें चाललों. तूं मागें कूच करून जलद ये." इतकीं अक्षरें श्रवण करून जागे होतात, (तोंच) स्वार हा गेला असा भास झाला. तों इतक्यांत नगारखान्याचा जमादार येऊन विनंति केली कीं, "चौघडा अखेर होऊन दोन घटका झाल्या. मी माणसासुद्धां सामसूम निजलों. पहारेवाला बसला होता. तीन डंके नौबदीवर गैबी झाले. कानावर घालावयास आलों." हें श्रवण करून शरिरांत हिंमत येऊन, उपाध्यायास बोलाऊन नौबदीची पूजा करून, कोणास न पुसतां कूच केला. दीडा प्रहराचे आंत जाटांचा यांचा मुकाबला चौ कोसांचा राहिला. यांनीं मुक्काम जमवून, गोविंदराव बुळे यांचें पथक छबिन्यास उभें करून, सुभेदार स्थळ करून भोजन करून पलंगावर आंग टाकिलें. तों छबिन्यांतून सांडणीस्वार आला कीं, जाट येऊन पोंचला. आमची व त्याची गोळागोळी होती. तों सुभेदारांनीं नारो गणेश यांजला सांगून पाठविलें कीं, फौज तयार करून मुकाबल्यास जाणें. हुकूम येतांच नानांनीं फौजेस ताकीद करून घोड्यावर बसून ढालेपाशीं गेले. फौजही कट्टी होती. मानाजी फांकडे व भगवंतराम कदम, खंडोजी भोयटे व यशवंतराव चव्हाण, दोन महिने अगोदर तलब चुकऊन घेवून, शिंद्याचे जवळ चाकरीस राहिले होते. हे कूच करून पुढें आले. तेव्हां तेही यांचे बरोबर कूच करून आले. ४०० स्वारांचें पथक. धनगर उद्यां म्हणेल, पैका खाऊन समयास * * दाखविली. याकरितां विना बोलावण्यावांचून सामील झाले. शिलेदार घेऊन नाना पुढें चालले. तों छबिन्यांतून सांडणीस्वार दुसरा आला कीं, स्वारी लवकर यावी. आमचे पाय टिकत नाहींत. तेव्हां सुभेदार उठून, शौचाहून जाऊन येऊन, हत्तीवर बसून ढालेपाशीं गेले. रखमाबाईसाहेब बरोबर होती. त्यांनीं विनोदार्थ भाषण केलें कीं, "मी शेणगोळा करून ठेवितें." सुभेदार स्वार होऊन पुढें झाले. भिवाजी रणसोड, राहूरकर, पागनीस हे पांच चार हजार

हुजरात तयार करून हत्तीपाशीं आले. सुभेदारांनीं हत्ती बसवून आपल्या भंडारींतील भंडार भिवाजीपंत नाना यांच्या कपाळीं लाविला, आणि बोलले कीं, "झाल्या गोष्टीची उजळणी आज करून दाखवावी." हे उत्तर न करितां पुढें चालले. सुभेदारांच्या बोलण्यांतील तात्पर्य, नारो गणेशाशीं व राहूरकराशीं कांहीं चुरसाचुरस झाली होती. त्या प्रसंगीं भगवंतराव कदम व मानाजी फांकडे यांनीं राहूरकराचा पक्ष करून वर्चस्व ठेविलें. असले किरकोळ किस्त्यांचा बयाण फार होतो. श्रवण करणार चित्त पुरवून पुसल्यास सांगावयास येतील. त्या दिवसापासून उभयतां सरदार व राहूरकर यांचा संकेत होता कीं, जाटाचे लढाईचे प्रसंगीं दोन्ही गोषावर तुह्मीं उभयतांनीं असावें. मध्यवर्ती हुजरात. हुजरातीचें निशाण उठलें ह्मणजे तुह्मीं बेलाशक उठावें. त्यावर उभयतां सरदार गोषावर होतेच. हुजरात जाऊन मधीं उभी राहिली. जाटाकडील तोफखान्याचा मार अनिवार. फौज थिजून गेली. तेव्हां नारो गणेश यांनीं सांडणीस्वारसमागमें चिटी भिवबा नानाकडे पाठविली कीं, "दिवस चार घटका राहिला. या समयीं व्यर्थ मार खाऊन घोडें माणूस जाया करावें, हें ठीक नाहीं. या वेळेस टाळा द्यावा. सकाळीं पाहून घेऊं." तेव्हां नानांनीं उत्तर केलें. जबानीं सांगितलें कीं, "आह्मांस फार दिवस वांचावयाचें नाहीं. आपण यजमानापाशीं उभें राहून तमाशा पहावा." असें सांगून पाठवून सांडणीस्वारानें तोंड फिरवतांच हुजरातीचें निशाण उठलें. हें कदम फांकडे यांनीं पाहून, हजार हजार स्वारांचे सरदार त्यांनींही घोड्यांच्या अनिनी उचलल्या. ते समयीं, गोलंदाज तोफ भरूं लागले नाहींत, तों बासडे सही केले. तोफा मागें टाकून पायदळ कडब्यासह कापलें गेलें. हुजरात व कदम फांकडे यांचें हत्यार लागू झाल्यावर तमाम फौज उठली. पायदळाचें बीबूड करून स्वारांत शिरले. तों रांगडे स्वार घोड्याचें वेठण कमी, यामुळें बाजूनें पेंढारी व समोर फौज जाटांची, स्वार सरंजाम जमूं न शकतां प्रायशः मारले फार गेले. कांहीं जीव घेऊन पळालेही असतील. याप्रमाणें जाटाची तारांबळ करून, जाट जातीनें विवस्त्र होऊन, गोपीनाथ घुले मथुरेकर महाराष्ट्र भिक्षुक उभयतां घोड्याचे रथांत होते. ते पेंढाऱ्यांनीं विवस्त्र करून, खास जाट हा हें त्यांस न समजल्यामुळें शेंडी उडत डिगेंत शिरले. लढाई फत्ते झाली. ४ पलटणें समरूचीं ते लढाईचे अवलपासून तुटून किल्ला बांधून होती. त्यावर कोणी जाटाचा माणूस गेलाही नाहीं. पेंढारी याचे स्वार गेले आले. त्याजवर गोळा टाकून जवळ फरकूं न दिले. किल्ला बांधून शाबुतीनें आपले ठिकाणास गेले. बाकी सरंजाम तरबितर करून, चारी प्रहर रात्र बेटांत उभे राहून सूर्योदयीं मुक्कामास आले. लढाई लागली हें वर्तमान वि-

साजीपंत व शिंदे यांस कळतांच, येऊन सामील झाले. होळकराची फौज मरीमान्यांत शिंद्यांनीं लूट मनस्वी केली. श्रीमंतांकडील विसाजीपंताचे फौजेपैकीं जंबुऱ्यांचा मार कांहीं उपयोगीं पडला. एवंच दोन्ही फौजेनीं लूट केली. लढाई होळकरांनीं मारली. दुसरे दिवशीं सुभेदार तुकोजी होळकर यांनीं शिंदे, विसाजीपंत व आपले फौजेंत रुयात न ठेवितां, तिन्ही लष्करची लूट जबरदस्तीनें एकत्र करून बरहुकूम हिस्सा वांटून दिली.

इकडे देशीं माधवरावसाहेब याजला राजयक्ष्म्याचा उपद्रव होऊन काल झाला. हें वर्तमान समजतांच, फौज माघारा फिरोन, जाटापासून चार हजार रुपये घेऊन पूर्व स्नेह कायम करून सुभेदार इंदुरास आले. शिंदे उज्जनीस, विसाजी कृष्ण देशीं गेले. शिंदे, होळकर यांनीं फौजेची समजावीस करण्यास आरंभ केला. राडा बहुत पडला. गंगाधरतात्यांची हतोटी थोडक्यांत माणसाची समजूत ठेऊन माणूस हमराहा ठेवावें. हें करणें नारो गणेश यांजपाशीं कमी. याकरितां राडा पडोन राणाजी शिंदे चोंडीकर, बाईसाहेबांचे भाचे, पांचशें स्वारांचें पथक शूरत्वानें व कांहीं मातुश्रीसाहेबांचे हिमायतीनें, नारोपंत नानाची अपेष्टा फार करून तोंडाचा मागितला रुपया घेऊन, सुभेदारास रामराम करून, बाईसाहेब इंदुरास समजाविशीचे बंदोबस्ताकरितां आली होती, त्यांजलाही रामराम करावयास गेले. तों बाईसाहेबांनीं सांगून पाठविलें कीं, "असा मेळईखोर आहेस, तर मला तोंड दाखवूं नको." तेव्हां राणूजी शिंदे यांनीं विनंति सांगून पाठविली कीं, "धनगराचेच घरावर ईश्वर सुवर्णाचा पाऊस पाडतो, आणि इतर सरदार मेले असें नाहीं. तुझे आशीर्वादेंकरून चाकरी मिळवितों कीं, तें पहावें. ध्यानास येईल." असें बोलून, जबाब देऊन, नागपूर, प्रांत वऱ्हाड भोंसल्यांचे घरीं चाकरीस राहिले. सदतीस वर्षें चाकरी केली. इकडे कोणाचें तोंड पाहिलें नाहीं. पांच चार वर्षांनीं काळ होईल तेव्हां बाईसाहेबांनीं पत्रें पाठऊन बोलाऊन आणिलें. निंबहेडा महालपैकीं निमे जागा राणीपुरा जहागीर देऊन जहागीरदार केलें. इकडे माधवरावसाहेबांचा काळ झाल्यावर नारायणरावसाहेब गादीवर बसले. दादासाहेब कैदेंत होते. सखारामबापू व मोरोबा फडणीस, थोडेबहुत आनंदीबाई यांचा विचार एक होऊन, नारायणराव यांचा आठवे महिन्यांत प्राण घेतला. हें वर्तमान समजतांच शिंदे, होळकर कांहीं फौज पागा सरंजाम घेऊन पुण्यास दाखल जाले. दादासाहेब यांनीं कर्मांतर करून साताऱ्यास जाऊन राजाचीं वस्त्रें घेतलीं. तों नारायणरावसाहेब यांचें कुटुंब पुरंदरास होतें. दो महिन्यांचा गर्भ. असें कारभाऱ्यांस समजल्यावर, अग्रेसर बाळाजीपंत नाना फडणीस,

बराय मसलत बाह्यात्कारें सखारामबापू, मोरोबादादा यांस घेऊन मसलत केली कीं, साहेबास पुण्यास येऊं न देतां विनंति करावी कीं, राजाचे शिरपाव झाले, ते पक्षीं जेजुरी पंढरी देवदर्शन करून मग यावें. त्यांचेही मनास येऊन पुण्याकडे न येतां जेजुरीस गेले. फौजेंत मुखत्यार त्रिंबकरावमामा पेठे व लिहिण्याचे कामावर हरिपंत तात्या. फौजेंत हुकूम उभयतांचा. जातीचा सरंजाम साहेबांचा हजार बाराशें. जेजुरीहून पंढरीस आले. पंढरीस आल्यावर दादासाहेबांस फितुर समजला. मग आपल्या सरंजामानिशीं सावध राहूं लागले. एके दिवशीं देवदर्शनास मामा व दादासाहेब बरोबर गेले. तेथें मार्गांत हुकमें चुरसाचुरस होऊन तरवार चालविली. त्रिंबकरावमामा कामास आले. साहेब आपले सरंजामानिशीं वेगळे पडून, सरकारफौजेंत हरिपंततात्यांनीं बंदोबस्त करून, पुणें मुक्कामीं नानांस पत्रें लिहिलीं कीं, "येथें आपसांत तरवार चालून त्रिंबकरावमामा कामास आले. श्रीमंत आपल्या सरंजामानिशीं वेगळे राहिले. आह्मी सरकारी फौजेचा बंदोबस्त करून मुकाबला करून आहोंत. खर्चाची मदत लवकर करावी." ऐसीं पत्रें रवाना केलीं. जों जों ही मसलत उघडी होत चालली, तों तों बापू, मोरोबा फडणीस हे मनसब्यांतून गाळीत चालले. हरिपंततात्यांचें पत्र आल्यावर बापूस चिटी नानांनीं लिहिली कीं, पंढरपुरीं प्रसंग असा गुजरला. पुढें कैसें करावें ? तो अभिप्राय प्रायः ध्यानास आणून उत्तर सांगून पाठविलें. फौजेचा बंदोबस्त हरिपंततात्यांनीं केला आहे. खर्चाची मदत तुह्मीं करावी. हें श्रवण करून नाना प्रसन्न झाले कीं, भूतभविष्यवेत्ते हीं माणसें खरीं. मग हरिपंततात्यांचे खर्चाची मदत केली. यावर हरिपंततात्या दादांचे मागें लागले. दादासाहेबांचा विचार महेश्वरास जाऊन होळकरास आपलेंसें करावें. अशा बेतानें कसरावदेवर आले. तों बाईसाहेबांनीं कृष्णाजी मुरार यांजबराबर फौज देऊन दादासाहेबांचे मुकाबल्यास पाठविलें. "या प्रसंगीं आपलें येणें अप्रशस्त. आपण धनी. आपल्यास प्रतिकूल कोण आहे ? पण प्राप्त प्रसंगाची हवा पाहिली असतां, आह्मी मारले जाऊं. यास्तव आपणास नर्मदा उतरणेस सल्ला नाहीं." तेव्हां अलीमोहनचे राज्यांतून महीचे सुमारें गेले.

इकडे शिंदे, होळकर पुणें मुक्कामीं आल्यावर येथें फळी होतीच. शिंदे व नाना फडणीस यांचा मेळ पडून, होळकर, सखारामबापू व मोरोबादादा यांचा मेळ पहिल्यापासून होताच. तशांत तोतया भाऊसाहेब उभा राहून, डोंगरकठाडीचे किल्ले दरोबस्त घेऊन सिंहगडास येऊं लागला. तेव्हां शिंदे होळकर यांस आज्ञा झाली कीं, तुह्मीं यासी धरून आणावें. हुकूम होतांच शिंदे कूच

करून गेले. होळकरास जाण्यास अनुषंगावरोधेंकरून अवकाश लागला. तितक्यांत शिंद्यांनीं धरून आणिला. त्याचें पारपत्य केलें. किल्ले, जागा घेतल्या होत्या, त्या खाली करून घेतल्या. रामचंद्रनाईक परांजपे, तोतया याचा पक्ष धरून खरें असें ह्मणत होते, ते सरकार चोर झाले. यामुळें ते आपले ठिकाणीं साशंकित. यास्तव सरकार आप्त, मातबर माणूस. याचा आब घेतला असतां सरकार उपयोग व लौकिक तादृश. दौलतींतील माणूस. मात्र जाया होईल. असें जाणून, पुरंदरास कोणास पाठऊन त्याची दिलजमाई करून किल्ल्याखालीं आणून पूर्ववत् व्यवसाय करून असावें असें केलें. शिंदे व नाना फडणिसांच्या पेढ्या एक. यांनीं मसलत करून बापू व मोरोबा व नारो गणेश, होळकराचे कारभारी, तिघांस जरब द्यावी असा व्यूह सिद्ध केला. हें वर्तमान इकडे समजल्यावर मोरोबा फडणीस, नारो गणेश उभयतांची मसलत होऊन बापूस इतल्ला केला. बापूंनीं या मनसब्यास दूषणें लाविलीं कीं, "श्रीमंतांचे राज्यांत फळी बांधून, धनी माथ्यावर नसतां अपस्वार्थाकरितां बखेडा करावा ही नेकसल्ला नाहीं. असेंच करणें असतें तर कंपेष वर्षांचा आरसा होता. यांत यावें तर दिल्लीपावतर पुणेंपावतर वंश केला असता. परंतु हें कृत्य करून हरामखोरीच्या मरातब्यास येऊन आपलें इहपरत्र कां बुडवावें? सांप्रत आपल्यास कैद करून प्राण घेतील. यांत आपली क्रिया राहून परत्र साधन घडेल. वांचणें किती दिवस? कोणीही अग्रेसर होऊन श्रीमंतांचे दौलतीची पैरवी बांधावी ही नेकसल्ला." असा भावी इतल्ला करून योजिला घाट मोडून टाकिला. पुढें मोरोबा फडणीस याला कैद करून नगरचे किल्ल्यावर पाठविलें. सखारामबापू यांजला कैद करून कोंकणकठाडीचे किल्ल्यावर ठेविलें. जातेसमयीं आक्षेप घेतला कीं, नानांशीं आह्मी दोन गोष्टी बोलूं, मग जाऊं. तेव्हां नानांस गांठ घालणें प्राप्त आलें. गांठ घालून बोलणें झालें कीं, "तुह्मीं हें कृत्य केलें फार चांगलें. उगाच प्राकृत संसार करण्यांत चार हुकूम असल्यास पुरी पडत नाहीं. तेव्हां ही तर दौलत. त्यांत धनी नाहीं. चार हुकूम ह्मणजे दौलतीचा नाश आहे. परंतु या दौलतीचे रफीक पूर्वींपासून होळकराचें घर. सांप्रत तुह्मीं सिंदीबन वाढविलें आहे. यापासूनच तुह्मांस अपाय होईल. हें खचित मनांत वागवून फार जपावें. बाकी तुह्मी विचक्षण, रजाचा गज करून दौलत नमुदास आणाल, हा मज भरवंसा. सांगितल्या गोष्टीस फार जपावें." इतकें सांगून पालखींत बसून किल्ल्यावर गेले. पुढें नारो गणेश यांसी कैद करून पुरंदरावर ठेविलें, आणि होळकराची दिवाणगिरी दादाजी गंगाधर यांस सांगितली. या गोष्टीस संमत कांहीं बाईसाहबांचेंही खरें. परंतु तुकोजी

होळकर सुभेदार यांचा व दादाजी गंगाधर यांचा मेळ न पडतां सुभेदारांनीं दुखणें काढलें. कचेरी झालीच नाहीं. इकडे नारो गणेश यांनीं शिंद्यांचें साधन करून लाख रुपये देऊन सुटका केली. नानांस समजाविलें कीं, तुकोजी होळकर याचें मनोधारण तोडून आपला अर्थ तो काय ? नारो गणेश कंपेश करतील. याचा जिंमा आमचा. ऐसी खात्री करून, नारो गणेश यांजला सोडवून आणून पुनः दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. दादाजीचा कारभार सहा महिने राहिला. सहा महिने सुभेदार यांनीं कचेरी व स्मश्रू सोडून पलंग धरला होता. नारो गणेश कचेरींत आल्यावर स्मश्रू व स्नान करून शिरे दरबार झाला. त्या समयीं शिंदे यांनीं १५ लाख रुपये नजर कबूल करून विनंति करून घेतली. तेव्हां कोणीं कोणीं सुभेदारासही सूचना केली. आपणही विनंति करून घ्यावी. त्यांनीं उत्तर केलें कीं, "रुपये द्या, विनंति करून घ्या. यांत विशेष तें काय आहे ? आह्मांस श्रीमंत धनी आणि ब्राह्मण यांचा आशीर्वादच चांगला." विनंतीची खटपट केली नाहीं.

इकडे हरिपंततात्यांस मसलत तोलेना. सबब शिंदे, होळकर यांजला मदतीस पाठविलें. शिंदे व नाना फडणीस यांचा भीतरपेठा मेळ. कांहीं कारणांगभूत शिंद्याचे जाण्यास दिनावधी लागली. होळकर दरकूच पोंहचून कोंडाईबारी गुजराथचा काकड. तेथें हरिपंततात्या, होळकर मिळोन दादासाहेबांशीं लढाई मातबर झाली. मानाजी फांकडे वगैरे पांच चार सरदार जखमी पाडाव करून होळकरांनीं आणिले. तसाच पाठलाग केला. दादासाहेब भडोचेस दाखल झाले. तेथें कांहीं उपद्रव करावा, इंग्रजांशीं वैर करून आज शहास गुंतून पडावयाचें कारण नाहीं, ऐसी मसलत हरिपंततात्यांनीं करून माघारी फिरले. सुभेदार इंदुरास गेले. हरिपंततात्या, फौज खानदेशांत पुणें मार्गाकडे रवाना करून, सडे, अहिल्याबाई पुण्यवान् व कारस्थानी दोन्हीं अंगें एकसारखीं, तेव्हां दर्शन घेऊन जावें या भावीं, महेश्वरास आले. बाईसाहेबांची भेट झाली. शिष्टाचार आदर-सत्कार बहुत उत्तम झाला. तात्यांचे मनांत बाईसाहेबांसारखें मनुष्य, यांचें आपलें कांहीं प्रामाण्य असावें असें मनांत येऊन, कृष्णाजी मुरार यांशीं बोलण्याचा व्यूह काढला. त्यांनीं स्पष्ट उत्तर दिलें कीं, "अशा गोष्टी बाईसाहेबांशीं आह्मीं कोणीही बोलाव्या, इतकें कोणाचेंही पुण्य नाहीं. येथें त्यांचे मुखावाटें आज्ञा होईल तितका व्यवहार करून आहों. अगोदर पुत्रशोक, त्यांत राज्य दुसऱ्याचे स्वाधीन केलें. त्यांत मनस्वी किलाफ. मातुश्रीच्या स्वभावांत पीळ. सूर्योदयापासून पुनः सूर्योदयापर्यंत सदाचरणाच्या घटका नेमलेल्या. त्यांत अवकाश करून हांक मारली

असतां जाऊन प्रश्न करतील, तितकी विनंति करावी. अधिक बोललें असतां मर्जी कोणे कलास जाईल ही भीति. उदास ह्मणोन गवताची पेंडी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय कोणास प्राप्त होईल, इतकी मुखत्यारी कोणाकडे नाहीं. हा विषय आपण समक्ष बोलले असतां, रुकार अथवा अन्य विचार उत्तरांत काय निष्पन्न होईल तो खरा." हें त्यांचे गळीं उतरून, तिसरे दिवशीं रात्रौ फराळास बोलाविलें होतें. पांचशें खाशांचा बेत. त्याचा समारंभ उत्तम प्रकारचा सिद्ध होऊन, हरिपंततात्या मंडळीसह आले. मंडळी कचेरींत बसवून जातीनें आंगरखा पागोटें काढून बाईसाहेबांचे स्नानसंध्येचे बंगल्यांत आले. तों मातुश्रीसाहेबांची स्नानसंध्या संपून देवघरांतून बाहेर आली. तात्यांस पाहिल्यावर गालीच्या मखमली बसावयास टाकून, हरिपंततात्यांनीं दादाजीस हांक मारली. त्यास बोलण्याचा ओघ दादाजीकडून अगोदर समजलाच होता. दादाजी आल्यावर बंदी करून, तात्यांनीं बोलण्याचा व्यूह काढला. तेव्हां मातुश्रीसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "आपलें बोलणें मुत्सद्दी काव्याचें. आमचा विषय पाहतां गैरसमजुतीबद्दल आमच्या उपमा अन्यत्रास देतात. ते आह्मी प्रत्यक्ष, त्यांत बायका माणसें. आमची समजूत ती काय ? आह्मांस जें बोलणें तें उघडें बोलावें. त्याचें उत्तर करूं." तेव्हां तात्यांनीं कांहीं स्पष्टही बोलून दाखविलें. त्याचें उत्तर "तात्या, ईश्वरइच्छेकडून मजवर सर्वोपरी गहजब. अशांत म्यां दौलत दुसऱ्याचे स्वाधीन करून राहिलें. आयुष्य तें परत्रेचे विचारांत काढावें, अशा भावीं नर्मदातीरीं क्षेत्र पाहून दिवस लोटतें. तथापि आमचा हा विचार कैलासवासी मल्हारजी होळकर यानें श्रीमंतांचे गादीशीं केला. त्यांत अवघे आह्मी बांधले आहों. जागजागां असे विचार घडूं लागले असतां, आमचे बुद्धीनें बेल ह्मणजे भाजीपाला त्याचें साधन असें आहे! आपण श्रीमंतांचे दौलतीचे खैरख्वाह आहां. आपण वेगळें बोलणें बोलतां हेंच अप्रशस्त." अशा भावीं सडेतोड उत्तरें केलीं. यांत हरिपंततात्यांचे मनांत वैषम्य तर आलेंच, परंतु तात्यांची साधकता विशेष, यामुळें तो बोलण्याचा संबंध सोडून अन्यत्र गोष्टी बोलण्यांत, पोटांत कळ निघाली ह्मणोन पाव घटका तेथेंच निद्रा करून बोलले कीं, "उपद्रव विशेष होत चालला. आज्ञा होईल तरी मी डेऱ्यास जाईन." "बहुत उत्तम आहे" असें बोलून त्यांस बिदा केलें. ते मंडळीसह गोटांत गेले. पांचशें पात्रांचा समारंभ. पात्रें वाढून सिद्धता झाली होती. मंडळी गेल्यावर आपले पदरची मंडळी मुत्सद्दी, भिक्षुक, पागे वगैरे बोलावून फराळास घातले. त्यांजकडेसही दहीपोहे, लोणचीं, पापड, वडे ऐशा बहंग्या भरून शागिर्दाहातीं पाठवून दिल्या. त्याजवर तिसरे

दिवशीं कृष्णाजी मुरार यांसी समाचारास पाठविलें. ते जाऊन बोलणीं झालीं. कृष्णाजी मुरार यांनीं विनंति केली कीं, "येविषयींचे मनोधर्म सुचविलेच होते. मालरावबाबा कैलासवासी झाल्यापासून स्वभाव कोणाचेही हातीं नाहीं. पुण्यवान्, धैर्यवान् यामुळें दिवस भ्रमानें निघतात. त्यांत आपलें येणें या ठिकाणीं कशास ? तो योग झाला असतां त्यांत मज ओळखीचें कारण काय ? आपले सारखे मिठ्ठास व दुसऱ्याचें मनोधारण हें श्रीमंतांचे राज्यांत धुंडाळल्यानें मिळावयाचे नाहींत. ते पक्षीं रंगाच्या मोटा बांधून कूच करावें हे नेकसल्ला." तेव्हां तात्यांनीं उत्तर केलें, "आपण बोलतां तसेंच घडेल." दादाजी प्रकृति पुसून आले. दुसरे दिवशीं हरिपंततात्या वाड्यांत आले. एकांतीं बाईसाहेबांशीं कित्येक प्रकारचीं बोलणीं होऊन बिदा मागितली. वस्त्रें अलंकार देऊन बिदा केलें. ते पुण्यास आले. महादजी शिंदे गुजराथेंत न जातां मागें राहिले होते, ते मागून उज्जनीस आले. तुकोजी होळकर गुजराथची स्वारी करून खानदेशांत होते. त्यांजकडे महेश्वराकडे जाणें वांकडें. कारण सहा महिने दिवाणगिरी दादाजी गंगाधर यांणीं केली. ते बाईसाहेबांचे इतल्यानें जावें. पुनः नारो गणेश यांची मुक्तता व कारभार सुरू झाला. याचा इतला सगळा मातुश्री बाईसाहेबांस नाहीं. यामुळें बाईसाहेबांचे अंतःकरणीं संशयाचे पर्वत. तेव्हां महेश्वरीं जाऊन सफाई होणें इतकें पुण्य कोणाचेंही नाहीं. तथापि शमरुडाचे घाटें परभारें इंदुरास आले. मग महादजी शिंदे यांस इंदुरास बोलावून त्यांशीं बोलणें केलें कीं, "तुह्मी आमचे बंधू, ते पक्षीं मातुश्रीसाहेबांकडे जाऊन, आपसांतली सफाई करावी." तेव्हां पाटिलबावांनीं उत्तर केलें कीं, "श्रीमंत, मोंगल, भोंसले, या प्रकरणीं अधिकउणे जाब असल्यास त्यांतील व्यवस्था आपले मनोगतानुरूप घडून येईल. पण बाईसाहेबांपाशीं जाऊन यश यावें असें मनोत्साहास वाटत नाहीं. परंतु घरचें काम, ते पक्षीं जातों. घडेल तें खरें." असें बोलोन एक पालखी व चौघे खिजमतगार व दोन घोडे कोतवाल इतक्यांनिशीं महेश्वरास आले. बाईसाहेबांस समजतांच मुकुंदराव हरी दिवाण यांस सामोरे पाठवून बहुत समारंभानें किल्यावर आणोन वाड्यांतच राहावयाची सोय केली. दुसरे दिवसापासून संपूर्ण कारभार, द्यावें, देणें, सुद्धां सोपला. जामदारखानेवाल्यास लाख रुपयेंपावेतों परवानगी कीं, पाटिलबावांनीं लाख रुपये कोणास देवविले असतां द्यावे. आमचे परवानगीचा आक्षेप घेऊं नये. असा बंदोबस्त करून, त्रिकाल भोजन मुतपाकांत, त्यांत दोनप्रहरां पंक्तीस, प्रातःकाल सायंकाळ मावशीबाईस आणून नाना प्रकारचीं खाणीं त्यांचीं व ब्राह्मणाचे पदार्थ करवून आपण जवळ बसून भोजनास

घालावें. हा क्रम तीन महिने एकरूप चालला. पाटिलबावा बहुत प्रसन्न करून, अशा मावलीचे पोटीं जन्म घ्यावा अशा भावी बोलण्यांत, परंतु ज्या कामाकरितां आले त्या बोलण्याचा प्रारंभ केला असतां पाटिलबावांची रुरयात कांहींएक न ठेवितां, कायम करून समेटाचें पर्यवसानास येऊं दिलें नाहीं. शेवटीं पाटिलबावाही दिक होऊन बोलले कीं, "बाईसाहेब आपण इतकीं अंगवणाचीं बोलणीं बोलतां, परंतु आह्मी पुरुष आहोंत. आपले ढंगावर आलों असतां आपण काय कराल?" याचें उत्तर, "जसें तुह्मीं आपल्या बाया सुपारीच्या खांडासारख्या तोंडांत टाकून गिळून गेलां, तोच बोध तुकोजी होळकरास करून उभयतां फौजबंदीनें येण्याचें करावें. इंदुरींहून तुमचें कूच, त्याच दिवशीं हत्तीचे पायांत अंडीं घालून तुमची खात्री करीन, तरच मल्हारजी होळकराची सून. तुमचे मनांत गुबार होता तो तुह्मीं बाहेर काढला. या गोष्टीस चुकाल तर तुह्मांस मार्तंडाची शपथ." मग पाटिलबावांनीं हंसल्यावर गोष्ट नेऊन मातुश्रीचें शांतवन केलें. तार ध्यानास आणिला. यश यावें ऐसें पाऊल दिसण्यांत येईना. सबब आज्ञा घेऊन इंदुरास आले. झालें वर्तमान सांगितलें. नारो गणेश यांनीं पाटिलबावांशीं वेगळे वाटें बोलले कीं, उभयतां सरदारांचें संमत घडेल तर आठां दिवसांत बंदोबस्त करितों. हें बोलणें पांच विश्वे महादाजीबावांसही रुचलें. मग सुभेदार यांचें मानस महादाजीबावांनीं पाहिलें. तेथें सुभेदारांचें उत्तर एकच पडलें कीं, "बाईसाहेबांचे पायापाशीं हरामखोरी मजकडून एकरूप व्हावयाची नाहीं. कदाचित् ढंग दोषेंकरून तिचे मनांत मजविषयींही पाप आल्यास मी हात बांधून रुबरू जाईन. मग ती प्राण घेवो व कैदेंत ठेवो. तें मजला कबूल आहे. परंतु हरामखोरी माझे प्राणांत प्राण आहे तोंपर्यंत होणार नाहीं. याकरितां दौलत उद्यां जात असेल तर आज जावो. मी जोडा संभाळून उभा राहीन. परंतु माझे वस्तूं ही गोष्ट सुतराम होणार नाहीं." असा खंबीर सुभेदाराचा पाहून पाटिलबुवा नारो गणेशांशीं बोलोन उज्जनीस गेले. नंतर सुभेदार कूच करून आल्या वाटेनें पुण्यास गेले.

नाना फडणिसांचे मनांत पूर्वदंश होताच. यामुळें वाफगांवीं राहणें पडून सरदारी गळाठ्यांत आली. तों इकडे दादासाहेब यांनीं अंग्रेजांशीं बोलणें केलें कीं, "आमची दौलत चोरापोरी लुटली जात आहे, ते पक्षीं सहा आणे घेऊन आमची मदत करून आह्मांस राज्यावर बसवावें." ही गोष्ट अंग्रेजांचे मनांत भरून पांच पलटणें व पापडसाहेब व इस्टुर फांकडा दोघेही बरोबर देऊन बोरघाटाखालीं आले. तेव्हां पुण्यांत हलकल्लोळ होऊन, पुणें जाळून बाहेर

पडावें असा विचार झाला. मग सुभेदारास पुण्यास बोलावून मसलतीचा प्रश्न केला कीं, "साहेबांनीं अरिष्ट आणिलें, ते पक्षीं आपणही पुणें जाळून मोंगलास सामील करून यांचे मागें लागावें असा बेत केला आहे." तेव्हां सुभेदारांनीं उत्तर केलें कीं, "धनीपणाची मुखत्यारी आपणांकडे. आह्मी ताबेदार. सांगाल तैसें करूं. परंतु आमचे मनास वाटतें कीं, आपण एक लक्ष धरून गर्भवासी श्रीमंतांची आज्ञा या क्रमावर दौलत नमुदास आणिली, ते पक्षीं मुरगीस बिसमिल्ला तो कशास? आपली फौज जमा करून बोरघाट धरावा. घाट चढून वरती होतील तेव्हां घडणें तें घडो. आपले हातें आज आपलें घर जाळावें असें तुह्मांस संकट तें काय?" ही गोष्ट नाना फडणीस यांनीं श्रवण करून बहुत संतोषातें पावले. मनांत विचार केला कीं, सरदार गळाठ्यांत असून समयास मसलतीची पैरवी उत्तम प्रकारची सांगितली. तेच समयीं सुभेदारांस फौज ठेवावयाची आज्ञा होऊन, वरकड सरंजामी जमा करून कांहीं इतलाखीचाही भरणा केला. तमाम फौज सुभेदारांचे हुकमांत चालावी ऐसी ताकीद होऊन बमय फौज सुभेदार घाटाचे तोंडीं आले. तों फिरंग्यांनीं एक पलटण ५०० माणूस, जय्यत चार तोफा, घाटावर चढवून लढाईचा मुकावला घातला. त्या पलटणानें घाटावरून चौ तोफानें असा मार दिला कीं, पांच स्वार एके ठिकाणीं उभे राहूं दिले नाहींत. अशी दररोज लढाई चार महिने सतत झाली. ऐंशी हजार फौजेचा मेळ असतां उमष खाऊं दिला नाहीं. यामुळें नानाही फार दिक झाले. मग श्रीमंतांनीं स्वदस्तूर चिटी सुभेदारांस लिहिली कीं, "आपण जातीनें ऐंशी हजार फौज असतां, एका पलटणाचें पारपत्य न होतां फौज हवा खाऊन राहिली. तेव्हां आह्मांस जातीनें येणें लागेल कीं काय? आपलें उत्तर आलें ह्मणजे तसाच बेत करावयास येईल." असी चिटी घेऊन सांडणीस्वार सुभेदार घोड्यावर होते तेथें आला. चार घटका दिवस होता. गाशा टाकून चिटीचें वृत्त श्रवण करितात, इतक्यांत पांच माणसें एकत्र पाहून तोफेचा गोळा आला. चार महिने श्रमाची दगदग आणि चिटीच्या मजकुराच्या फांसण्या येणेंकरून चित्त विमनस्क होऊन डेऱ्यास आले. नंतर काशीराव होळकर, बापू होळकर, भिकाजी होळकर, मल्हारराव होळकर, चौघे पुत्र. त्यांत मल्हारराव होळकर याचें वय आठां वर्षांचें. तिघेजण बराबरीचे, काम करण्याजोगे. चौघांसही बोलावून आई, माई, जोरू, बेटी कांहीं एक विचार दुर्भाषणें बोलून, "श्रीमंतांचा मजला ओळंबा आला, ते पक्षीं उदईक मजला मरावयाचें. मग तुह्मांस उमजेल. कोणेही गोष्टीची बाकी ठेविली नाहीं." तेव्हां मल्हारजी होळकर लेंकरूं, काशीराव होळकर

एकांगहीन, भिकाजी होळकर ते होळकरच राहिले. बापू होळकरांचे काळजास भोंक पडून, त्या प्रसंगीं कांहींएक उत्तर न करितां तेथोन बाहेर आल्यावर पागे बारगीर व शिलेदार सरदार यांस, प्रसंगास उपयोगी तितक्यांच्या घरोघर पालोपाल हिंडून, पदर पसरून पायावर डोकें ठेवून, मागणें मागितलें कीं, "सुभेदारांचा वृद्धापकाल, त्यांनीं श्रमसाहस या दौलतींत केलें, तें आपण कानांनीं ऐकिलें नाहीं, मग पाहणें तर दूरच! हे सर्व गांवखुर्द होऊन या प्रसंगीं वृद्धापकाळीं त्यांस श्रीमंतांचा ओळंबा आला. तेव्हां त्यांनीं तर मरणाचा संकल्प केला. पण त्यांनीं मरावें व आपण वांचावें, या वांचण्यास धिक्कार असो! आमचे मरणाचे सोबती व्हावयाचें असल्यास चौघडा आखर झाल्यावर अमुक जागा घोडें न घेतां पादचारी ढालतरवारेनिशीं त्या ठिकाणीं हजर व्हावें. वडिलांचे पुण्येंकरून कामकाज होऊन आल्यास दौलत तुमची आहे. वांटून खाऊं." या भावीं बोलणीं अस्तमानापासून दोन प्रहर रात्रपर्यंत एकेक माणसाशीं बोलून, आनंदानें रुकार दिला त्याचें नांव यादीवर लिहिलें. ज्यानें रडाच्या गोष्टी सांगितल्या, त्यास रामराम केला. ऐसी आसामी यादीवर १८०० आले. इतके सिद्ध करून डेऱ्यास जाऊन, घुटीची प्रार्थना यथास्थित करून, स्नान करून देवावर भंडार टाकून, सुभेदारांचें नांव घेऊन कंबर बांधली. संकेतस्थानीं आले. तेथें यादीबरहुकूम जमाव झालाच होता. कोणकोण यावयाचे तेही आले. एकत्र होऊन चाल केली. हें वृत्त कोणासही ठाऊक नाहीं. घाटाचे तोंडीं गेले. तोंपर्यंत पलटणवाल्यांसी ही खबर नाहीं. आठ कोसांचा छटा राहिला. त्यानें बिघडून जागा बिकट केली होती. जोंपावेतों पलटणवाल्यास समजलें नाहीं, तोंवर मुकाट्याच गेले. गडबड केली नाहीं. तोफेपासून गोळीच्या पल्ल्यावर बिकट पाहरे होते. त्यांनीं ऐकतांच, झडपून पाहरे कापून टाकिले! तेथोन हजार बाराशें बंदुकींचा एकदांच ताशेरा दिला. दुसऱ्यानें मेण्यांतून काढून हल्ला केला. त्यांनींही छरे मारण्यांत कमी केली नाहीं. आठराशांत मेळ होईपावेतों ६०० राहिले. सहाशांनीं तरवार करून, पलटण दरोबस्त बुडवून, चारी तोफा अडीचशें माणूस परतून आले. यांत चोवीस पालखीनवीस व तेरा हत्तीनवीस कामास आले. याशिवाय पागे बारगीर यांची संख्या नाहीं.

हें वर्तमान सुभेदारांस समजलें. मर्जी प्रसन्न झाली. मेले, गेले, राहिले, इतक्यांचे घरोघर जातीनें सुभेदार हिंडोन, सर्वांची दिलजमाई करून, श्रीमंतांस पत्रें लिहिलीं कीं, "आज्ञेप्रमाणें पलटण कापून काढलें व इतक्यांत अंग्रेजांकडून सुभेदारापाशीं प्रेष आला कीं, तुमची दोस्ती आह्मांस तोडावयाची नाहीं. दादा-

साहेबांस तुमचे तुह्मीं आटोपून बंदोबस्त करावा. तुमची आमची दोस्ती पूर्वापार आहे, ती कायम करावी." असें बोलणें आलीयावर नानाकडे प्रेष पाठविला. त्यांनींही सुभेदारांवर ओझें ठेवून उत्तर लिहिलें कीं, आपण प्रसंगीं आहां. कळेल त्याप्रमाणें ठरावांत आणून साहेब हस्तगत करून घ्यावे. मग सुभेदारांनीं अंग्रेजांशीं बोलणें करून, दादासाहेब व सहा आणीचा लेख व कांहीं मसलतखर्च व दादासाहेबांचा "जवाहीरखाना मुंबईस आहे तो आणून द्यावा. त्यांनीं उत्तर केलें कीं, जवाहीर व सहा आणीचा लेख हें कलकत्त्यास आहे. आह्मी चकती देतों. कोणास पाठवावें. घेऊन येईल. गुंता पडणार नाहीं." ऐसें बोलणें झाल्यावर मसलतखर्च व दादासाहेब व चकती आणोन हजर केली. मग सुभेदार पुण्यास आले. श्रीमंत जातीनें तीन कोस सुभेदारांस सामोरे आले होते. भेटीचे समयीं श्रीमंतांकडील व सुभेदारांकडील तोफखाना सुरू झाला. शनवारचे वाड्यांत आले. नाना फडणीस यांनीं शिरे दरबार सुभेदारांचें चार घटका स्तुतिस्तोत्र केलें. सुभेदारांनीं एकच उत्तर केलें कीं, चाकरी चाकरांनीं केली न केली, त्याचा इतका बडिवार कशास पाहिजे? इतकें बोलून विडे घेऊन मुजरा करून मुक्कामास आले. दुसरे दिवशीं बापू होळकरास भेटीस पाठवावें ह्मणोन निरोप आला. यांनीं बापूस बोलावून सांगितलें कीं, भेटीस जाणें. बापूनीं उत्तर केलें कीं, "मला श्रीमंतांशीं काम काय? आपण चलाल तेव्हां बराबरच चालेन." सुभेदारांनीं शिव्या दिल्या. हें वृत्त निरोप आणणारानें अवघें डोळ्यानें पाहिलें. मग सुभेदारांनीं त्या गृहस्थाशीं बोलले कीं, "कारटा हट्टीखोर आहे. मी येईन ते दिवशीं बरावर घेऊन येईन." मग चौ दिवसांनीं सुभेदार गेले. तेव्हां त्यांचे बराबर बापूही गेले. सुभेदारांचे पाठीमागें दोघे खिजमतगार त्यांत आपण उभे राहिले. नानांनीं सुभेदारास विचारिलें कीं, "बापू कोठें?" तेव्हां बापूनें हात जोडून विनंति केली कीं, "मी हजर आहें." नानांनीं पराक्रम तो ऐकिला. आचार हा पाहिला. येणेंकडून बहुत प्रसन्न होऊन, रावेर व कोंच महाल त्या दिवशीं जागीर करून दिली.

नंतर दादासाहेबांस झांशीचे किल्ल्यांत ठेवावें असा विचार. श्रीमंतांकडून हरी बावाजी व होळकराकडून जीवनराव पागनीस अवसरकर या उभयतांस बराबर घेऊन, साहेब कुटुंबसुद्धां झांशीस रवाना केले. मार्गांत हरी बावाजीचा जाच फार होऊं लागला. तेव्हां सौभाग्यवती आनंदीबाईनीं अमृतरावसाहेब यांजला सांगून ओंकारेश्वराचे अलीकडे तीन कोस मुक्काम, तेथून कूच करून पुढें जावें. तयारी झाली. घोड्यावर बसल्यावर अमृतरावसाहेबांनीं हरी बावाजी याचे गोटांत

येऊन मशारनिल्हे आंगरखा घालून घोड्यावर बसावें. इतक्यांत रावसाहेब कां आले ह्मणून यांचे समोर आले. तोंपर्यंत रावसाहेबांनीं हासडा मारून पाडले, आणि घोडा उडवून आपले सरंजामांत जाऊन तयारी होतीच. झांशीचा रस्ता सुधरून गुजराथचा रस्ता धरून पुनः अंग्रेजांकडे गेले. होळकराकडील व श्रीमंतांकडील सरंजाम राहिला. ते कूच करून देशीं गेले.

नंतर मल्हारराव होळकर, सुभेदारांचे द्वितीय कुटुंबाचे चिरंजीव, यांचें लग्न फार मोठें झालें. लांभाते यांची सोयरीक झाली. लग्नसमारंभ फार मातबर झाला. लग्नांत विघ्न, कचेरीचा मांडव जळाला ! लाखों रुपयांचें नुकसान झालें ! कांहीं माणसेंही जाया झालीं. श्रीमंत व नाना फडणीस लग्नास आले होते. नंतर श्रीमंतांचें लग्न झालें. नंतर टिपूनें खंडणीचा ऐवज द्यावयास लवाडी करून फौजबंदीनें काकडावर मुक्काम केला. तेव्हां मसलत प्राप्त होऊन हरिपंत-तात्याबरोबर फौज देऊन भोंसले, मोंगल सामील करून, हरिपंततात्या व सुभेदार व मोंगलाकडील फौज व भोंसल्याकडील फौज मिळून लाख फौजेचा जमाव करून टिपूचे मुलुखांत शिरले. सावनूर बंकापुरावर लढाई मातबर होऊन टिपू उधळून आपले मुलखांत गेला. मागें हेही दरकूच चालले. टिपूचा कागदपत्र येणें तो सुभेदारांकडे यावा. इतराशीं त्यानें गरज ठेविलीच नाहीं. नादीं लाऊन श्रीमंतांचे फौजेवर छापा टाकावा, हा मनसबा करून तयारी केली. हें वर्तमान सुभेदारांस समजतांच, अवघे सरदारांस इतल्ला करून, बुणगे पिछाडी डोंगर याचे आश्रयानें अलीकडे ठेवून, सडे भारी घोडा राऊत असा सर्वांस इतल्ला केला. कोणीं ऐकून घेतलें. मोंगल भोंसले यांनीं थट्टा केली कीं, सुभेदारांस ह्मातारपणीं फार दिवस वांचावें हा अभिलाष उत्पन्न झाला आहे, अशा भावीं बोलले. तें सुभेदारांचे कानावरही आलें. तथापि क्षमा करून, आपले बुणगे दामदस्त राहुटी पाल पडदे बेल बाधी या कांहींएक न ठेवितां, एक बिचोवा पलंग मात्र ठेविला. बाकी आपला गोट सडा जगरा केला. तों मागील प्रहर रात्र राहतां गोळा चालला. मोंगल भोंसले यांचे येथें रामजानीचा तमाशा होत होता. ते जेथील तेथें राहून प्राण घेऊन निघावयास मुष्कील पडली ! त्या काळीं अवघ्यांस वाटलें कीं, सुभेदार सांगत असतां आपण हयगय केल्याचें फळ पावलों. मग टिपू-सुलतानानें फौज लुटून नेऊन वेगळाली उभी केली. त्यांत सुभेदारांकडील एक ह्मातारीचा बैल, जातें व पाळ ! तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें. ज्यांनीं हिंदुस्थान काबीज केलें, तेथें अशा सावधानीनेंच राहिले ह्मणून गुजारा झाला. नंतर टिपूसुलतान यानें लूट सुतळीच्या तोड्यासुधां ज्याची त्यास पावती केली. सुभेदारांकडील ह्मातारी तिजला साडी चोळी देऊन, एक बैल मातबर देऊन

बिदा केली. पुढें दो चौ महिन्यांनीं सुभेदारांचे विद्यमानें खंडणीचा ठराव ठरून, पैका चुकवून देऊन, तमाम फौजा मुलुखांतून काढून दिल्या. पुणें मुक्कामीं आल्यावर सुभेदार वाफगांवास आले.

इकडे हिंदुस्थानांत महादजी शिंदे उज्जनीस होते. गोहदकर जाट यांचा इरादा, ग्वालेर घ्यावी, हें कायवाङ्मनःपूर्वक. परंतु जातीचें अंगवण थोडें. तथापि उद्योग करीतच होता. तों ग्वालेर श्रीमंतांनीं शिंद्यांस दिली. त्याच्या सोडचिटी घेऊन अंबोजी इंगळे ग्वालेरीस आले होते. अशा संधींत जाटानें कानपूर छावणींत फिरंग्याशीं पैगाम लावला. "पांच लक्ष रुपये आह्मीं तुह्मांस देतों. तुह्मीं ग्वालेरीचा किल्ला घेऊन आह्मांस द्यावा." त्यांनीं कबूल करून, चार पलटणें रवाना केलीं. त्यांनीं येऊन किल्ल्याची बदली होती असी संधी पाहून, उरवाईचे माजी किल्लेदाराकडील जमादार होता, त्याजला पंचवीस हजार रुपये देऊन, फितुरांत आणून त्या मार्गीं किल्ल्यावर चढून आले. हें वर्तमान माजी किल्लेदार गोविंद शामराज यांजला समजतांच त्यांनीं तरवार धरली. ते सावध, हे बेसावध. तथापि निमक खाण्याची शर्त करून जुवामर्दीनें देहअवसान जाहलें ! लौकिक त्यांचा जाहला. ग्वालेरसारखा किल्ला एकाएकीं हातीं आल्यावर अंग्रेज हमराहा होऊन शिरोंजेकडे चाल केली. अंबोजी इंगळे फिके पडून उज्जनीस आले. तेव्हां अंबोजीबरोबर महादजी शिंदे यांनीं दहा हजार फौज देऊन, फिरंग्याचे मुकाबल्यास रवाना करून, श्रीमंतांस पत्र लिहिलें कीं, "ग्वालेरप्रांतीं फिरंग्याची पलटण येऊन ग्वालेर घेऊन पुढें चाल करून शिरोंज घेतली. आह्मींही त्यांचे मुकाबल्यास अंबोजी इंगळे दहा हजार फौज देऊन रवाना केले. सांज सकाळ आह्मीही कूच करून जातों. फौजेची खर्चाची मदत झाली पाहिजे." असें लिहून आपणही अंबोजीचे मागें चार मजलीचे अंतरानें राहत गेले. अंबोजी इंगळे यांचा व पलटणांचा मुकाबला लागला. समोर मुकाबला करून लढाई करावी, तर पुरें पडणें हें तर कठीणच. परंतु खांद्यावर भाला टाकून, भोंवताले हिंडून, रसद चारा पाणी यांजवांचून जेर केलें. मागें महादजीबावा हा दबाव, सबब पुढें चालावयाची हांव सोडून, मागें ग्वालेरीचे मैदानांत आले. तेथें अंबोजी इंगळे व महादजी शिंदे एकत्र होऊन घेराघेरी आरंभिली. ऐसा क्रम ८ महिने चालला. कज्याखीचें आंग महादजी शिंदे यांजला हीन अंगामुळें कमी; सबब बेजार झाले. मग मातुश्री बाईसाहेबांस पत्रें पाठविलीं कीं, फौजेची मदत करावी. त्यावरून बाईसाहेबांनीं बाळुजी इंगळे सरदार व राजाराम रणसोड बराबर देऊन, दहा हजार फौजेनिशीं शिंदे यांस सामील झाले. क्रम तोच घेराघेरीचा प्रसंग. त्यांत

पलटणवाल्यांनीं महादजी शिंदे मागें असतां असी बातमी ठेऊन, चार तोफा, एक पलटण शिरोंजचे सुमारें जाऊन, तिकडून उलटून महादजीबावांवर छापा टाकला. पाटिलबावांस जिवंत धरावें असा समय प्राप्त झाला होता. होळकरांकडील फौज बाजूस होती. त्यांस समजल्यावर, सरदार धरला जातो जाणोन, मागील चार घटका रात्रीचे संधींत घोडें घातलें. पलटणें कापून चारी तोफा घेतल्या. फत्ते झाली. व पुढें अघाडीस अंबोजी इंगळे यांनींही एक पलटण झामडलें. नक्ष जमला असतां महादजी शिंदे यांनीं हैबत खाल्ली. छापा खाल्यावर तिसरे दिवशीं, मागील चार घटका रात्र आहे तों, बाळाराव दिवाण व राघो मल्हार पोतनीस यांनीं मसलत केली. फौज कमी. तेही खर्चाचे अडचणीमुळें तन देईना. तेव्हां जातीनें उज्जनीस जाऊन खर्चाची सरबरा व देशीं लिहून आणखी फौज आणून मुकाबल्यास यावें असा मनसबा सिद्ध करून, राजाराम रणसोड होळकरांकडील यांजला बोलावून बराय मसलत विचारली कीं, "आह्मीं असा विचार काढला आहे, ही गोष्ट कसी?" मग राजाराम रणसोड यांनीं बहुत निषेध केला कीं, "उज्जनीस जाऊन मसलतीचा सजल पाडणार, तोंपर्यंत समोरचा हरीफ तुमची येण्याची वाट पाहील कीं काय? उज्जनीस येऊन गोळे करणें त्यास अवघड तें काय? यास्तव मसलतीचा सजल येथील येथेंच करणें ती करावी. पुण्याहून फौज व खर्चाची सरबरा होऊन त्या भरंवशावर यांसी पुरें पाडणें हें घडत नाहीं. तुह्मांस न तोले तर नजीबखान दिल्लीचा वजीर याजपाशीं लाख स्वार व तीन लाख पायदळ व बाराशें तोफा चालू आहेत. त्याजकडे वकील पाठवून पुढें मुलूख सोडविला जाईल. त्याची सहा आणी त्याजला कबूल करून त्याची फौज आणवावी ह्मणजे सहजच इभ्रत पडेल." ही गोष्ट पाटिलबावांचे मनास रुचून, अल्याजी तुमचा त्याचा विशेष मेळ आहेच. तुह्मीं हें काम करावें. मग याचे सरदार त्रिंबकजी इंगळे पैक्याचें झाड. फौज खर्चाचें तोंड. सबब इंगळे यांनीं आपलें अंग काढून सरदारी राजाराम रणसोडदास याचे गळां घातली. नित्य गांड घोडें खर्चाची अनुपत्य जाणोन, येथें राहण्यांत आपली पुरें पडत नाहीं. महेश्वरास उठून जावें तर नाकावली येती. तेव्हां ही मसलत कबूल करून, पंचवीस हजार रुपये पाटिलबावांपासून घेऊन दरकूच जयपुरास आले. जयपुरीं हिंमतबहादर गोसावी मशारनिल्हेस भेटले. त्यास त्यांनीं मसलतीचा ओघ सांगितला. त्यांनीं उत्तर केलें कीं, "तुमचा आमचा भाईचारा, ऐकाल तर नेकसल्ला सांगूं." पंत मशारनिल्हे यांनीं उत्तर केलें कीं, "या विदेशांत आह्मांस तुमच्यासारखा रफिक कोण? सरकारची फौज कायम राहून गुजरा चालेल ऐसें कांहीं सांगावें." मग गोसावी

बोलले की, "नजीबखान तुह्मीं पाहिला, तो आतां राहिला नाहीं. दिल्लींत आल्यावर नेकबंद, खरीच चाल, एक भाषण, तें कांहींच राहिलें नाहीं. आह्मी रात्रंदिवस जवळचे राहणार, त्यास सहा सहा महिने वर्ष वर्ष आमचें दर्शन नाहीं. तेव्हां तुह्मी जाऊन तुमची भेट होयास वर्ष सा महिने पाहिजेत. इतक्यांत तुह्मी खर्चाचे कोचवर्णींत येऊन डेऱ्याचे दांडे होतीलना! शिंद्यावर उपकार व धन्याची चाकरी. यास्तव आमचे मतें तुह्मीं याच जिल्ह्यांत काळ काढावा हें चांगलें." कोणे रीतीनें काळ काढावा? तेव्हां हिंमतबहादर बोलले कीं, "आह्मी नवाबापाशीं त्रासून येथें आलों. राजास शपथ केले. त्याचें ह्मणणें भाईभेट यांनीं आह्मांशीं फेरबदलीच्या गोष्टी करतात. यांत एकादोघांचें पारिपत्य केलें असतां जरब पडून बंदोबस्त होईल. तुह्मीं ही गोष्ट करावी. त्यास आह्मांस या जिल्ह्यांत काळ काढणें. सर्वांशीं भाईचारा. वाईट कोणाशीं व्हावें? यास्तव तुह्मी विदेशीं. तुह्मांपासून ही गोष्ट घडावयाजोगी तुमचा व राजाचा मेळ करून देतों." यांनीं उत्तर केलें कीं, "टोंक, रामपुरा हे आमचे महाल. हे अंकुलेश सोडून देऊन बाईसाहेबांशीं सफाई करावी ह्मणजे आह्मांस राहण्यास प्रशस्त. पोटापाण्याचा बंदोबस्त करावा. सांगाल तरी चाकरी करूं." त्यांनीं कबूल करून राजाशीं बोलणें केलें. त्यांनीं ही गोष्ट कबूल करून यांच्या त्यांच्या भेटी झाल्या. त्यांनीं टोंक, रामपुरा, अंकलेश सोडून, विसा लक्षांची जायदाद फौजेस लाऊन देऊन, कामकाज सागण्याचें तें सांगितलें. बाईसाहेबांचें संमत आणून तेथें राहिले.

इकडे फिरंग्यांचे पलटणास घेराघेरी चाललीच होती. तों काशीचा राजा चेतसिंग यानें जमीयत करून फिरंग्याचीं पांच पलटणें कापून काढलीं. काशीचे राज्यांत टोपी पाहिली असतां कंठस्नान घालावें हा क्रम चालला. तेव्हां पलटणास पायबंद पुरकस बसला. मग त्यांनीं पाटिलबावाशीं सलूख करून निघोन गेले. जाट गोहदवाला फिका पडला. मग पाटिलबावांनीं ग्वालेरचा किल्ला घेऊन तमाम अंमल फैल केला. शेवटीं गोहदही घेतली. जाटास धरून कैद केलें. तों इकडे नजीबखानाचा काळ दिल्लीस झाला. तेव्हां सुनें रान पाहून, चमडावती उतरून आग्र्याचा किल्ला घेतला. त्या समयीं लाला नौबतराय कोणी कायस्थ पाटिलबावांचे तोंडीं लागला होता. त्याजला फौजेची कंपूची बक्षिगिरी सांगून, जिवबादादा, बाळोबा तात्या वगैरे शेणवई यांचें कांहींएक न चालतां, लाला नौबतराय सांगेल ती पूर्वदिशा. आग्रा येथील किल्ल्यांत अंमल फैल करून जयपुरचे मुलखांत स्वारी आली. जैपुरवाल्यांनीं, जोतपुरवाले व अमदानी, नजीबखानाकडील सुभा व आपली जमीयत एकत्र करून, लालसोडचे मुक्कामीं मुकाबला केला. अमदानी

यानें हवा पाहून, लाला नौबतराय याजला तीन लक्ष रुपये देऊन फितूर केला. लढाईचा मोहरा यांचा त्यांचा लागला. एक दिवस तर फितूर समजण्यांत आला नाहीं. दुसरे दिवशीं निकराची लढाई, पलटणें कंपू मुकाबल्यास उभा. एक ताशिरा खालीं चालवून लाला नौबतरायसुद्धां पलटणें उठून गेलीं. राठोडांनीं हल्ला केला. पाटिलबावांस जिवंत धरून घ्यावा हा इरादा. तो ईश्वरी कृत्य. अमदानीस हत्तीवर गोळी लागून कामास आला. त्याची फौज बेबाद होऊन गेली. जैपुरवाले लबाडच, तेही तारगोवारगी राहिले. राठोडांनीं निःसीम चालवून घेतलें. महादजीबावांस धरून घ्यावें. तों विंचूरकर यांनीं आडवें घोडें घालून राठोड थोपवून कटा केला. यामुळें पाटिलबावांस सवड पाऊन ग्वालेरीस आले. पागोटें टाकून फेटा बांधला. जुने मुत्सद्दी यांचे गळां हात घातले. केल्या कर्माचें फळ पावलें. आतां संभाळावयाचें असल्यास संभाळावें. तेव्हा सर्वांनीं विचार करून मराठे फौज हमराहा केली. आग्र्याचे किल्ल्यास बादशाही संरजामपैकीं नजीबकुलीखान यानें आग्र्यास मोर्चे लाविले. किल्ल्यांत लखोबा अंतरीवाला होता. यानें खूप किल्ला लढवून ग्वालेरीस पत्रें पाठविलीं कीं, कुमक आल्यास उत्तम आहे. आतां आमची पराकाष्ठा झाली. तेव्हां फाळके वगैरे पथकें थोरल्या लखबाच्याबराबर देऊन आग्र्यास किल्ल्याचे मदतीस पाठविले. यांनीं जाऊन, नजीब कुलीखान आग्र्याचे किल्ल्यास लागला होता, त्याशीं लढाई करून मोर्चे उठविले. मथुरा वगैरे ठाणीं कायम केलीं. इकडे रजवाडे मात्र लहान मोठे एकत्र होऊन विचार केला कीं, दक्षण्यांचा अंमल ज्याच्या जिल्ह्यांत, त्यानें उठवून घ्यावा. ऐसीं पत्रें रामपुरा व सावेर व इंदूरपर्यंत आलीं. या मसलतीस रुकार बुंदी कोटेवाले यांचा मात्र पांच विश्वे. तुमचा अवघ्यांचा नमूद सिद्ध झाल्यावर आह्मांसही करणें अवघड तें काय? असा लपेटवार रुकार देऊन, तरतें बुडतें पहावें या बेतांत. बाकी चंद्रावतांनीं रामपुरा घेतला. उदेपुरची दहा हजार फौज येऊन निंबहेडा, जावद वगैरे ठाणीं उठविलीं. सावेरचे जमीदार देखील बाहेर पडले होते. राणाजीची फौज येऊन निंबहेडा, जावद वगैरे ठाणीं उठविलीं. तेव्हां बाईसाहेबांनीं आंबाजीपंत, राघो रणसोड पागनीस यांचे मावसबंधू, यांचेबराबर हुजरात सरंजाम दीड हजार व कांहीं शिलेदार ऐसी तीन हजारांची भीडभाड त्याचे मुकाबल्यास पाठविलीच. चकरडा प्रांत मेवाड येथील मुक्कामीं राणाजीचे फौजेनें दोनप्रहरां छापा घातला. अंबाजीपंत मारले गेले. फौज रणभरी होऊन जावदेस जमा झाली. हें वर्तमान महेश्वरीं मातुश्रीसाहेबांस समजतांच, आबाजी रणसोड पागनीस यांचे डेरे बाहेर करून, शरीफभाई निसबत पागा हुजरात याजला

पाठवून, करवंदीप्रमाणें थालनेर येथें पेंढारी पडले होते ते दरोबस्त आणून, जमादारांस मेजवानी करून वस्त्रें दिलीं. आणि ताकीद केली कीं, "मेले हो, तोंड दाखवावयास आलां, तर मेकसू घालून मारून टाकीन. मेवाड होतें कीं नव्हतें असें करून टाका." पेंढारी व आबाजी रणसोड व शरीफभाई रवाना झाले. शिलेदारांची तार बांधवून दिली. परंतु चकरड्याची लढाई मारल्यावर मेवाड हमराहा होऊन चंद्रावतांकडून रामपुरा घेवविला. तेव्हां उज्जनीस शिंद्यांकडील कुटुंबें होतीं. त्यांचें धैर्य हत होऊन, महेश्वरास पत्रें बाईसाहेबांस आलीं कीं, "आह्मी आपलेजवळ येतों." त्यास उत्तर बाईसाहेबांनीं लिहिलें कीं, "आल्यास तुमचें घर आहे. परंतु नक्षास बाध पडतो. तसाच प्रसंग पडल्यास तीन प्रहरांत तुमचेपाशीं दाखल होईन; घाबरूं नये." असें उत्तर लिहून खाजगत डेरा बाहेर दिला. तेथें रोज फौजेची हजरी. शंभर स्वार आले ते रवाना केले. पन्नास आले ते रवाना केले. पांचशें आले ते रवाना केले. आबाजी रणसोड व शरीफभाई तिसरे दिवशीं रामपुऱ्यास गेले. जातां जातांच मोर्चे लागले. हें वर्तमान मेवाड्यांस समजतांच कूच करून दोन मजला चळद उतरून आले. हें वर्तमान आबाजी रणसोड व शरीफभाई यांस समजतांच रामपुरीयाचा शह सोडून संजीतीस मुक्काम केला. त्याचा यांचा छटा सा कोसांचा राहिला. तेव्हां रांगड्यांस खबर जातांच, दबाव पडून चळद उतरून गेले. सडा स्वार उतरून गेला. बुणगे चळद उतरत होते. इतक्यांत पेंढारी पोंचून बुणगें लुटून आणिलें. दोनशें उंट व दीडशें घोडें शिवाय बैलबधीया घेऊन आले. शरीफभाईनीं आबाजी यांजला सांगितलें कीं, तुह्मी कूच करून चला, खडेदम लुटून घेतों. परंतु उभयतांनीं ऐकिलें नाहीं. मग मकाजी गिते शिलेदार यांचे तैनातीस होते. त्यांजला दम देऊन अर्ध रात्रीं कूच करून पेंढारी घेऊन गेले. आबाजी शरीफभाई यांजला न पुसतां यशाचा अभिलाष सर्वत्रास मुकाबल्यास गेले. तेथें रांगड्यांनीं बुणगे काढून सडा स्वार उभे होते. अंधाराचा मामला. यांच्या मतें कालच्या सारखे बुणगेच आहेत. पेंढारी यांनीं तोंड लाविलें. तोंड लावतांच रांगड्यांनीं सडकले. तों पांच चार पेंढारी जाया होतांच यांनीं पळ काढला. दामदस्त पेंढारी नाहींसा झाला. इकडे लष्करांत खबरही नाहीं. मागील सा घटका रात्र राहतां फौजेचें कूच होऊन दिवस उगवतांच चळदचे कांठीं मुक्काम झाला. कोणी खोगीर उतरलें, कोणी उतरतो, कोणी घोड्यावरच, तों नदीचे पार फौजेचा धुराळा उठून राहिला. पेंढारी दोन दोन कोसांवर तुंगचे तुंग उभे. तों रांगड्यांनीं मकाजी गिते यांस जिवंत धरावें अशा भावीं गराडा घातला. मकाजीपाशीं पागेचे स्वार मात्र दहा बारा. मकाजी गिता

